OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No M923 2/S26T Accession No M4747

Author सावरकर, वि. दा.

Title तेजस्वी तारे 1949

This book should be returned on or before the date last marked below

UNIVERSAL LIBRARY
OU_192222
UNIVERSAL LIBRARY

स्वा० वि. दा. सावरकर--लिखित

तेजस्वी तारे

प्रकाशन क्रमांक ३०

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पा. परचुरे प्रकाशन मन्दिर,
गोरेगावकर चाळ क्र. २,
गिरगाव, मुंबअी ४.

सर्वाधिकार
स्वा० सावरकर यांचे स्वाधीन

पहिली आवृत्ति
१९४९

मुखपृष्ठ–सजावट
रघुवीर मुळगांवकर

मुद्रक :
श्री. **भ. पं. सोमण,**
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस,
३९१ नारायण पेठ, पुणें २.

माझी भूमिका

साधारणतः सन १९२४ ते १९३७ च्या काळात आपल्या हिन्दुस्थान देशाच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं नेमस्त, जहाल, निःशस्त्र क्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतिकारक या मुख्य पक्षांतील देशभक्त पुढाऱ्यांनीं आपापल्या मार्गांनीं राजकीय चळवळ केली. तींत सशस्त्र क्रांतिकारकांचा दृष्टिकोन काय असे, तें विशदविण्यासाठीं, त्यांच्यावर येणाऱ्या मिथ्या आक्षेपांना निरसिण्यासाठीं आणि त्यांनीं देशस्वातंत्र्यार्थ केलेल्या अतुल्य बलिदानास कृतज्ञ श्रद्धांजलि वाहण्यासाठीं स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी अनेक लेख त्या कालावधींत लिहिले. त्या लेखांतून क्रांतिकारक हुतात्म्यांच्या वैयक्तिक चरित्राचें रेखाचित्रण करणारे कांहीं थोडेसे लेख निवडून ते या पुस्तकांत मी संग्रहिले आहेत

त्या काळांतील टिळक, गोखले, गांधी, लाला लजपतराय किंवा विपीनबाबू प्रभृती सर्वच पुढाऱ्यांच्या लेखसंग्रहांत त्या परिस्थितींतील घटनांचीं, वादांचीं, पक्षोपपक्षांच्या आक्षेपप्रत्याक्षेपांचीं जीं वादळें अुठलेलीं आढळतात तीं आतां अुपशम पावलेलीं आहेत. तो काळच आतां अितिहासाचा विषय झालेला असल्यामुळे ते सर्व लेखसंग्रह त्या अितिहासाचीं साधनें या मुख्य दृष्टीनेंच काय ते अभ्यासिले जाणार आहेत. तथापि ते जुने वाद नि वादळे, धूळ नि धुळवडही जरी आजअुद्या "नामशेष" होणार असली तरीहि जे जे झुंजारवीर त्या स्वातंत्र्यसमरांत झुंजत झुंजत कामास आले त्यांच्या प्राणज्योती मात्र आपल्या अितिहासाच्या आकाशांत "तेजस्वी ताऱ्या "सारख्या चिरकाल चमकत

राहाणाऱ्या आहेत. त्याच्या त्या वीरस्मृतीलाच काय तें " तेजस्वी तारे " हे पुस्तक मी आज कृतज्ञपणे समर्पित आहे.

हीं कालचीं तेजस्वी चरित्रें वाचतांना पाळावयाचें आजचें पथ्य

ज्या काळीं ब्रिटिशांनीं केवळ शस्त्रबळानें आपल्या राष्ट्रास पारतन्त्र्यात डाबून ठेविले होते, त्यावेळी ते परकीय सरकार अुलथून पाडून मातृभूमीची मुक्तता करण्यासाठींच क्रांतिकारक हे सशस्त्र अुठावण्याचा धुमाकूळ देशभर घालीत राहिले. त्यानीं परकीय सत्तेविरुद्ध स्वदेशातील नागरिक, पोलिस नि सैनिक अशा सर्व वर्गातून क्रांतिकारक प्रवृत्ति संचरवून त्या परकीय बंधनाना तोडून टाकणाऱ्या बेबंदशाहीचें थैमान मांडले सशस्त्र क्रांतिकारकांच्याच नव्हे तर नि:शस्त्र क्रांतिकारकांच्या चळवळीचाहि तोच परिणाम अपरिहार्यपणे होत राहिला. ज्या सर्वांच्या पराक्रमानी नि प्रयत्नानीं शेवटीं ब्रिटिशाची परकीय सत्ता अेका जागतिक महासंकटात सापडताच पिचून जाण्याअितकी खिळखिळी झाली, आणि राज्यक्रांति होअून आपला हिन्दुस्थान देश बहुतांशीं स्वतंत्र झाला, त्यावेळीं ज्या क्रांतिशक्तीने आपणास हें यश मिळवून दिलें तिच्या आणि त्या हुतात्म्यांच्या जयजयकारानीं आम्हीं दशदिशा दणाणून सोडाव्या हे आपले कृतज्ञ कर्तव्यच आहे ! तथापि त्या यशस्वी क्रांतिशक्तीनें प्राप्त झालेले हे आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य जर चिरस्थायी, जयिष्णु नि वर्धिष्णु करावयाचें असेल तर आपण प्रथमतः त्या क्रांतिकालात जनतेंत संचारविलेल्या क्रांतिकारक प्रवृत्तींचेंच तत्काळ विसर्जन केलें पाहिजे हा विरोधाभास असला तरी हें अेक अपरिहार्य असे कर्तव्य आहे. तें कसें ते स्वतः त्या क्रांतिकारकांचे मुकुटमणि असलेल्या वीर सावरकरानींच क्रांतीच्या भर धुमाळींत सन १९१० व्या वर्षी १८५७ च्या स्वातंत्र्यसमराविषयीं लिहिताना सांगून ठेवलेलें आहे. त्या त्यांच्या दूरदर्शी सावधानतेच्या सूचनेचाच अनुवाद अिथे दिला कीं पुरे.

वीर सावरकर लिहितात--"परकीय सत्तेच्या दास्यातून स्वदेशास सोडवून त्याचें स्वतंत्र स्वराज्य प्रस्थापिले जाताच क्रांतिकारकांनी आपली सर्व राजनीति तत्काळ पालटविली पाहिजे. परकीय राजवटीविरुद्ध सशस्त्र प्रतिकाराची, निर्बन्धभंगाची, अव्यवस्थेची, अराज्यनिष्ठेची नि अशांततेची जी क्रांतिप्रवृत्ति जनतेमध्यें क्रांतिकालात आपणच निर्मिलेली असते तिला सहकारी, निर्बंधशील (कायदेशीर), सुव्यवस्थित, नि स्वराज्यनिष्ठ अशा अन्तर्गत शांतिप्रवृत्तींत तत्काळ रूपांतरित केली पाहिजे. जेथे जेथें हे कठिण पण अपरिहार्य कर्तव्य करण्यास जनता अक्षम ठरली त्या त्या राष्ट्रांत यशस्वी झालेल्या राज्यक्रान्तीचा शेवट अन्तर्गत कलहानेच अराजकतेत झाला आणि तिने त्या नवोदित स्वातंत्र्याचाच बळी घेतला. स्वराज्यातील प्रस्थापित स्वकीय शासनसंस्थेशीं पक्षोपपक्षाचे कितीहि मतभेद झाले, तरी ते नैर्बंधिक नि वैध (Legal and Constitutional) मार्गांनींच मिटविले पाहिजेत. जनतेस तसा वाव प्रस्थापित शासनसंस्थेनें दिला पाहिजे आणि जनतेनेंहि त्या मर्यादेतच अंतर्गत राजकारण चालविलें पाहिजे. ज्या राष्ट्रास हे पथ्य पाळता येईल तेच राष्ट्र स्वातंत्र्यास नि स्वराज्यास खरोखरी योग्य होतें असें ठरेल."

हे आजचे पथ्य पाळूनच कालच्या अितिहासातील अेक तेजस्वी पान असलेले हे पुस्तक वाचकांनीं वाचावें, अशी माझी नम्र विनंति आहे.

गोरेगावकर चाळ क्र. २,
गिरगाव, मुंबअी क्र. ४

ग. पां. परचुरे

मीठ भाकर

शिलंगणाचें सोनें

या वैभवशाली चित्रांच्या पाठोपाठ

प्रभाकर पिक्चर्स

आणखी एक महान् ध्येयवादी कलाकृति

सामिमान जाहीर करीत आहे.

मीं दारू सोडली

(एक हृदयस्पर्शी सामाजिक कहाणी)

—भूमिका—

दुर्गा खोटे, बाबुराव पेंढारकर, चिंतामणराव कोल्हटकर,
चित्तरंजन कोल्हटकर, अंजनी व कु. शकुंतला

कथा -- दिग्दर्शन :—भालजी पेंढारकर.

— आगामी —

नायकिणीचा सज्जा

शककर्ता शिवाजी

निर्मितिस्थळ : जयप्रभा चित्रमंदिर, कोल्हापूर.

तेजस्वी तारे

स्वा० सावरकर-लिखित ग्रंथ

१८५७ चें स्वातंत्र्यसमर	१२-८-०
हिन्दुपदपादशाही	५-०-०
हिन्दुराष्ट्र-दर्शन	६-०-०
हिन्दुत्वाचे पंचप्राण	३-०-०
हिन्दुत्व	२-८-०
तेजस्वी तारे	२-०-०
सिंहगड	०-८-०
बाजी प्रभू	०-८-०
चाफेकर-रानडे	०-६-०
रानफुलें	२-०-०
कमला	१-८-०

ग. पां. परचुरे, प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४.

१. देशभक्त पं० शामजी कृष्णवर्मा

(श्रद्धानन्द : २६-४-१९३०)

Resistance to aggression is not only justifiable but imperative. Non-resistance hurts both altruism and egoism —*Hurbert Spenser*

सुप्रसिद्ध देशभक्त, स्वातन्त्र्यवादाच्या आद्य पुरस्कर्त्यांतील अेक अग्रगण्य पुढारी, निःशस्त्र प्रतिकाराचे प्रवर्तक आणि त्या निःशस्त्र प्रतिकाराचा स्वातन्त्र्य-संपादनकार्यी त्यांच्या अनुभवास आलेला फोलपणा पाहताच सशस्त्र क्रांतिकारकांच्या अभिनव-भारत-संस्थेशीं संबद्ध झालेले अेक अत्यंत प्रमुख पुढारी, ज्यांचे नांव अिंग्लंडच्या डोळ्यांत अेके काळीं शल्यासारखें खुपत होते, ते विद्वान, धनिक, समाजसुधारक आणि तत्त्ववेत्ते श्रीमान् पंडित शामजी कृष्णवर्मा हे मार्च १९३० मध्ये स्विट्झर्लंड येथें आपल्या वयाच्या ८० व्या वर्षाच्या जवळपास मृत्युमुखीं पडले, हे अैकून कोणाहि सहृदय आणि कृतज्ञ भारतीय देशभक्तास वाअीट वाटल्यावाचून राहणार नाहीं.

वाअीट वाटतें ते ते मृत्युमुखी पडले याचें अितकेंसें नाहीं. परंतु ज्या देशावर त्यांनीं अपरंपार प्रेम केलें, ज्याच्या स्वातन्त्र्यासाठीं, स्वदेशशत्रूंनीं सळो का पळो करून सोडल्यामुळें निर्भयपणें झोप घेता येअील अशी जागा या अुभ्या जगांत त्यांना सापडली नाहीं, आणि परदेशीं, परद्वारीं जन्मभर ज्या देशाच्या आणि स्वजनाच्या आठवणीनें झुरत झुरत ते मरणीं मरून गेले त्या देशास ते पुनः डोळे भरून पाहू देखील शकले नाहींत. ते

अेक

मरण्याचे आधीं तो देश स्वतंत्र झाल्याची बातमी देखील ते अैकू शकले नाहीत—अितकेच नव्हे—हाय ! हाय ! त्या देशास त्याचा अितका विसर पडला की, त्याच्या मृत्यूविषयीं कृतज्ञतेचा अेक अश्रुबिंदूहि गाळण्याची कोणास आठवण झाली नाही, आवश्यकता वाटली नाहीं याचे वाअीट वाटते ! दृष्टीआड ते सृष्टीआड ही या जगाची रीतच आहे. मंदिराच्या पाया-तील दगडाची कोणी विचारपूस करीत नाहीं—कळसाच्या दिखाअू दगडाचे दर्शन घ्यावयास हजारोंची दाटी अुडते ! पण ज्ञाता असतो, कृतज्ञ असतो, तो त्या कळसाची अुंची ज्यानीं आपल्या देहास भूगव्हराच्या भयंकर खोलीत पुरून घेत घेत शक्य केली, त्याच्या अज्ञात त्यागाची आठवण अधिक कृतज्ञतेने काढतो. शत्रूच्या तोफावर प्रथम चाल करून त्याची आग आपल्या जीवनाचे रक्त ओतून जे विझवून टाकतात ते रणात कामास आलेले सैनिक, रणांगणातून अुरून परत आलेल्या सैनिकांप्रमाणें, विजयोत्सवाच्या मिरवणुकींत मिरवत जाताना आढळत नाहीत. पण जे कृतज्ञ राष्ट्र आहे ते कोणाहि जिवत परत आलेल्या सैनिकाचा अुभारते त्याहून अनेक पटींनीं सन्मानपूर्वक पुतळा जो अुभारतें तो त्या विजयाचे आधीं आणि त्या विजयास्तव मरून गेलेल्या 'अज्ञात—वीरा'चाच होय—" The unknown dead ! " चाच होय !

पण ही गोष्ट कृतज्ञ राष्ट्राची, कृतज्ञ पिढीची आहे, आणि शामजी कृष्णवर्मा हे भारताच्या ह्या कृतघ्न पिढीत, ह्या दास्यहत, बुद्धिभ्रष्ट युगात जन्मले आणि मेले आहेत ! म्हणून ज्याच्यासाठीं ते झुरत, झिजत मेले त्याना आज त्याची आठवण देखील, ओळख देखील, अुरलेली नाहीं ! भारतीय क्रान्तिकारकाच्या पुढाऱ्याविषयीं भारतीयास पूर्ण विसर पडावा आणि साम्राज्य-मत्त अिंग्लंडच्या त्या कट्टर शत्रूस स्वजनाच्या सहानुभूतीचा देखील ओलावा मिळू नये अशीच अिंग्लंडची कुटिल राजनीति असते

आणि हिंदुस्थानसारख्या ह्या आत्मविसराळू, दास्यहत लोकात ती अशी सफलहि होते.

नाही तर पंडित शामजी, श्रीमती कामाबाअी, श्री. वीरेंद्रनाथ चटोपाध्याय, लाला हरदयाळ अित्यादि स्वदेशार्थ जन्मभर झिजत राहिलेल्या भारतीय क्रांतिकारक देशभक्तांची नावे आज येथल्या एका हंगामी प्रचारकाच्या अितकी तरी घरोघर स्मरली गेलीं असती. ती तशीं स्मरलीं जात नाहीत म्हणून त्यात त्या देशभक्तास काहीं अेक कमीपणा येत नाहीं— त्याना त्याची खंति वाटण्याचें काही कारण नाही. पण त्या कृतघ्नतेची आम्हाला मात्र लाजच वाटली पाहिजे !

पंडित शामजी यांचा जन्म कच्छचे अेका वैश्य कुटुंबात झाला. त्यानीं लहानपणी शिक्षणासाठीं घर सोडलें आणि लोकाचे घरीं अक्षरशः धोतरें बडवून, पाणक्यांचें काम करून त्यावर जें मिळेल तें खाअून विद्याभ्यास केला. त्यांच्या बुद्धिमत्तेमुळें त्यांची लवकरच आजूबाजूस अेक अत्यंत होतकरू तरुण म्हणून ख्याति झाली. अितक्यात त्या वेळेस सर्व हिंदुस्थानभर वेदोक्त धर्माचा डंका पिटीत जाणाऱ्या श्रीमान् स्वामी दयानंदांच्या भेटीचा योग शामजीस घडला. दयानंदासारख्या सूक्ष्मदृष्टि आचार्यांच्या दृष्टिपातातून असला कृतियुवक निसटून जाणे शक्यच नव्हते. लवकरच पंडित शामजी हे आर्यसमाजातील स्वामी दयानंदांच्या अत्यंत विश्वासू आणि कर्त्या मंडळात गणले जाअूं लागले. पंडित शामजींचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्वहि याच वेळी वाढलें. दयानंदजींच्या अनुरोधावरून पंडितजींनीं अष्टाध्यायीचा अभ्यास केला. दयानंदजींचा या आपल्या कर्त्या शिष्यावर अितका विश्वास बसत गेला की, ते मरतेवेळीं आर्यसमाजाची आणि स्वामीजींच्या अितर सर्व कार्यांची देखरेख करण्यासाठी त्यानीं जें विश्वस्त-मंडळ (Trustees) नेमलें त्यात पं. शामजींचेंहि नाव

होते. त्या वेळीं मोनिअर विल्यम्स यानीं ऑक्सफर्ड येथे अेक संस्कृतज्ञ पंडित हवा म्हणून दयानंदांकडे मागणी केली तेव्हा त्यानीं शामजींसच तिकडे धाडले. पंडितजीनीं अिंग्लंडमध्ये जाअून ऑक्सफर्डमध्ये बराच नावलौकिक मिळविला. तेथेंच लेक्चरर या नात्यानें अध्यापकत्वाचें काम केलें. नंतर लेखनकला आणि लिपीहि भारतीयानी परक्यापासून स्वीकारली म्हणून मागें जो अेक युरोपियन विद्वानांत वाद चालला होता, त्यात पंडितजींनीं भारतीयांच्या वतीनें भाग घेअून वेदांतील आधारावरूनच वेदकाळीं देखील भारतीयाना लेखनकला आणि लिपी याचें ज्ञान होते हें सिद्ध केलें. त्यांच्या या निबंधाचे युरोपीय विद्वानांत गौरवपूर्ण कौतुक होअून जर्मनीने त्यास "पंडित" ही पदवी दिली, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटाने त्यास "M A." चीं अुपाधी अर्पिली, निर्बंध–विद्यापीठानेंहि त्यास "बॅरिस्टर"चीं वस्त्रे दिली.

अशा रीतीनें आपल्या विद्वत्तेची कीर्ति विदेशातहि पसरवून ब्॰ पंडित शामजी हे हिंदुस्थानात परत आले. येताच अुदेपूरच्या महाराजानी त्यास आपले दिवाण नेमिलें. तें प्रधानपदाचे काम काही काळ केल्यानंतर त्यानीं बॅरिस्टरीहि केली. पुढें काठेवाडच्या संस्थानातहि ते दिवाणपद चालवीत होते. त्यांची पत्नी हीहि मुंबअीच्या अेका धनिक घराण्यातील महिला असून फारच दयाळू, थोर मनाची आणि त्यांच्या अंगीकृत स्वदेशस्वातंत्र्याच्या कार्यी अेकनिष्ठपणें त्यास सहाय्य करणारी खरीखरी सहधर्मचारिणी होती. पंडितजींवर सरस्वतीप्रमाणेच लक्ष्मीचाहि वरदहस्त असे. लाखों रुपयांची त्यांची मत्ता होती. हातीं प्रधानपदाची सत्ता होती, पदरीं कुठेहि बृहस्पतीसारखा सन्मान पावावा अशी विद्वत्ता होती—— पण पंडिजींच्या देशास स्वतंत्रता नव्हती. म्हणून ह्या सर्व वैयक्तिक अनुकूलतेतहि पंडितजींच्या मनास असमाधान वाटू लागलें. लोकमान्य टिळक

याच्यावर प्लेगचे गडबडींत १८९७ चे सुधीस जो खटला झाला, त्या योगें तर पांडिजींची आतल्या आत असलेली स्वदेशाविषयींची निष्क्रिय तळमळ त्याना अगदींच असह्य होऊं लागली. स्वामी दयानदाच्या अत्यत जाज्वल्य देशभक्तीचे तीर्थ पडितजी प्यालेले होते.

दयानंद सरस्वती हे पहिले राष्ट्रवादी—The First Nationalist होत, असें पडितजी नेहमीं म्हणत. पांडितजींच्या त्या राष्ट्रवादाचे स्वरूप त्याकाळीं असलेल्या प्रकट राजकीय पथाहून फारच पुढारलेलें होते. लवकरच त्याच्या काहीं वैयक्तिक कार्यामुळेंहि त्यास विलायतेस जाणें अवश्य झालें. तेव्हा हिंदुस्थानापेक्षा विलायतेच्या स्वतंत्र वातावरणात आपलीं हीं अत्यंत प्रागतिक राजकीय मतें आपल्यास अधिक प्रबळपणें प्रचारिता येतील असें वाटून त्यानीं ह्या राजकीय कार्यासाठीं अिंग्लडमध्येच स्थाअी होअून राहण्याचा सकल्प केला. त्या वेळीं प्रकट राजकारणात दादाभाअी नवरोजी याचा पक्ष—म्हणजेच राष्ट्रीयसभा पक्ष— हा प्रमुख होता. दादाभाअी हेहि अिंग्लडमध्येंच राहत तोवर नवरोजींचें प्रकटीकृत ध्येय म्हणजे देशाच्या राज्यकारभारात सुधारणा—आणि त्याहि ब्रिटिश अुदारता आणि भूतदया जागृत करूनच साधावयाच्या—हें असे. परतु पांडितजींनीं "होमरूल" हेंच हिंदुस्थानचें ध्येय असलें पाहिजे अशी घोषणा सर्वांच्या आधीं करून त्याचे सिद्ध्यर्थ 'होमरूल सोसायटी' आणि 'अिंडियन सोशिऑलॉजिस्ट' नावाचें पत्र काढले. अिंग्लंडमध्यें या पत्रातील अिंग्रजावरील अत्यत कडक टीकेमुळें आणि हिंदुस्थानला Home Rule म्हणजे ब्रिटिशाच्या साम्राज्यातील वसाहतींचें स्वराज्य हवें ह्या त्या वेळेस जवळ जवळ बडखोरीप्रमाणें वाटणाऱ्या मागणीमुळें अिंग्रजास प० शामजींची भीति आणि द्वेष राष्ट्रपितामह दादाभाअी नवरोजींहूनहि अधिक वाटू लागला. टिळकाच्या चळवळीमुळें जसे गोखले बरे असे सरकारास वाटे,

तसेंच शामजींच्या चळवळीमुळे दादाभाअी बरे वाटूं लागले. शामजींनी याच वेळी 'अिंडिया हाअुस' नावाचें वसतिगृह काढून त्यात स्वदेशभक्तीचे शिक्षण घेणारे आणि सरकारी नोकरी न करण्याची प्रतिज्ञा करणारे अशा हिंदी तरुणाची राहण्याजेवणाची स्वस्त सोय केली. त्याचप्रमाणें हजारो रुपये बाजूस ठेवून हिंदुस्थानातून तिथें येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आणि गृहस्थाकरिता शिष्यवृत्त्याहि ठेविल्या. याच शिष्यवृत्त्यापैकीं शिवाजी फेलोशिप श्री. विनायकराव सावरकर यास मिळाली आणि ते अिंग्लडमध्यें जाअून पडितजींच्या अिडिया-हाअुसमध्यें राहिले. पडितजींस बगाली व मराठी उत्तम येअी. गोविंदाच्या आणि सावरकर याच्या राष्ट्रीय कविता त्यास फार आवडत. ह्या वेळच्या अितर पुढाऱ्याच्या मानाने पडितजींचीं मतें किती पुढारलेली होती ह्याचें प्रत्यतर देण्यास अेवढी गोष्ट सागणे पुरे कीं, त्या वेळी अिंग्लडमध्यें गाधीजी 'God Save the King' हें अिंग्रजाचे राष्ट्रगीत भक्तिभावे गात फिरत आणि ब्रिटिशाना गाधीजी भक्तिपूर्वक 'राजे' म्हणून म्हणताच शामजीच्या तळव्याची आग मस्तकाला जाअून ते सावरकराच्या पोवाड्यातील चरण गर्जत:—'राजे ! घरात शिरला चोर तया मीं मानियला राजा !!'

होमरूल

श्री. सावरकर येअीतों पडितजीचे होमरूल हेंच ध्येय असे. आणि निःशस्त्र प्रतिकार हाच मार्ग असे. सरकारी नोकऱ्या आपण करण्याचें नाकारताच सरकार अशक्य होअील आणि अिंग्रज निघून जाईल हा त्याचा त्यावेळचा मुख्य कार्यक्रम होता. बगालमध्ये श्री. पालाची Passive Resistance म्हणजेच निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ निघून, सरकारी शाळा, सरकारी पदव्या, सरकारी नोकऱ्या, सरकारी कोर्टें यावर बाहिष्कार घालून शेवटीं सरकारी करहि देण्याचें नाकारलें असता विनारक्तपात

सहा

वसाहतीचे स्वराज्यच काय, पण स्वातंत्र्यहि मिळू शकेल अशी ग्वाही देण्यात येअू लागली. हा कार्यक्रम आणि पंडितजींचा कार्यक्रम एकच होता. ह्याच कार्यक्रमात दहा पाच तात्त्विक परिभाषेतील पण पोकळ अर्थाच्या अगडबंब शब्दाची भेसळ होअून आज त्यास Non-Violent Non Cooperation अनत्याचारी असहयोग हें नाव पडलें आहे. सरकारशीं असहयोग करताच अिंग्रज हिंदुस्थान विनाशस्त्र-प्रतिकारानें सोडतील ह्या निःशस्त्र-प्रतिकाराच्या कार्यक्रमालाहि त्या वेळची राष्ट्रीय-सभा अत्यंत भयंकर समजत होती. परंतु शेवटीं दादाभाई नवरोजींनीच कलकत्यास वसाहती स्वराज्य (होमरूल—Home Rule) हेंच हिंदुस्थानचें ध्येय होय, असें जेव्हा घोषित केले तेव्हा त्या ध्येयासरशी ती राष्ट्रीय सभा नवीन पक्षाचीच अंकित झाली. राष्ट्रपितामह दादाभाअी ह्यानी हें जें साहस केलें आणि त्या वेळच्या नेमस्त पक्षाला तितकें पुढे जाणे जें भाग पडलें, तें हिंदुस्थानातील “ लाल, बाल, पाला ” च्या चळवळीचा जितका परिणाम होता तितकाच पंडित शामजींच्या अिंग्लंडमधील चळवळीचाहि होता. कालमानाप्रमाणे लोकमान्य स्वतः होमरूलचा अुच्चारहि केसरींत करीत नसत. परंतु पंडित शामजींनीं Home Rule संघ अिंग्लंडमध्यें स्थापन करताच त्या संधीचा लाभ घेअून हिंदुस्थानच्या चळवळीस तितकें पुढें रेटण्यास लोकमान्यानीं क्षणाचाहि विलंब होअू दिला नाहीं. केसरींत पंडितजींच्या नव्या चळवळीवर लेख लिहून तीस लगेच अुचलून धरलें.

अभिनव-भारत

परंतु श्री. सावरकर हे अिंडिया हाअुसमध्यें जाताच आणि ह्या अत्यंत पुरोगामी समजल्या जाणाऱ्या होमरूल–संघासहि मागें टाकणारी नि अगदीं फिके पाडणारी क्रांतिकारक चवळवळ चालू होताच पंडितजींच्या राजकीय मताचा विकास झपाट्यानें होत गेला. सावरकराच्या स्वातंत्र्य

Absolute Political Independence चेच ते अभिमानी झाले. अर्थात् तें होमरूल नाव देखील त्यानीं बदलून टाकिलें. तीच स्थिति साधनाच्या प्रश्नाविषयींहि झाली. १८५७ चें बड हें काही मूर्ख आणि धर्मभोळ्या शिपायाचें बड होते, त्यात राष्ट्रभक्तीचा किंवा स्वातंत्र्याचा गधहि नव्हता हे पाडितजींचें—त्या काळच्या सर्वच लोकाप्रमाणें सरकारी अितिहासानें न कळत अगात टोचलेलें—मत असल्यामुळे, मत्तावनच्या स्वातंत्र्यवीराच्या स्मृतींचा प्रथमोत्सव प्रत्यक्ष अिंडिया हाअुसमध्येच सावरकराच्या अनुयायानीं केला. ह्याचा पाडितजींस मोठाच विषाद वाटला. पण ते अेक प्रामाणिक देशभक्त होते. सत्य कळल्यावरहि, तुमचा कोटिक्रम निरुत्तर करणारा आहे खरा, पण तरीहि 'मला असेच वाटते' किंवा 'माझा अतरात्मा मला असें सागत नाहीं' असें काहींतरी बकणारे हट्टाग्रही नव्हते. किवा अमक्यानें म्हटलें म्हणून जे मानले नाही तें जणू काय आपणच पहिल्यानें म्हटलें असें दाखवून मग मात्र तेंच स्वतःचें म्हणून आचरणारे मिथ्याचारी नव्हते. त्यास लवकर नि:शस्त्र प्रतिकारानें स्वातंत्र्य मिळू शकणार नाहीं असें स्पष्ट दिसू लागलें. अभिनव भारताच्या धाडसी अुठावणीमुळें अिंग्लडभर जी प्रचड खडबळ माजली, अभिनव भारताचीं दहावीस मुले देखील सरकारास अितकीं सळो का पळो करून सोडतात हे पाहून पाडितजींस त्याच्या मार्गाविषयीं जो अनुभवजन्य विश्वास आणि परिणामकारकता पटू लागली, त्यायोगें ते दोन वर्षांचे आतच अभिनव भारतीय आदोलनाचे कट्टे पुरस्कर्ते बनले. अिंग्रज लोक सावरकराच्या चळवळींशीं पाडितजींचें सहकार्य प्रकटणें सुरू झाल्याचे पाहून अतिशय चिडले. पार्लमेंटमध्यें आणि वृत्तपत्रातून धडाधड प्रश्न होअू लागले कीं, शामजी कृष्णवर्मास सरकार अशी भयकर आणि अपराधी चळवळ करण्यास किती दिवस मोकळे सोडणार आहे? पण त्या चाणाक्ष पाडितानें त्या

प्रश्नाचें अुत्तर सरकारने देण्याचे आधींच देअून टाकलें. एके रात्रीं कोणास काहीं पत्ता नसताना पंडित पारीसला निघून गेले. त्याचे पैसे त्याच्या आधींच अिंग्लिश बँकातून फ्रान्सातल्या बँकात गेलेले होते. पंडितजींस प्रथम भारी विश्वास असे की, अिंग्रजानीं हिंदुस्थानात काय वाटेल ती दडपशाही केली तरी अिंग्लंडमध्यें ते उदार मताचेच (Liberalism) पुरस्कर्ते राहाणार आणि मॅझिनी आदि प्रकरणाप्रमाणें आपल्या देशभक्तीचें कौतुकच करून आपलें व्यक्तिस्वातंत्र्य नुसत्या मतासाठीं हिरावून घेणार नाहींत. पण ह्या उलट आलेल्या स्वतःविपर्यीच्याच अनुभवावरून पंडितजींचा अिंग्रजाच्या चांगुलपणावरील विश्वास पार मावळला, आणि अर्थातच त्या चांगुलपणावर किंवा अिंग्लिश माणुसकीवर अवलंबून असणारें नुसत्या असहयोगाचे अथवा निःशस्त्र प्रतिकाराचे फोलपण पाहून ते सशस्त्र क्रान्तिवादाचे पुरस्कर्ते बनले. ते पारिसला गेल्यावर तर अिंग्लंडमध्ये अभिनव भारतानें सावरकरांच्या नेतृत्वाखालीं भयंकर धुमाकूळ मांडला. बॉम्बची विद्या ते तरुण शिकले. धिंगराने सर कर्झन वायलीचा भर लंडनमध्यें वध केला, तेव्हा तर अिंग्लिशाची मानहानी आणि हिंदी देशवीराच्या धैर्याचा आणि प्राणासहि कस्पटाप्रमाणे मानणाऱ्या हुतात्मतेचा गौरव अुभ्या युरोपभर गाजू लागला. पंडितजींनीं या कार्यास गुप्तपणें अर्थसहाय्य केलें अस-ल्याचा सर्वत्र बोभाटा होताच. त्यातहि पंडितजींच्या पत्रातून धिंगराचा गौरव केला गेला आणि त्यास अुघड अुघड हुतात्मा म्हणून गौरविण्यात आलें, तेव्हा अिंग्लंड चवताळून गेले. पण करणार काय ? पक्षी पिंजऱ्या-तून अुडून गेलेला ! अिंग्लंडला त्यानीं परत यावे म्हणून त्यास भुलविण्यात आलें. भ्याड म्हणून चिडविण्यात आलें. याविषयीं गोष्ट निघाली म्हणजे आपल्या फ्रान्सच्या वाड्यात सुखरूपपणे बसत, आपली ती भव्य मान हलवीत आणि तो डौलदार भरभक्कम देह झुलवीत झुलवीत हसून ते

म्हणत, "अिंग्रजाच्या हातावर तुरी देअून अेकदा पंडित शामजी जो निसटला तो आता पुन्हा असा का फसणार आहे! आता "न गगदत्त पुनरेति कूपम्!"

पंडितजींनीं आपल्या देशाच्या दास्यमोचनार्थ स्वतःचे हजारों रुपये व्यय केले. इंडिया हाअुस, हजारों रुपयाच्या शिष्यवृत्त्या, क्रांतिकारक आंदोलनार्थ दिलेलें द्रव्यसहाय्य, हें सर्व त्यांच्या उदारतेचें चिह्न आहे. त्यावाचून त्यांना ज्याच्या तत्त्वपद्धतीचा अत्यंत अभिमान असे त्या स्पेन्सरच्या नावानें त्यांनीं ऑक्सफर्डमध्यें शिष्यवृत्त्या स्थापण्यास आणि फ्रान्समध्यें सीन नदीच्या महापुरात नागावलेल्या फ्रेंच लोकास सहाय्य म्हणूनहि हजारों रुपये दान दिले. अशा दानी पुरुषासहि कृपण म्हणण्याची जी अेक टूम निघाली होती, ती त्यांच्या कृपणतेचें चिह्न नसून त्यास कृपण म्हणणाऱ्यांच्या कृतघ्नपणाचे किंवा लहाडीपणाचेच द्योतक होतें. ज्यानें हजारों रुपये देशकार्यार्थ दिले, त्यास त्यानें लाखो दिले नाहींत म्हणून कृपण म्हणणें हे ज्यांनें लाखों रुपये दिले असतील किंवा देशसेवेंत जे शामजींअितके कष्टले असतील त्यास अेक वेळ शोभेल. पण स्वःतला हवी होती तितकी भीक शामजींनीं त्यांना घातली नाहीं म्हणूनच शाम जींच्या नावानें बोटे मोडणारे जेव्हा शामजींस कृपण म्हणतात, तेव्हा ते स्वतःच्याच भिकारड्या हीनतेचें आणि हताश मत्सराचें प्रदर्शन करतात— पंडितजींच्या नव्हे. त्यास पैसाच हवा असता तर अिंग्लंडमध्यें अिंग्रजाचे पोवाडे गाअून अेकाद्या राजाचें विलासी अैश्वर्य त्यांना सहज भोगता येतें. पण प्रबळ देशशत्रूशीं अुघड विरोध करून, आपला जीव धोक्यात घालून, वृद्धावस्थेंतहि ज्यानें विदेशीं दारोदार भटकत, फिरत केवळ आपल्या स्वदेश स्वातंत्र्यार्थ, ह्या हालअपेष्टा भोगल्या त्याच्या मनाचा हा मोठेपणा, हें आत्म्याचें औदार्य हें काय कार्पण्याचें लक्षण आहे? या औदार्याचें मूल्य

पैपैशानीं का मोजता येणारें आहे ? आणि येत असेल तर त्या त्याच्या देशस्वातंत्र्यार्थ भोगलेल्या कष्टाचें आणि केलेल्या सेवेचें मूल्य लाखो रुपयाहून अधिकच नाहीं काय ? आणि म्हणूनच अशा देशनिर्वासितामधील थोरातील थोर पुरुषास कृपण म्हणणे म्हणजे कृतघ्नताच नाहीं काय ?

रागारागानें अिग्लंडने पंडितजींची बॅरिस्टरीची पदवी काढून घेतली, अेम्. अे. ची पदवी छिनली, त्याचा जीव घेतला जाअील अशा निनावी धमक्या त्यास दिल्या गेल्या, आणि सगळ्यात भयंकर सूड म्हणजे पंडितजींस निरंतरच्या देशनिर्वासाची अप्रत्यक्ष शिक्षा भोगावयास लावली ! महायुद्ध चालू झाल्यावर पंडितजींस फ्रान्समध्येंहि राहणें धोक्याचे होऊन ते स्विट्झर्लंडला गेले आणि तिथेंच या थोर पुरुषाचा अंत झाला.

त्याच्या देशशत्रूने त्याना देशपारीची शिक्षा दिली आणि त्याच्या देशानेंहि त्याना स्मृतिपारीची शिक्षा दिली ! त्यानीं केलेल्या सेवेची ह्या आम्हीं, त्याच्या कृतघ्न देशबंधूनीं, आठवण देखील काढिली नाही, त्याची अेका शब्दानेंहि विचारपूस केली नाहीं. स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्रथम झुंजत आणि नंतर झुरत, हा थोर भारतीय निर्वासित जेव्हा स्विट्झर्लंडमध्यें दुसऱ्याच्या दारी ८० व्या वर्षी वारला, तेव्हा त्याच्या राष्ट्रीय मातृभाषेत त्याने ज्याचा निरोप घ्यावा असा स्वजन त्याच्याजवळ अेकहि नव्हता ! !

पंडित शामजींचा देश जर आज स्वतंत्र झाला असता, तर त्याचें मरण देखील त्यास सुखावह झालें असतें. तरी देखील ह्या पंचवीस वर्षांपूर्वी ब्रिटिश साम्राज्याचा पंडितजी धिक्कार करीत असता जे लोक I proudly declare my loyalty to British Empire म्हणून वल्गना करीत, त्या ब्रिटिशाकरिता बोअर आणि झुलू याच्याशी लढत, तेच आज पंडित शामजीच्या त्याच भाषेत ब्रिटिश साम्राज्याचा धिक्कार करीत

आहेत, आणि पंडितजींच्या स्वातंत्र्याच्या ध्वजाखालीं झुजत आहेत ही भारताची मानसिक क्रांति तरी त्यांनीं यशस्वी झालेली पाहिलीच आहे. तीवरून तरी ती वास्तव क्रांतीहि आज ना उद्या यशस्वी झाल्यावाचून राहणार नाहीं अशा आशेनें त्यांच्या मृत्युशय्येची उदासीनता थोडी तरी हलकी झाली असेल काय ?

---

२. बालमुकुंद आणि लज्जावती

(श्रद्धानन्द : १८-५-१९२९)

महाराज पृथ्वीराजानंतर हिंदुसाम्राज्य-भंगामुळे जणूं संतप्त झालेल्या दिल्लीच्या सिंहासनाला रक्ताची तहान वारंवार लागत असते. त्या सिंहासनाला जो जो कोणी पाय लावूं पाहातो, त्याला त्याला रक्त सांडावें व सांडवावें लागत आहे. बंगालच्या फाळणीनंतर राष्ट्रभक्तीच्या प्रचंड वावटळींत कलकत्त्याची राजधानी जेव्हां हेलकावे खाऊं लागली तेव्हां दिल्लीला राजधानी आणली गेली. लॉर्ड हार्डिंग्ज हे त्या वेळीं गव्हर्नर जनरल होते. राजप्रतिनिधि या नात्यानें दिल्ली राजधानी करून दिल्लीच्या सिंहासनाकडे जाण्यासाठीं त्यांनीं मोठ्या थाटमाटांत-मोठमोठ्या राजेमहाराजांना अथवा जगांतील अुर्वरित नराधिपतींनाहि हेवा वाटावा अशा राजवैभवसंपन्न देखाव्यात-दिल्लीप्रवेशाचा समारंभ करविला. दिल्लीच्या राजमार्गांतून राजवैभवयुक्त थाटमाटानें परंतु अंतःकरणांतील असुरक्षितीच्या बोचणीमुळें अवश्यक झालेल्या सैनिक पोलिसांच्या संरक्षणांत लॉर्ड हार्डिंग्ज दिल्लींत मिरवत होते. सहस्रावधि गोरे नि काळे सैनिक आपापल्या तलवारी, रायफल्स नि बेयोनेटें वातावरणांत चकाकवीत त्या मिरवणुकींत अिंग्रजी साम्राज्याचे जयघोष करीत आणि त्यांच्या दराऱ्याचें प्रदर्शन करीत चालले होते. राजेरजवाड्यांच्या हत्तींवरील अंबाऱ्यांतून राजेमहाराजे व्हाअिसरायच्या अंबारीमागें मिरवत होते.

तेरा

दिल्लीच्या राजमार्गातून राजसिंहासनाकडे अशी ती प्रचंड मिरवणूक जात असता, अकस्मात् आकाशातून वज्र पडावें त्याप्रमाणें कडकडाट झाला नि अेक भयंकर बॉम्ब अगदी टिपून, हत्तीवरील अंबारींत गर्वोन्मत्त-पणे बसलेले गव्हर्नर जनरल व्हाअिसराय लॉर्ड हार्डिंग्ज याच्यावरच येअून पडला! त्या धडाक्यासरशी लॉर्ड हार्डिंग्ज रक्ताच्या थारोळ्यात लोळू लागला. माहूत ठार झाला. तक्षकानें अत्यंत सुरक्षित स्थळीं बसलेल्या परीक्षितीला जसा अकस्मात् कडकडून दंश केला तसाच कोण्यातरी भारतीय क्रांतिकारकाने बॉम्ब फेकून सूड घेतला! जिकडे तिकडे 'बाँब'! 'बाँब' म्हणून आरडाओरड झाली. पळापळ झाली. मिरवणूक अुधळली गेली! सिंहासनारोहणाचा समारंभ रहित झाला!!

हें भयंकर कृत्य कोणी केलें असावे याविषयीं चोहोंकडे तर्कवितर्क सुरू झाले. सरकारी गुप्तचर-विभागाला अत्यंत महत्त्वाचें काम मिळालें व बॉंब फेकणारा व त्याचे साथीदार यांचा शोध मोठ्या निकरानें सुरू झाला.

गुप्त आक्रमक कोणत्या तरी अेखाद्याच स्थलीं असतात. अेखाद्या ठिकाणातूनच दबा धरून ते आक्रमण करतात. असलें अेखादे रक्त साडवासाडवीचें भयद कृत्य करण्याचें व दडी मारण्याचे कोठलें तरी अेकच स्थान असूनहि हे गुप्त क्रांतिकारक कोठें असतील व कोठे नसतील याविषयीं मोह पडून परकीय अधिकाऱ्यांचीं मने अत्यंत त्रस्त व भयग्रस्त होतात. ते त्यांना दशदिशा शोधू लागतात. साप साप म्हणून ते जिकडे तिकडे भुअी झोडपू लागतात.

तसेच या दिल्ली-बॉंबप्रकरणींहि झालें. सरकारी अधिकाऱ्यांना अपराधी न सापडणें हे दुष्कीर्ति करणारें व असुरक्षिततेचें कारण होअून बसत असते. खरा अपराधी अशा संशयग्रस्त मनःस्थितीत सापडतोच असें नाही. कधीं कधीं संशयाच्या अतिरेकानें अनेक अनपराधी देखील त्या संशयी

शोधाला बळी पडतात. या बॉंबच्या प्रकरणात अनेक तरुण पकडले गेले व शिक्षापात्र ठरले.

आजच्या आपल्या कथेचा नायकहि त्यापैकींच अेक होता. या तरुणाचें नाव "बालमुकुद". पजाबचे प्रख्यात देशभक्त भाअी परमानद याचा हा चुलतभाअू. भाअीजींचे घराणेच हुतात्मतेचे घराणें झालेलें आहे. अवरगजेबाच्या क्रूर धर्मवेडाला बळी पडून भाअीजींचे पूर्वपुरुष महान् हुतात्मा मतीदास हे करवतीने डोक्यापासून खालपर्यंत अेखाद्या लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे प्रत्यक्ष कापले गेले या धीरात्म्याचा हा वश. भाअीजीनें अदमान भोगले आहे हे सर्वश्रुत आहेच. त्याच्या या 'बालमुकुद' नामक चुलतभावाला वर वर्णन केलेल्या बॉंबच्या फेकीच्या अपराधाचे सबधात फाशीची शिक्षा झाली! बॉंब, अगदी तरुण असलेल्या त्या क्रातिकारकानेच फेकलेला होता.

तो पकडला जाण्याच्या अेका वर्षापूर्वीच अेका अनुपम सुदर कुमारीशीं त्याचा विवाह झाला होता. त्या कुमारीचे माहेरचे नाव रामरखी होतें व विवाहानतर सासरी तिचें नाव लज्जावती ठेवले गेलें. तो पकडला गेल्यावर काय काय झाले याविषयीचे वर्णन देवी लज्जावतीने स्वतः जितकें सागितलेले अुपलब्ध आहे तितके तिच्याच शब्दात देत आहोंत. लज्जावती म्हणते—

"अुन्हाळ्याचे दिवस होते. ते बदीत होते— मी घरीं होते. ६ महिनेपर्यंत मी अेका भाग्यदायी घटकेची वाट पाहात होतें. लोक मला सागत, 'तू घाबरी होअू नकोस, ते सुटतील व घरीं येतील.' मी म्हणत होते, 'तो सुदिन केव्हा येणार? ही दुर्दैवाची रात्र केव्हा सपणार? माझा भाग्यरवि पुनः अुदयाचलावर केव्हा येणार? ती शुभ वेळा केव्हा दिसेल?'

"मी दिल्ली कधी व कशाला पाहणार! परंतु त्याना दिल्लीस ठेवलें

होतें. खटला तेथें चालला होता. मी तेथे पोहोचले. पाहिले, बदीची कोठी फार भयानक आहे! त्या अगदीं लहान व कुद खोलींत त्याना (तिच्या त्या तरुण वीर पतीला) श्रावण भाद्रपदाच्या (आपल्या अिकडे ज्येष्ठात जसा अुन्हाळा असतो तसाच तिकडे श्रावण-भाद्रपदात असतो.) अत्यत अुष्णतेच्या काळात दिवस काढावे लागत मीं विचारलें, 'काय, निजायला चारपायी (खाट वा बाज) मिळते का?'

"सागू लागले, 'कशी वेडी आहेस! येथें चारपाओचें काय काम?'

"मी म्हणालें, 'तर मग निजता कशावर?'

"ते म्हणाले, 'अेक कांबळी जमिनीवर टाकून निजून राहातों.'

"मी घरी परत आले. रात्रीं घरीं मडळी मोकळया छतावर वा गच्चीवर चारपाओ टाकून निजली. मी घरातील तळाच्या (खोलींत) कोठींत शिरलें. अेक कांबळी भुअीवर आंथरली व त्यावर निजलें. चोहो बाजूंनी डासाची भुणभुण सुरू झाली. कानाच्या आजूबाजूला घुमू लागले. 'मूर्ख, असल्या कोठींत का कोठे झोप येत असते?' असे म्हणत मला ते डास वेडावीत आहेत असे वाटू लागले! मी अुठून बसलें. अेका खिडकीतून चद्रकिरणें आत येत होतीं. मी डोकावून चद्रदर्शन घेतले व त्याला विचारले, 'काय चमकनेवाला! तू त्याच्या कोठीतही चमकतोस का? अशाच प्रकारें जागत व या कुशीवरून त्या कुशीवर होत होत ते कशी रात्र काढतात हें तूं पाहिलेस का?'

"चद्रम्याकडे वारवार पाहून सुद्धा अुत्तर मिळालें नाहीं. रात्रभर डासानीं अंग खाअून घेतलें. अगावर गाधी आल्या. दुसऱ्या दिवशीं अशाच प्रकारें मी निजले व डासानीं हल्ला चढविला. अितक्यात माझी मैत्रीण आली व म्हणू लागली, 'काय मरायला निघालीस का?' मी म्हणालें, 'मी कशानें मरेन?' ती म्हणाली, 'हीं चिह्नें तर मरणाचींच आहेत!' मी म्हणालें,

'काय, याप्रमाणे जे निजतात —— ' मैत्रिण मध्येंच म्हणाली, 'हो ! हो ! मरतात तर काय ?' माझे डोळे भरून आले. अश्रू गळू लागले. मैत्रिण स्तब्ध झाली आणि आपल्यालाच दोषू लागली. मीं म्हटलें, 'कोणाचा काहीं दोष नाहीं. माझे भाग्य फुटले आहे ते बर्दीत जसे निजतात, काय......त्याप्रमाणें मी नको निजू ?'

"मला पुन्हा त्याच्या भेटीची अनुमति मिळाली. पुन्हा मी दिल्लीला गेलें. यावेळीं मी विचारलें तेव्हा ते म्हणाले, 'मला अेकच वेळ खायला मिळतें.' मीं विचारले, 'रोटी कशी असते ?' त्यानीं रोटीचा अेक तुकडा मला दिला. मी तुकडा घेअून परत आलें त्यात गहू होते, चणे होते, व आणखीहि काही पदार्थ मिसळले होते. मीहि घरीं तशाच प्रकारची भेसळ बनाविली व ती दळून त्याची रोटी खाणें सुरू केले.

"असे कित्येक महिने गेले. अतीं अेक दिवस मी आपल्या कोठीत बसले असता बाहेरून रडण्याचा ध्वनि अैकू आला माझें हृदय धडधडू लागलें, डोक्याला घाम आला, पण जीव मुठींत धरून बाहेर आलें व पाहाते तो त्याचें नाव घेअून 'फाशीची शिक्षा, फाशीची शिक्षा झाली ! !' हे शब्द अैकू आले.

"त्याचें अंतिम दर्शन घेण्यासाठीं मी पुन्हा दिल्लीला गेलें ज्या बर्दीत तरुणाचें तारुण्य नष्ट होते, सुकुमार व मृदु अंतःकरणें करवतलीं जातात त्या बर्दींत पोचले, दर्शन घेतलें. अंतःकरण सांगत होतें काहीं बोलून घ्यावें ! ओठ सांगत होते, आम्हास अडवून धरण्याचे सामर्थ्य नाही— अितक्यात त्याचे ओठ हालले.

"ते म्हणाले, 'प्राणप्रिये ! जो प्राणी जन्माला आला त्याला अेकना अेक दिवस जावेंच लागणार ! कोणी कोणाला सोबत होअू शकत नाहीं !

तू आपल्याला भाग्यवती समज कीं मी देशहिताकारिता आपली स्वतःची आहुति देत आहे ! ! !'

"माझ्या कानानें हे शब्द अैकले नाहींत तोंच डोळे अश्रू ढाळू लागले. डोळ्याचे अश्रू थांबेनात.. त्या अश्रूमुळें त्याचें मनसोक्त मुखावलोकन देखील मला करता येअीना ! पुष्कळ प्रयत्न केला, परतु अश्रूंनीं यथेच्छ दर्शन करू दिलें नाहीं.

"दुसरे दिवशीं हवनसामग्री अेकत्र केली गेली. लोक बोलू लागले कीं त्याचा अत्येष्टिसस्कार आज होईल. मीं म्हटलें, फार सुदर सधि आली. आता मी त्याना जाअून मिळेन. परतु थोड्याच वेळात अैकले, त्याचें प्रेत अधिकारी देत नाहींत !

"मग काय झाले, मी पुढें सागू शकत नाहीं. आज पधरा दिवस मी व्रतस्थ आहें. आता घटिका भरत आली...आता माझे मनोरथ पूर्ण होणार !"

अितकें म्हणून देवी लज्जावती चूप झाली. देवींनें अन्नाचा कण किंवा पाण्याचा थेंब तोंडात घातला नाहीं. याप्रमाणें अठरा दिवस गेले. अेक्या स्थलावर आसनस्थ होअून ज्या मूर्तीवर तिचें ध्यान आकर्षण झालेले होतें त्या ध्यानात निमग्न होअून स्थिर होती. तिनें तपस्या पूर्ण केली. अतिम दिवशीं सूर्यबिंब पूर्ण तेजानें प्रकाशत होतें. लोकानीं आपापल्या कार्याला आरंभ केला. देवी आपल्या आसनस्थ स्थानावरून अुठली. स्वतः स्वच्छ पाणी आणलें...स्नान केलें. स्वच्छ वस्त्र परिधान केलें आणि ध्यानस्थानीं अग टाकलें. म्हणाली, "प्रिया ! फार दिवस आपण माझी परीक्षा पाहि-लीत. आज तर आपला सापडता हात सोडणार नाहीं...आता विभक्त नाहीं राहू शकणार !" अितकें म्हणून तिनें आपले प्राण खेंचून घेअून

देहत्याग केला अिच्छापूर्वक देह सोडला!!! साध्वी लज्जावतीनें देशभक्त हुतात्मा पति बालमुकुंदाशीं अेकरूप होण्यासाठीं परलोकाचे देवद्वार स्वेच्छाबलानें अुघडून स्वर्गी प्रवेश केला! याला म्हणतात सती जाणें!

धन्य ती साध्वी, धन्य तो स्वार्थत्यागी हुतात्मा, आणि ती हिंदु जाति त्रिवार धन्य कीं जी अशा दिव्य व अलौकिक मनुष्यरत्नाना जन्म देते!

३. देशवीर शचीन्द्रनाथ संन्याल

(शरद्धानद : १-९-१९२७)

काकोरीचे क्रान्तिकारक

‘ तुम्हास स्वार्थाचा लवलेशहि शिवला नव्हता. तुम्हीं जें जें केलेत तें ते स्वदेशासाठींच केलेंत. ’—न्यायाधीश.

आज अुणी पुरी दोन वर्षे होअून गेली. अुत्तर हिंदुस्थानात लखनौ नगरामध्यें काकोरीच्या राजकीय कटाचा खटला चाललेला आहे. वर्षोन् वर्षे त्या खटल्यातील अभियुक्तास कारागारातील कच्च्या बदींत डाबून ठेवून रेंगाळत रेंगाळत शेवटी त्याचा निवाडाहि झाला. त्या निवाड्यावर औधच्या हायकोर्टात अभियुक्ताच्या वतीने व सरकारच्या वतीने अपील करण्यात आलें असता काहीं आरोपींस सेशन कोर्टाने दिलेल्या शिक्षापेक्षाहि भयकर व अमानुष शिक्षा देण्यात आल्या आहेत. पकडल्यानतर राजकीय कटाचे आरोप असलेल्या बहुतेक बादिवानास प्रथमतः कच्च्या बदींतच वर्षवर्ष सडत पडावे लागते. पुढें ज्या दहा दहा वीस वीस वर्षाच्या भयंकर शिक्षा भोगाव्या लागतात त्या पुनः निराळ्याच. जरी अेखादा दुसरा राजकीय बदिवान सुटला, तरी या कच्च्या बदीतच त्याला अितके दिवस खडावे लागतें आणि हाल सोसावे लागतात की, जितक्या दिवसात अेखाद्या चोरास दीड दोन वर्षाची आपली सगळी शिक्षा भरून सुटता येते.

अेखाद्या चोरासारख्या अपराध्यास जी शिक्षा म्हणून भरावी लागते, ती अेखाद्या निरपराध नागरिकास, राजकीय कटाचा नुसता संशय त्याचेवर पडला म्हणून, भरावी लागते. त्यामुळे पुढे तो निर्दोषी म्हणून सुटला तरी त्यास या अन्य प्रकारे हा भुर्दंड विनाकारण सोसावा लागलेलाच असतो. अशा रीतीनें, सरकारच ज्याला पुढे निरपराध म्हणून ठरविते, त्याला दीड दोन वर्षांची शिक्षा सरकारच भोगावयास लावते राजकीय कटाचे नाव काढताच त्याच्या वाऱ्यासहि न अुभ्या राहिलेल्या जनतेसहि त्या विषयाचा दरारा वाटावा या अुद्देशाने ही रीत कुटाळ राजनीतीने पाडली असली तथापि ती निंदनीय आहे अितके स्पष्टपणे सांगून ठेवण्यास तरी कशाचीहि हरकत नाही. हे कटाचे खटले असे रखडत जे ठेवावे लागतात, ते बहुधा निष्कारण आणि सहेतुक ढिलेपणानेच असतात, अशी शंका येण्यास प्रत्येक कटाचे खटल्यात अनेक प्रसंग आढळून आलेले आहेत.

तथापि काकोरीच्या खटल्यात अितर कटाचे खटल्याप्रमाणे आरोपीपासून कथने आणि माहिती बलात्काराने काढण्यासाठी धाकदपटशाचा किंवा त्याहूनहि निर्दय प्रकारचा सैतानी जाच झाला असल्याचा बोभाटा आरोपीच्या वतीनेहि फारसा अैकू येत नाही ही गोष्ट विशेष आहे. महाराष्ट्रात, बंगाल्यात आणि पंजाबात आजवर जे मोठमोठे कटाचे खटले झाले, त्यातील बहुतेकात आरोपीतील बहुतेक प्रामाणिक आणि सुशिक्षित गृहस्थानीं अशा प्रकारचे आरोप सरकारी अधिकाऱ्यावर अुघड अुघड न्यायालयांत केले होते. काकोरीच्या खटल्यात तसे आरोप सरकारच्या पोलिस अधिकाऱ्यावर झालेले आमच्या वाचनात आलेले नाहीत. ही आम्ही वाचलेल्या माहितीवरून आढळून आलेली गोष्ट जर खरी असेल तर ती पोलिस अधिकाऱ्यास भूषणावह आहे यात शंका नाही

परतु त्या खटल्यात जे आरोपी गसवले होते त्यानीं मात्र ती गोष्ट अशीच घडून येअील अशी आशा तिळमात्र ठेविलेली नव्हती. ज्या वेळेस आपल्या मातृभूमीच्या स्वातत्र्यार्थ अितर मार्ग सुचेनासे झाल्यामुळे त्यानी आपलें शिर आपले हातावर घेअून सशस्त्र-क्रातीच्या भयकर दिव्यात प्रवेश केला, तेव्हाच त्या साहसी आणि शूर लोकानी ही खूणगाठ बाधून ठेविली होती कीं, या मार्गात पुढे-मागे आपणास न्यायाच्या आणि अन्यायाच्या अशा अुभयविध जाचास आणि छळास, देहदडास आणि मृत्युदडास तोड द्यावेच लागणार! प्रथम प्रथम जेव्हा क्रातिकारकाचे खटले सुरू झाले, तेव्हा अशा खटल्यात पोलिसाचा नैर्बधिक आणि प्रसगीं अनैर्बधिक छळहि कसा सोसावा लागतो, याची त्याच्यातील काही लोकास कल्पना नव्हती आणि म्हणून ते क्रातीसारख्या कार्यात फसले असे म्हणता येत असे. परतु काकोरीच्या कटाच्या खटल्यात तसा प्रकार झालेला दिसत नाही. त्यातील प्रमुख आरोपींत सन्याल बधू आहेत. या बधूपैकीं ज्येष्ठ बधु श्री. शचीन्द्रनाथ सन्याल हे तर यापूर्वींच क्राति-कारक खटल्याचे भीषण भोग भोगून दडितहि झालेले होते. त्यास त्यावेळी आजन्म काळेपाण्याची शिक्षा दिली गेली. ते अदमानात पाच वर्षे कुजत पडले होते आणि तेथील अनेक यातनास जेव्हा बाणेदारपणाने तोंड देत होते, तेव्हा त्यास कल्पनाहि नव्हती कीं, त्यास त्याची प्रिय मातृभूमि पुनः कधीं याच जन्मीं दिसेल! पण योगायोगाने ती त्यास पाचव्याच वर्षी पुनः दिसली. त्याच्या जन्मठेपीच्या शिक्षेची सूट मिळून ते पाचव्याच वर्षी १९२०।२१ चे सधीस सुटले. त्याच्याचप्रमाणें त्या खटल्यातील अितर अनेक जणानीं पूर्वीच क्रातीच्या मार्गात पाअूल टाकले म्हणजे पाअूलच नव्हे पण हृदयाहि कसें रक्तबबाळ होते हें अनुभविलेले होते. पोलिसाचे छळ, मारहाण, जाच, अुपास, अपमान, कारावास आणि मृत्युदड,

याचे भयकर अनुभव त्यास अशतः आलेले होते आणि ज्यास ते पूर्णतः आलेले होते, त्याचे तोडून आणि लेखातून त्यानीं अनेकदा अैकिले आणि वाचले होते. तरीदेखील ज्याअर्थी काकोरीच्या या आरोपींनीं पुनः क्रातिकारक कट केले, शस्त्रें जमविली, दहा-पधरावर मोठमोठे राजकीय दरवडे घालून सरकारास हलवून सोडले आणि शेवटीं शेवटीं चालत्या आगगाड्यास थोपवून पिस्तुलें आणि बदुका झाडीत सरकारी कोश (खजिने) साफ लुटून नेले—का तर सशस्त्र क्रातीवाचून आपल्या प्रिय मातृभूमीस स्वतत्र करण्याचा दुसरा कोणताहि अुपाय त्यास शक्य दिसेना नि:शस्त्र असहयोग, नि:शस्त्र सहयोग, नि:शस्त्र, प्रतिसहयोग, सगळे तेथे हात टेंकताना त्यानीं पाहिले, तेव्हा या सगळ्या अुपायात सापेक्षतः अधिक स्वस्त आणि सफल म्हणून त्यास जी वाटे, त्या क्रातीचा नगारा त्यानीं पुनः पिटला.

सगळे शहाणे ज्या अुपायास अगदीं अशक्य आणि अत्यत महाग म्हणून समजतात, तोच या “ माथेफिरूस ” सापेक्षतः शक्यतर आणि सफलतर अुपाय वाटला. सगळ्या शहाण्यास जे खादीमडळ, विधिमडळ, गोरक्षण, अस्पृश्योद्धार, शिशुसप्ताह, अुपोषणे, हरताळ अित्यादि सभ्य अुपाय स्वातत्र्यसपादनाचे कार्यीं सुलभतर आणि सफलतर वाटले, तेच या “ माथेफिरूस ” सुलभ होते ते निष्फळ आणि सुलभ नव्हते ते क्रातीपेक्षा जितके महाग तितकेच व्यर्थ वाटले ! भिन्नमतिर्हि लोकः !

असा त्याचा विश्वास असल्यानें या क्रान्तिकारक गृहस्थानीं – कारण त्याच्यात केवळ मुलेच भरलेली नाहीत, शौर्याच्या आणि ध्येयनिष्ठेच्या कामात मोठ्यासहि मान खालीं घालावयास लावणारीं विशीच्या आत-बाहेरील मुलेहि त्यात जशीं आहेत, तसेंच मुलासारखा सरलपणा नि नवा

तारुण्याचा अदम्य अुत्साह आणि धडाडी ज्यात भरलेलीं आहेत, अशी तिशीच्या वरची मोठी माणसेहि त्यात आहेत — त्या हृया गृहस्थानीं शहाण्यास त्याच्या शहाणपणाचे मार्ग मोकळे ठेवून, जे अितरास करवत होतें तितके देशहित ते करीत असता त्याचे हात न धरिता, जें कोणीहि करू शकत नव्हतें ते अुरलेले कार्य आपण स्वतः करण्याची प्रतिज्ञा केली आणि त्याप्रमाणे तो मार्ग किती भयकर असतो हे स्वतःचे अनुभवाने आणि कटाचे भूतकालीन खटल्याचे माहितीने ज्ञात असताहि जाणून बुजून त्या रक्तरजित क्रातीच्या ध्वजास त्यानी अुभारिले माथेफिराअूच ते !

अशा आगलावेपणाचें फळहि त्यास शीघ्रच मिळाले. काकोरीच्या आसपास चालत्या आगगाडीस रोखून, गाडी हाकणारास पिस्तुले दाखवून, बद्ध करून त्यानी गाडीवर सशस्त्र आक्रमण केले होते. सर्व प्रवाशास प्रथम कळविले की, आम्ही सरकारी खजिना तेवढा लुटणार आहोत, आम्ही क्रातिकारक तुमच्याच हितासाठी झटत आहोत, तुम्ही निर्भय असा ! पण असे सागूनहि साहजिकच जे अेक दोन प्रवासी आरडाओरड करू लागले, त्यास त्यानी तत्काळ गोळ्या घातल्या. नतर सरकारी खजिना फोडून तो सर्व वाहून नेला ! गाडी पुढे गेली. हे मागून गेले या अपराधासाठीं धरपकड होता होता तो सर्व राजकीय कट अुघडकीस आला आणि अेकाचे सूत्राने दुसरा, दुसऱ्याने तिसरा असें करीत हे बरेच क्रातिकारक पकडले गेले.

पण पकडल्यानतरहि "फुटला कट ! व्यर्थ मेलो !" म्हणून त्याच्यातील बहुतेक जण रडत बसेनात ! राजकीय कट म्हटला की, तो सद्यःपरिस्थितींतील स्वपक्षाच्या असघटित आणि हताश स्थितींत आणि विपक्षाच्या सघटित प्राबल्यात फुटणारच ! फुटत फुटतच ते घटत जाणार असा अुलटा युक्तिवाद करीत ते निढावलेले आणि पूर्वीहि अशाच कटाचे,

फुटण्याचे, खटल्याचे आणि शिक्षाचे प्रसग अनुभवून बसलेले क्रान्तिकारक अुलट खो खो हसत बसले !

त्याची पोलिस–चवकशी जवळजवळ वर्षभर चालली, पण त्या वर्षाच्या कारावासाने त्याचे धैर्य खचले नाही. पुढे खटला सुरू झाला. त्या क्रांतिकारकास न्यायालयात नेणारी जी बंदिशाळेतील गाडी असे ती सशस्त्र शिपायाचे पहाऱ्यात न्यायालयात प्रत्यही जाअूयेअू लागली.• हाती हातकड्या, पायबेड्या आणि दोर यानी जखडलेले हे क्रान्तिकारक प्रत्यही त्या गाडीतून जातायेता मोठमोठ्यानें क्रान्तिकारक गीते म्हणत जात. त्याच्यात काही कवी आणि काही चागले गाणारे होते ते सागत आणि सवर्जण ती राष्ट्र-गीतें गात. ती अितकी हृदय हलवून सोडणारी असत की, आजूबाजूस शेकडो लोकाचे थवे ती गीते अैकण्यासाठी त्या मार्गावर प्रत्यही तिष्ठत बसत. त्याचें ते तेज, ती देशभक्ति, ती निर्भीकता पाहून प्रत्यक्ष पोलिसाच्या डोळ्यास पाणी येअी ! अुभा मार्ग गजंवीत जाणारी ती त्या देशभक्त वीराकडून म्हटली जाणारी रणगीतें हिंदीतील आणि अुर्दूतील बहुतेक दैनिकातून छापली गेली आहेत.

पुष्कळ शहाण्याना आशा होती की, क्रान्तीसारखा अव्यापारेषु व्यापार करण्याचे भयकर परिणाम जेव्हा या अुन्मत्त देशवेड्यास भोगावे लागतील, तेव्हा त्याचे डोळे अुघडतील आणि बंदीच्या पिजऱ्यात बेड्यात जखडलेले हातात आपले अवनत माथें धरून दूरदृष्टीच्या शहाणपणास शोभणारे असे पश्चात्तप्त निष्क्रियतेचे अुसासे टाकतील. पण तसें काहींअेक झालेले नाही. त्याच्यात शहाण्या माणसास शोभणारा हा माथेधरूपणा दिसून येअीना. ते शहाण्या निष्क्रियतेच्या गुर्गीत माथें धरून रडगीताचे अुसासे टाकीत बसण्याचे ठिकाणीं रणगीतें गात अुफळत, अुसळत होते. 'माथेफिरू'च ते ! काहीं केल्या 'माथेधरू' शहाणपणा त्यास येअीना !

शेवटी त्याम शिक्षा झाली. त्यातील बहुतेकास माहीत होतें की शिक्षा होणार आणि तीहि अशी कीं, नुमती वर्तमानपत्रातून दुसऱ्यास मिळालेली वाचताच माथेधरू शहाणपणास दरदरून घाम सुटावा ! पण त्या माथे-फिरूस तिचे तितकेसे काही वाटेना. त्यानीं त्या दिवशी कारागारातून निघताना अेक सण पाळला. प्रार्थना केल्या. सर्वांनी स्वदेशी वेष परिधान केले, आणि कपाळीं लाल गधाचे टिळे लावले. न्यायालयात त्याची वाट पाहात मोठमोठ्या लोकाची आणि अधिकाऱ्याची दाटी झाली होती. ते न्याया लयाचे बाहेर गाडीतून अुतरताच ' वन्दे मातरम् ' चा तुमुल ध्वनि करू लागले. नतर शिस्तीनें आपल्या पुढाऱ्याच्या मागोमाग अेक अुत्तेजक राष्ट्रगीत सर्व मिळून अुच स्वराने गात त्यानीं न्यायालयात प्रवेश केला.

" आता बलिदानाची पर्वणी आलेली आहे. आमच्या मनात काय आहे तें सगळे आताच काय सागावे ! शत्रो, थाब. वेळ येअू दे म्हणजे सगळे गुप्त प्रकट होअील. हे मातृभूमि, आम्ही तुझ्यावरून जीव ओवाळून टाकू. आम्ही बघून घेअू, शत्रूचे बळ बळ तें काय आहे आता नुसती बकबक नाही—तर आता बलिदानाशी गाठ आहे."

अभियुक्त न्यायालयात आल्यावर न्यायाधीशाने निर्णय दिला. या खटल्यात अेकदर ११०० कागदी पुरावे परीक्षावे लागले. शेकडो साक्षीदाराच्या साक्षी झाल्या होत्या. न्यायाधीशानें आपल्या निर्णयपत्रिकेंत सागितलें कीं, सयुक्तप्रातात अेक विस्तृत षड्यत्र स्थापित झालेले असून, त्याचा अुद्देश सशस्त्र क्रान्ति करून हिदुस्थानात हिंदुस्थानचे स्वातत्र्य सपादन करावे हा आहे. याचे पूर्वसस्थापक शचींद्रनाथ सन्याल हे होते आणि या षड्यत्राचा बगालच्या क्रातिकारकाशीं निकट सबध होता. हे अेकमेकास राजकीय वधासाठीं आणि दरवड्यासाठीं शस्त्रे पुरवीत. या षड्यत्रातील मडळींनीं सरकारी अधिकाऱ्यावर सशस्त्र आक्रमणे केलीं,

खजिने लुटले, बॉंब अित्यादि स्फोटक साहित्य जमविले आणि अनेक भयकर दरवडे मारले. निर्णयातील अुतारे वाचून न्यायाधिशानें शिक्षा सागितल्या : राजेद्रनाथ लाहिरी, रामप्रसादजी आणि रौशनसिग-या त्रिवर्गास फाशी, शचींद्रनाथ सन्यालाना आजन्म काळेपाणी, मन्मथनाथ गुप्त याना १४ वर्षें, खत्री, खन्ना अित्यादि १० वर्षें आणि अितरास सात आणि पाच वर्षें शिक्षा सागितली गेली. शिक्षा सागितल्यानतर न्यायाधीश म्हणाला :

"ज्या मार्गाने तुम्ही स्वातत्र्य सपादन करू अिच्छीत होतेत तो मार्ग चुकला होता. पण दडितहो, तुमची ती चुकी प्रामाणिकपणाची होती. तुमच्या तत्त्वानुरूप तुम्ही प्रामाणिकपणे झुजत राहिलात. **मी हें स्पष्टपणें निर्दिष्ट करितों कीं, त्या सर्व खटाटोपात स्वार्थाचा लवलेश तुम्हास शिवला नव्हता. तुम्हीं जें जें केलेंत तें तें स्वदेशासाठींच केलेंत.**"

फाशीच्या आणि जन्मठेपीच्या क्रूर शिक्षा देत असतानाच न्यायाधिशाच्या तोंडातूनहि जेव्हा हे अुद्गार बाहेर पडले, तेव्हा सर्व श्रोत्यास अेकाअेकी गहिंवर आल्यासारखे झाले. जे पोलिस त्या देशवीरावर पहारा देत होते त्याचीहि मुद्रा ती भयकर आणि क्रूर शिक्षा अैकताच, बदललेली दिसू लागली. 'मतवाला' पत्र म्हणते, "त्या, स्वदेशावरून प्राण ओवाळून टाकणाऱ्या, वीरात्म्याची काहीतरी सेवा घडावी म्हणून त्याच्या शक्तींत होत्या तेवढ्या अनेक थड पाण्यासारख्या लहानसहान वस्तु पुढे करून पोलिसानी त्याची कृतज्ञताबुद्धि व्यक्त केली!"

फाशीच्या आणि जन्मठेपीच्या आणि दहादहा वर्षांच्या कठोर कारावासाच्या शिक्षा जशजशा सागितल्या जात, तसतसे ते सर्व दडित क्रातिकारक सस्मित वदनाने त्या शिक्षाचे स्वागत करीत होते. शिक्षा सागून झाल्या तरी हातावर माथा धरून चिंताक्रान्त बसणारा शहाणपणा त्याच्यात अुदय पावलेला दिसेना! त्याचा कट फुटला म्हणून ते रडत बसले नाहीत. त्याच्यातील

काहीं साथीदार सरकारचे साक्षीदार होअून त्याचा विश्वासघात करिते झाले होते. पण म्हणून ते हतवीर्य झाले नव्हते. कारण त्याना जगाच्या आणि प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या भूतकालीन क्रातिकारक प्रयत्नावरून माहीत झालें होतें कीं, ज्याला क्रान्तीच्या मार्गात पाअूल टाकणे, त्याने प्रथम आपले शिर आपल्या हातात घ्यावे, मग मनास म्हणावे, 'मना, ध्यानात ठेव की, या परतत्र आणि दलित देशातल्या तीस कोटीपैकीं अेकोणतीस कोटी विश्वासघातक निघणार, तुला शाप देणार, तुला शिव्या देणार, तुझा शिरच्छेद स्वत:चे हातानीच करणारे असणार, तरीहि तुला पुढे गेले पाहिजे सगळें जग काय वाटेल ते करो, तू अेकटा तर तुझ्या देशाकरिता झुजत मरण्यास सिद्ध आहेस ना? पुरे! क्रातीची सामग्री तुझ्यापुरती तुझ्यापाशीं जुळली तर मग! चल, अेकोणतीस कोटी सरकारी साक्षीदार होतील हे गृहीत धरून चल त्या अुरलेल्या अेक कोटीत कोणीतरी तुझ्याबरोबर राहणारा किंवा तू मेल्यानतर तुझ्या मागून येणारा मिळेल. तोहि न मिळाला तरी तू चल! माथेधरूपणापेक्षा माथेफिरूपणाच अेखादी भूकपीय अुलाढाल आता करील तर करील!"

या माथेफिरूपणाच्या विचारपरपरेनें अुत्स्फूर्त झालेल्या त्या क्रातिकारकास भयकर शिक्षा अेकून अधिकच उन्माद चढल्यासारखा दिसू लागला. श्री. मालवीयाचें 'अभ्युदया'सारखे प्रमुख पत्र म्हणते—

"खटल्याच्या निकालाच्या वेळचे दृश्य खरोखर अपूर्व होतें. शिक्षा अैकिल्यानतर ते क्रातिकारक जेव्हा जावयास निघाले, तेव्हा त्यानीं प्रथम अेकमेकाच्या गळयात मिठ्या मारल्या आणि डोळयातून गळत असलेल्या प्रेमाश्रूत त्यानीं अेकमेकाचा निरोप घेतला. त्या वेळेस न्यायालयात अुपस्थित असलेले लोकहि रडू लागले. श्री. रामप्रसादजी, श्री. राजेन्द्रनाथ लाहिरी, श्री. रौशनसिग—ज्या त्रिवर्गांना फाशीची शिक्षा

झाली होती आणि श्री. सन्याल याना जन्मठेप झाली होती, त्या चौघाच्या चरणास अितर सर्व दंडितानी भक्तिपूर्वक स्पर्श केला. नतर श्रीयुत रामप्रसाद याचे धुरीणत्वाखालीं ते सर्व ' वन्दे मातरम् 'ची तुमुल गर्जना करून अेक हृदयस्पर्शी गीत म्हणत न्यायालयातून जाऊ लागले."

" जिच्या प्रेमासाठी आम्ही प्राणहि ओंवाळून टाकीत आहो, त्या भारतभूमीचा वायु आता आम्हास कुठला श्वासोच्छ्वासास मिळणार ! चिंता नाहीं ! हे स्वदेशा, तुझे कल्याण होवो–आम्ही आता निघालो. हे मातृभूमि, तू सुखी राहा म्हणजे झाले–आम्ही तर आता चाललो !!!"

हे वाचक, हे गाणे गात जे फाशीच्या खाबाकडे जात आहेत ते देशभक्त सर्व हिंदु आहेत. साधनाच्याविषयी त्याच्याशी आम्ही सर्वसमत नसलो तरीहि हे ध्यानात ठेवण्यासारखें आहे कीं, त्याच्यात हे तेज आणि हे धैर्य हीं हिंदूची गीता वाचूनच अुत्पन्न झालीं. त्याच्या अुपस्थितींत तरी ' हिंदु दुर्बल आहे, हिंदु भ्याड आहे,' असे म्हणण्याची कोणाची माय व्याली आहे !

मुसलमान बधूनो, असले असले निधड्या छातीचे हिंदु लोक ज्या हिंदु समाजात निपजतात, त्या समाजास भ्याड समजून त्याचेवर गुडगिरीने कुरघोडी करू पाहाण्याची जी भयकर चूक तुम्ही करीत आहात, ती अजून तरी सुधारा. स्वदेशासाठी आज वीस वर्षे फाशीच्या दोरावर सारखा झोका घेत खेळत असलेल्या या हिंदु क्रान्तिकारकास स्वधर्मासाठीहि, तुम्ही जसे चार दोन हत्या करिता आहा—दहा पाच देवळे फोडता आहा—पाच पचवीस हिंदु अबलाना पळविता आहा—तसे " पराक्रम " काय करिता आले नसते ? चालत्या आगगाड्या रोखून धरून ज्यानीं सरकारी खजिने लुटले आणि गव्हर्नराचे दाढीस हात घालून ती हिसकली, त्याना मुसलमानाच्या चार बायका पळविण्याचा किंवा लपून छपून अेखाद्या

मौलवीचे डोक्यात लाठी घालण्याचा पराक्रम करिता आला नसता असें का तुम्हास वाटतें? त्यानीं कोणीं अजून तसें केलें नाहीं, तें त्यास शक्ति नव्हती म्हणून नव्हे, तर अिच्छा नव्हती म्हणून. बलात्कारानें धर्म वाढतो, स्त्रियावर पशूसारखे अत्याचार करणें हें धर्मवीरत्वाचे अेक लक्षण असतें ही पिशाच्ची शिकवणच त्यास मिळालेली नव्हती. मुसलमान आपले देशबधू— आज नाहीं अुद्या शुद्धीवर येतील ही आशा त्यास होती, म्हणून आजवर त्यानीं तुमचे भयकर अपराधहि पोटात घातले. श्रद्धानदाची हत्याहि त्यानीं डोळ्याआड केली हें पक्के ध्यानात ठेवा आणि आता यापुढें तरी हिंदूतील क्षात्रतेजाचा अत पाहू नका. तुम्हीं अेकपट गुडगिरी केलीत पण यावरहि जर तुम्ही शुद्धीवर येणार नाहीं, तर धर्माचे नावानेहि हिंदु दसपट गुडगिरी करण्यास सोडणार नाहीत असा रग दिसत आहे. म्हणून मुसलमान हो, या काकोरीच्या क्रान्तिकारकाचें नाव अेकून तरी सावध व्हा आणि आपसातील यादवी बंद करा.

आणि अिंग्रजहो, तुम्हीही या दृश्याकडे जरा गभीरपणें पाहा. आमची आमच्या पुढाऱ्यास विनति आहे कीं त्यानीं, जेव्हा आता रॉयल कमिशन अिकडे येअील, तेव्हा त्याचेपुढे निर्भयपणें या क्रान्तिकारक "माथेफिरू" चा अितिहास वाचून दाखवावा. आज वीस पचवीस वर्षे सरकारनें आपल्या भात्यातील सर्व शस्त्रास्त्रें या क्रान्तिकारकावर सोडून पाहिलीं आहेत. साधी बंदी, सक्तमबदी, काळें पाणी, फाशी, मारहाण, जाच, आत्मिक पीडन, दैहिक पीडन, विशिष्ट दडक, सैनिक दडक, बदुका, बेयानेटें, विमानें, बॉंब, सरसहा कत्तली—सर्व प्रकारचीं आयुधें सरकारनें या माथेफिरूवर योजून पाहिलीं पण या मूठभर लोकाच्या सप्रदायाची वीण भुयराभुयारातून वाढतच आहे—हें या काकोरीच्या अगदीं आजच्या क्रान्तिकारकाच्या अुदात्त अुम्रतेस साक्षी ठेवून सागा. सागा कीं, या अमर्त्य

क्रान्तिकारकांसहि मारण्याचा मार्ग आहे आणि आश्चर्याची गोष्ट कीं, तो अगदीं सोपा आहे. तो म्हणजे हाच कीं, जें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य शेवटीं केव्हा तरी द्यावें लागणारच आहे तें तुमच्या आमच्यातील लाखों लोकाचे रक्त सांडण्याचे आधीच सुखासमाधानानें देऊन टाकून या चिरडीस आलेल्या प्रकरणाचे पर्यवसान आनंदात करा. अजूनहि जर अिंग्रज राष्ट्राने मोकळ्या मनाने हे धोरण स्वीकारून वैध प्रगति (Constitutional) शक्य करण्यासारखी परिणामकारक राज्यघटना सुरू केली, तर तिच्या किंचित् दिरंगाअीच्या कार्यपद्धतीसहि स्वीकारणें हे, हे क्रांतिकारक राजनीतिदृष्ट्या आपले कर्तव्य समजतील अितकेच नव्हे तर, जर ती राज्यघटना देताच अिंग्लंड निष्कपट रीतीने भारताशीं समानतेचें सहकार्य करू लागेल, तर तेहि अिंग्लंडशीं तितक्याच निष्कपटपणे अुभयताच्या कल्याणास अनुरूप असें सहकार्यहि करू लागतील.

---

४. क्रान्तीच्या ठिणग्या

[श्रद्धानन्द दि २२-९-१९२७]

काकोरीच्या क्रांतिकारकास सेशन कोर्टात ज्या शिक्षा झाल्या त्या कमी वाटून हायकोर्टानें त्या अधिकच भयंकर प्रमाणात वाढविल्या आहेत दहा वर्षे, चौदा वर्षे अशा शिक्षा जन्मठेपीपर्यंत वाढविल्या! अपिलात शिक्षा कमी होतील म्हणून अपिलें झाली पण क्रांतीच्या काकोरीच्या कटाच्या ठिणगीने दाढी पेटलेल्या हायकोर्टी क्रोधास, त्या क्रांतिकारकांपैकीं तिघाचौघास फाशी झाली असताहि, तेवढा बळी पुरेसा न वाटून, त्यानें त्या कटातील मंडळीच्या आधीच भयंकर असलेल्या शिक्षा अधिकच भयंकर प्रमाणात वाढविल्या!

ज्यास पांच वर्षे सश्रम कारावास होता त्यास तो दहा वर्षे दिला, ज्यास दहा वर्षे द्वीपान्तर होतें त्यास जन्मठेपी दिल्या! तरीहि अेवढ्यावरून न्यायाधीशास दयेचा किंवा सौम्यतेचा लवलेशहि शिवला नाहीं असें अनुमान मात्र कोणीहि करू नये. कारण अितरांच्या जरी त्यानीं अत्यंत कठोरपणे शिक्षा वाढविल्या, तरी काहींच्या शिक्षा त्यानीं सदयपणें वाढविण्याचें साफ नाकारिलें. अुदाहरणार्थ, सेशन कोर्टात ज्यास फाशीच्या शिक्षा झाल्या होत्या त्यानींहि अपील केले होतें. पण हायकोर्टानें सदय अंतःकरणानें, अितर कटवाल्यांच्या शिक्षा दुपटीनें वाढविल्या असताहि, फाशी

दिलेल्या शिक्षेवर हीं जी अपिलें झालीं त्याच्या शिक्षा मुळींच वाढविल्या नाहींत. त्याना सेशनकोर्टाने दिलेली फाशीच काय ती पुरे, असें अेकमताने अुदारपणें घोषित केले. या औदार्याविषयीं न्यायमूर्तींचे आभार क्रांतिकारक कटवाले मानितीलच हो! जशा अितर शिक्षा दुपटीने वाढविल्या तशी प्रत्येकास सेशनने या जन्मापुरत्या दिलेल्या अेका फाशीच्या शिक्षेसही दुपटीनें वाढवून पुढील जन्माची फाशीहि देअून टाकण्याचे हायकोर्टानें मनात आणिले असतें, तर त्याचा कोण हात धरणारा होता!

अेका क्रांतिकारक कटास अशा अत्यंत कठोर शिक्षा दिल्या की बाकीचे क्रांतिकारक भिअून त्या नादात पडणार नाहींत अशी जर हायकोर्टाची किंवा त्याच्यावर अुभ्या असणाऱ्या सरकारची समजूत असेल, तर ती मात्र सफल होण्याचा तितकासा रंग सध्या दिसत नाही. कारण, ही काकोरीच्या कटाची ठिणगी, त्याच्यातील फाशी जाणाऱ्या तीन चार क्रांतिकारकाच्या अुष्णोष्ण रक्ताच्या शिरा तुटताच अुसळून पडणाऱ्या लालभडक सड्यात विझते न विझते तोच, बंगाल्यात आणखी एक भयंकर कट अुघडकीस येण्याच्या मार्गास लागला आहे. अेका घरास वेढा घालून पोलिसानीं कित्येक बॉंब, बंदुका, पिस्तुले आणि क्रांतिकारक वाङ्मय धरिले आहे. त्या घरातील घरधनी, त्याचा भाअू, त्याचीं दोन कर्तीं मुलें निरनिराळ्या ठिकाणी पकडली गेली असून झडत्याचा गावभर नुसता धुमाकूळ चालला आहे. आतल्या आत धुमसणाऱ्या क्रांतीची ही आणखी एक ठिणगी वर अुडून, सत्तेच्या क्रोधाची दाढी पुनः पेटवीत आहे. काकोरीच्या कटवाल्याची आज दीड वर्षावर जी दुर्दशा आणि हाल चालले आहेत आणि हायकोर्टातल्या अपिलाचा वर जो भयंकर निकाल दिला आहे, त्यामुळे क्रांतिकारकाचे मरणमारणाचे अुग्र अुद्योग बंद पडलेले दिसत नाहीत किंवा त्या अुग्र अुद्योगास पोसण्यास आणि त्यास लागणारी शस्त्रास्त्रादि साधन-

सामग्री जुळविण्यास लागणारा लाखो रुपयाचा आर्थिक निधि जमाविण्यासाठी घालण्यात येणारे राजकीय दरवडेहि अुतरत्या पथास लागण्याचे काहीहि चिह्न दिसत नाही. दर आठवड्यास बहुधा राजकीय दरवडे पडतातच आहेत. क्रांति मारण्यासाठीं म्हणून बंगाल्यात अनेक पुढारी लोकास मध्यतरी दृष्टिबद्ध, स्थलबद्ध, कारागृद्ध करून ठेवले, पुनः सुभाष बाबूसुद्धा त्याच्यातील अनेकास सोडून देण्यात आले. पण क्रांतिकारक चळवळ आतल्याआत धुमसतची धुमसतच आहे.

क्रांतीच्या ठिणग्या अुडताच त्यावर क्रांतिकारकास फाशीवर चढवून त्याच्या अुष्णोष्ण रक्ताचा सडा घालण्याचा अुपाय असा निष्फळ होत आहे त्या क्रांतीच्या फाशीवरून अुसळणाऱ्या रक्ताच्या सड्यानी त्या ठिणग्या विझत नाहींत तर आगीवर ओतलेल्या राकेलाप्रमाणे अुलटा भडकाच घेतात ! पचवीस वर्षे हा क्रांतीचे रक्त शिंपडून क्रांतीच्या ठिणग्या विझविण्याचा अुपाय सरकारने करून पाहिला आहे. पण तो काही पुरतेपणी सफल होतोसे दिसत नाही तेव्हा अजून तरी सरकारने क्रांति विझविण्याचा सरळ आणि सफळ असा अुपाय—जो अितिहासाच्या वैद्यशास्त्राने आणि जगाच्या अनुभवाने अगदी रामबाण म्हणून ठरविलेला आहे, तो योजून पाहावा क्रांतिकारक जी क्रांति करू म्हणतात ती आपण होअूनच करून टाकावी आणि हिंदुस्थानास स्वातंत्र्य देअून टाकून या क्रांतिकारक वृक्षाच्या मुळावरच कुऱ्हाड घालावी !

पण हा अुपाय सरकार करणार काय ? क्रांति मरणार काय ? अितिहासाची पुनरावृत्ति झाल्यावाचून राहाणार काय ? काय ? या दैवदुर्विलसितास करावे काय ?

बरे, या ठिणग्या नुसत्या हिंदुस्थानच्या आतल्या आत अुडत असल्या तरी सरकारास अितके घाबरण्याचे कारण नव्हते. पण आगामी महायुद्धात

सरकारास अडवून धरण्यासाठी या क्रांतिकारकांनी अुभ्या जगात जेथे जेथे अिंग्रजाचा शत्रू दिसेल तेथे तेथे त्याच्याशी सगनमत करण्याचा अति दुष्ट प्रयत्न चालविला आहे. चीनमध्येच पाहा चीनचे राष्ट्रीय सरकार अिंग्रजाच्या विरुद्ध आहे. चीनमध्ये जे तुमुल स्वातंत्र्ययुद्ध चालले आहे, ते दडपून टाकण्यासाठी अिंग्रजानी हजारो सैनिक आणि मोठमोठ्या रणनौका तिकडे धाडल्या आहेत अुलटपक्षी रशियाने चीनच्या राष्ट्रीय पक्षाची कड घेतली असून चीनमध्ये सबळ सत्ता स्थापून मग चीनकडून हिंदुस्थानमध्ये राज्यक्रांति करण्याचा रशियाचा डाव आहे. अशी संधि साधून चीनमध्ये असणाऱ्या हिंदुस्थानी क्रांतिकारकांनी चीनची आणि रशियाची बाजू अुचलून धरण्याची सारखी खटपट चालू ठेविली आहे. हिंदुस्थानातून काही हिंदी सेना अिंग्रजांनी चीनला चीनाविरुद्ध लढण्यास धाडिली. पण ही गोष्ट या भारतीय क्रांतिकारकास पटली नाही चीनमध्ये हिंदी सैन्याने जाअून चीनच्या विरुद्ध लढू नये असे प्रत्येक देशभक्त भारतीय पुढाऱ्याचे मत होतेच. विधिमंडळात हिंदी सभासदानी या सरकारी धोरणाचा शक्य तेवढा विरोधहि केला चीन बौद्ध राष्ट्र आहे, ते आमच्या हिंदूचे धर्मबांधव आहेत. त्यातहि ते त्याच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या पवित्र युद्धात लढत आहेत. त्यातहि जर चीन स्वतंत्र झाले, प्रबळ झाले तर त्याचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षास पाठिंबा मिळण्याचा अधिक संभव आहे. अशा स्थितीत अिंग्रजाच्या आपल्या पायातील बेड्या तोडून टाकण्याइतकेही पौरुष अंगी नसणाऱ्या हिंदी सेनेने, केवळ अिंग्रजाकडून दिल्या जाणाऱ्या चार कवड्याच्या वेतनासाठी चीनच्या नरडीचा घोट घेअून त्याच्या पायातहि अिंग्रजी वर्चस्वाच्या बेड्या ठोकण्यास सहाय व्हावे, ही अत्यंत नीचपणाची वर्तणूक कोणाहि भारतीय मनुष्यास लाजिरवाणी वाटणारी होतीच तेव्हा वरिष्ठ विधिमंडळाने हिंदी

सैन्य चीनकडे लढण्यास धाडू नये, म्हणून सरकारास बजावून सांगितले पण ते न अैकता अिंग्रजांनीं चीनला हिंदी सैन्य धाडलेंच! विधिमंडळाच्या हातात शाब्दिक निषेध करण्यापलीकडे कांहीच सत्ता नसल्याने ते बिचारे हतबल होअून चूप राहिले!

पण हिंदी क्रांतिकारकांचें बळ नुसतें शब्दांतच साठविलेलें नसतें. विधिमंडळाचें शाब्दिक बळ जेथे जेथें संपतें, तेथूनच त्यांचे अुग्र अुपाय सुरू होतात. चीनला हिंदी सेना विधिमंडळास न जुमानता अिंग्रजांनी नेताच चिनांत असलेल्या हिंदी क्रान्तिकारकांच्या गुप्त संस्थांनी, गुप्त आणि प्रकट अुपायांनीं त्या सेनेतील शीखादिक सैनिकांच्या गांठी घेअून त्यास सांगितले कीं, "अरे, स्वतःच्या मातृभूमीस पारतंत्र्यातून सोडविण्याचे तुमचे कर्तव्य! तें तर तुम्हास करवत नाहीं! तेथे तुमच्या या मिशा आणि दाढ्या आणि तरवारी शेळीच्या शेपटासारख्या मेंग्या होतात! पण तेवढें पाप तुम्हास नरकास धाडण्यास पुरेसें नाहीं, म्हणून का तुम्ही आतां या चीनलाहि दास्यांत ढकलण्यास अिकडे आलां आहांत? आपल्या मायभूस दास्यांतून सोडविण्यास न धजणाऱ्या या तुमच्या मेंग्या मिशा आणि तरवारी, चीनला दास्यांत ढकलण्यास तेवढ्या अशा कशा फुरफुरू लागल्या? देशबांधवहो, स्वदेश दास्यातून सोडविता येत नसेल तर, आतां निदान तुकड्यासाठीं अिंग्रजांचीं कुत्रीं बनून या चीनादिक आपल्या शेजाऱ्यांस तरी अिंग्रजांच्या दास्यांत ढकलण्याचे महापाप करू नका!" असा अुपदेश क्रान्तिकारकांनीं त्या हिंदी सैनिकांत सारखा सुरू केल्यामुळे त्यांचीं मनें लवकरच बिथरलीं. चीनविरुद्ध लढण्यास त्यास भाग पाडणें धोक्याचें आहे, असें अिंग्रजी अधिकाऱ्यांच्या ध्यानात आलें. शांघायहून हॉंगकॉंग आणि हॉंगकॉंगहून शांघाय, अशा सैनिकांच्या थारेपालटी आणि वारेपालटीहि झाल्या. अितक्यांत त्या सैन्यांत बंडाच्या ज्वाला पेटण्याचा

ममवही दिसू लागला. काही मोठमोठ्या हिंदी सैनिक अधिकाऱ्यास अिंग्रजाविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून पकडून सैनिक-खटले (कोर्ट-मार्शल) करण्यात आले. जूनच्या १८ तारखेस तार आली की, शांघाय-मधील अिंग्रजी सरकारचा मुख्य पोलिस अधिकारी यास राज्यक्रांति कारकापैकी हरबतसिंग नावाच्या एका निधड्या लढवय्याने गोळी घालून ठार केले ! आणखीहि राज्यक्रांतीचे प्रयत्न आणि कट अुघडकीस येतच गेले क्याटन, शांघाय, हाँगकाँग अित्यादि प्रमुख नगरातून हिंदी राज्य-क्रान्तिकारकांची गुप्त संस्थाची जाळी पसरलेली असून त्याचे सर्व धोरण चिनी राष्ट्रीय पक्षास साह्य देअून अिंग्रजाचे नाक खाली करण्याचे आहे. आशा ही की, चीनमधून अिंग्रज अुठला की, त्या चीनच्या राष्ट्रीय सरकारच्या पाठिंब्याने आणि रशियाच्या संगनमताने अिंग्रजाशी त्या दोन राष्ट्राची लढाअी जुंपताच ब्रह्मदेशाच्या सरसीमेवरून बंड करून हिंदुस्थानवर स्वारी करावयाची आणि राज्यक्रांतीचा झेंडा हिंदभूमीवर पाय ठेवताच अुभारावयाचा !

पण चीनमधील हिंदी राज्यक्रान्तिकारकाचा डाव अिंग्रजाच्या लक्षात आल्यावाचून थोडाच राहाणार होता ! त्या डावाचे मर्म विधिमंडळातील, खादी-मंडळातील, तुम्हा आम्हा अिंग्रजी चाबकाखाली माणसाळलेल्या मंदाच्या लक्षात येणार नाही. आपणास तो एक केवळ 'पोरखेळ' वाटेल, माथेफिरूपणाची एक लहर वाटेल. पण अिंग्रजास त्या डावातील अर्थ तेव्हाच कळला. अिंग्रज विधिमंडळ, खादी-मंडळ इत्यादि सभ्य संस्थाच्या माणसाळलेल्या निरुपद्रवी डावाकडे कौतुकाने पाहात बसतात. त्यास वेळी अवेळी वाहवा ! भले ! म्हणून त्यातील निरुपद्रवीपणाच्या प्रमाणात अधिकाधिक भलाअीपण देतात, पण क्रांतिकारकाच्या डावाचे नाव काढताच कसे अगदी तत्काळ पिसाळून, दिसेल त्यास चावू लागतात

हे सर्वश्रुतच आहे. अिकडे अितर चळवळींच्या म्होरक्याची, अेंशी हजार लोकाची, सभा भरून कडकातील कडक भाषा बोलत बसली तरी गव्हर्नर स्वस्थ झोप घेत असतात. पण अेखादे अठरा वर्षांचे पोर जरी अेखादा क्रान्तिकारक शब्द बोलले तरी एकदम "राजाच्या विरुद्ध लढाअी" म्हणून रणशिंगे फुकलीं जातात. अठरा वर्षांच्या क्रान्तिकारकाच्या माथे-फिरू पोराची, अैंशीं हजार माथेधरू थोराहून अिंग्रजास भीति वाटते! कारण अिंग्रज सगळ्याच्या बारशास जेवलेला. त्याला माथेधरू सभ्यपणा आणि माथेफिरू अुनाडपणा यातील फरक तेंव्हाच कळतो! त्यातहि या चीनमधील क्रान्तिकारक माथेफिरूंच्या अुनाडपणाला रशियन अस्वलाची नखे फुटलेली आणि चीनच्या नागाचा विषारी दात आलेला! अितर भुसाच्या आगीच्या ठिणग्या कितीक अुडून गेल्या आणि विझल्या! पण ही ठिणगी क्रान्तिकारक आगीची! वेळीच लक्ष दिले नाही तर जसा ग्यारिबॉल्डी दक्षिण अमेरिकेतून सज्ज झालेली सेना घेअून, अिटलींत अुतरला, तसे हिंदी क्रान्तिकारक रशियन शिक्षकाचे हाताखालीं सैनिक, वैमानिक आणि सामुद्रिक शिक्षण घेअून, रशियाची आणि अिंग्रजाची लढाअी जुपताच, ब्रह्मदेशाचे सरसीमेवर अुतरून हिंदुस्थानात क्रांतीची आग भडकवीत युद्ध पुकारणार नाहीत म्हणून कशावरून? मेलेल्या दुधावर वाढलेल्या आमच्या माथेधरू शहाणपणाच्या राजकारणास जरी हा केवळ पोरकट भ्रम वाटला तरी वाघिणीच्या जिवत दुधावर वाढलेल्या चाणाक्ष अिंग्रजास ती अेक भयंकर शक्यता वाटली हें साहजिकच होते. ब्रह्म-देशावर चीन, राशिया आणि हिंदी क्रान्तिकारक हे स्वारी करण्याची सिद्धता करीत आहेत, ही गोष्ट अिंग्रजी राजनीतीचे सूक्ष्म दृष्टीस दिसताच त्याचे पटाअित बुद्धिमत्तेस तिचे महत्त्व तत्काल समजून आले आणि त्यानीं हिंदुस्थानचे वायव्य सरसीमेवर ज्याप्रमाणे युद्धाची सज्जता

आजवर ठेवण्यास ते झटत असत, त्याचप्रमाणे आता हिंदुस्थानचे पूर्व सरसीमेवरहि लढाअीची सज्जता ठेवण्यास अिंग्लड तत्काळ झटू लागले.

आजपर्यंत सरसीमा [सरहद्द], आणि सरसीमेवरची युद्धाची सिद्धता, म्हटली म्हणजे वायव्य सरसीमा काय ती हिंदी लोकांच्या दृष्टीसमोर अुभी राही. राशिया पूर्वी तिकडूनच येणार होता. अफगाणिस्थानहि तिकडूनच स्वारी करण्याच्या अुद्योगात असतो. रानटी जातीहि हिंदु लोकांच्या नाशास तत्पर होअून लूटमार करीत तिकडूनच धावे छापे मारितात. म्हणून आजवर हिंदुस्थानला त्या वायव्य सरसीमेची काय ती चिंता असे. हिंदुस्थानची पूर्व सरसीमा अगदीं निरुपद्रवी आणि पूर्वी सभ्य असल्याने आणि नंतर दुर्बळ झाल्याने, दुसऱ्या आणि त्यातहि त्याची देवभूमि असलेल्या हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे ज्याच्या मनातहि आले नाहीं अशा तिबेट आणि चीन या राष्ट्रानी व्यापिलेली असल्याने शतकोशतकें हिंदुस्थानास पूर्व सीमेवर युद्धाची सज्जता म्हणजे काय याची कल्पनाहि अुरली नव्हती. पण शेवटीं आज वायव्य सरसीमेप्रमाणेच पूर्वसीमेवरहि युद्धाची सज्जता ठेवण्याचा प्रसंग सरकारवर गुजरला आहे. कारण, अफगाणिस्थानास पुढे करून राशिया जसा वायव्य सीमेवर स्वारी करू पाहात आहे, तसाच चीन-देशास पुढे करून राशिया पूर्वसीमेवर स्वारी करू पाहात आहे. आणि त्या दोन्ही बाजूनीं या महायुद्धाचे सुदोपसुंदीत आपलाहि लग्गा लागला तर पाहावा म्हणून हिंदी क्रांतिकारक फार दूरवर परिणाम करणारा राजकारणी डाव टाकून आणि अिंग्रजाच्या शत्रूशी संगनमत करून हिंदुस्थानवर क्रांतिकारक सेनेची चढाअी करू पाहात आहेत.

यासाठी, त्यास तोंड देता यावें म्हणून दूरदर्शी अिंग्रजानीं आजपासूनच ब्रह्मदेशाच्या सरसीमेवर मोठी प्रबळ सज्जता चालविली आहे. त्या सीमेवर किल्ले बांधण्याचे काम वेगाने चालले असून मोठमोठे सैनिक-मार्ग सिद्ध

करण्यात येत आहेत. त्यावर सुटलेल्या बदिवानाच्या टोळ्याच्या टोळ्या धाडण्यात येऊन त्याच्याकडून कार्य करून घेण्यात येत आहे. त्यारीत्यर्थ धनसग्रहहि सुरू असून त्या सीमेवर चाललेल्या या भावी महायुद्धाच्या पूर्वसिद्धतेविषयीं कोणतीहि बातमी किवा सैन्याच्या हालचालींची गुणगुण प्रसिद्ध करण्याची कडक बदी करण्यात आली आहे

अफगाणिस्थानकडच्या जेवढ्या स्वाऱ्या—शिंकदराच्या स्वारीपासून तों परवाच्या जिहादी गुडापर्यंत—झाल्या त्या हिंदुस्थानास दास्यात दडपून ठेवण्यासाठीं होत्या. पण ब्रह्मदेशाकडून होऊ पाहाणाऱ्या या पूर्वसीम वरील ही स्वारी झालीच तर हिदुस्थान जिकण्याकरिता होणारी नसून केवळ अिंग्रजास हिदुस्थानातून हाकून त्याची शक्ति कमी करण्यासाठींच होणारी आहे. अिंग्रजाच्या साम्राज्याचे तुकडे अुडविण्यासाठीं, त्या साम्राज्याचें जे प्रत्यक्ष हृदय असे हिंदुस्थान, त्यावरच आघात करिता यावा, अिंग्रजाना हिदुस्थानातच पेचात धरिता यावें, अेवढ्यापुरताच त्याचा स्वारीचा बेत आहे. त्याचें आणि त्याचेसह सहकार्य करीत असलेल्या हिंदी क्रान्तिकारकाचें असें धोरण आहे की, हिदुस्थानच्या पूर्व सीमेकडून अिंग्रजास टाच दिली असता त्याची शक्ति विभागेल आणि आतून हिंदी लोक क्राति करून अुठतील! काय वेडे धोरण हे! विधि-मडळें, खादी-मडळें, शिवोत्सव, शुद्धि, स्वदेशी अित्यादि अत्यत अुपयुक्त आणि सुखासीन अुपायानीं स्वदेशाची बैठी प्रगति करण्याचें सोडून या क्रान्तिकारकाच्या, कानटाळ्या बसविणाऱ्या पोरखेळाच्या, घोडदौडी प्रगतींत शिरून दातबीत फोडून घेण्याचे सकट स्वतःवर ओढून घ्यावयास आम्हा सभ्य गृहस्थास वेड थोडेंच लागलें आहे!!

परतु आम्हास नसले तरी ब्रह्मदेशातील काहीं लोकावर मात्र या वेडाची थोडीशी छाया पडत असल्याचें दिसतें. कारण, त्याच्यातील

बऱ्याच लोकांनीं अेव्हापासूनच अशी हाकाटी करण्यास सुरवात केली आहे कीं, जर कधीं ब्रह्मदेशाच्या सरसीमेवर चीन आणि अिंग्रज याचे युद्ध जुपले तर आपण अिंग्रजास धनाची वा जनाची यत्किंचितूहि सहायता देणार नाहीं. कोण ही बडगिरी ! सरकार महात्मा गांधींस का तिकडे धाडीत नाहीं ! ते गेले तर सत्य, अहिंसा नाहीं तर निदान वनस्पत्याहार अशा कोणत्या तरी गालभरू मुर्दाड तत्त्वाच्या नावाखालीं तेव्हाच ब्रह्मी लोकास समजावतील कीं, अिंग्रजाशीं अशा युद्धाचे वेळी निरपेक्ष, बिनअट, बिनबोभाट, मागतील तो सहकार करणें आणि साह्य देणें हेंच खऱ्या असहकारितेचें लक्षण आहे. मागें जर्मन लोकास मारण्यासाठीं महात्माजींनी सैनिक जमविले तसे आता रशियाविरुद्ध सैनिकभरती करणें आणि रशियन–चिन्याचीं हिंसा करणे हीच खरी आहिंसा आहे. आणि अशा रीतीनें अिंग्रज आपला अमित्र आहे म्हणूनच त्यास त्याचेवरील सकटात पेंचात न धरिता त्यास साह्य करण्यासाठीं आपला मित्र चीन त्याचे डोके अुडाविणें हीच खरी देशभक्ति आणि " स्वराज्यप्राप्तीचा सरळ मार्ग " आहे !

---

५. वीरमाता क्षीरोदवासिनी

(श्रद्धानंद : ३-५-१९२८)

स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्राचे
गुलामगिरिच्या अुकिरड्यावरि गुलाम निपजाचे ! !

—सिंहगडचा पोवाडा

मागे ' श्रद्धानंद ' मध्यें काकोरीचे क्रान्तिकारक या लेखात श्री. शचींद्रनाथ सन्याल याचा अुल्लेख केलेला होता आणि त्याचे छायाचित्रही देण्यात आलें होतें. त्या प्रखर देशभक्त वीरारम्यास काकोरीच्या क्रान्तिकारकाच्या कटात आजन्म काळ्यापाण्याची भयंकर शिक्षा मिळालेली आहे. त्याच शचींद्रनाथ सन्याल याच्या वृद्ध मातेचे नाव श्रीमती क्षीरोदवासिनी देवी हें होतें.

ती वृद्ध वीरमाता, तिचे पुत्र देशस्वातंत्र्यासाठीं कारागारात जन्मठेपीच्या भयंकर शिक्षाच्या बेड्या ठोकून बंद झालेले असता, घरी अेकटी त्याच्या स्मरणानें विव्हल होअी, परन्तु त्यास, स्वदेशसेवेच्या भीषण दिव्यात यश येवो म्हणून सरत्या श्वासानेंहि आशीर्वाद देत अेप्रील १९२८ मध्यें मृत्यु पावली.

तिला अेकंदर चार मुलें होतीं. वडील मुलगा साधारण वयात येतो न येतो तोंच तिचा भ्रतार वारला आणि त्या चिल्यापिल्याच्या भरण-

पोषणाचा भार श्रीमती क्षीरोदवासिनी देवी याजवर पडला. तें कुटुंब मूळचें बंगाली. पण फार दिवसापासून काशीसच त्यांचा निवास होता. त्यांचा बाप वारल्यामुळे उघडी पडलेलीं हीं चारी मुलें आपल्या ममतेच्या पखाखालीं झाकून ही दुःखी आई अशा आशेनें कालक्रमण करूं लागली कीं, लवकरच माझा वडील मुलगा वयात येईल, संसाराचा भार संभाळील आणि माझ्या वार्धक्याचे दिवस कौटुंबिक आनंदात घालवून माझ्या कष्टाचें पारणें फेडील.

पण तिचा तो वडील मुलगा जसजसा वयात येऊं लागला तसतसा ज्या मातेनें त्याला सांभाळलें, तिच्याहून दुसरीच एक मूर्ति त्याला आकर्षण करूं लागली. तो तिला आईची आई, मातेची माता म्हणून संबोधून आपल्या आईला विसरत चालला! आपल्या आईच्या खांद्या-वर पडलेला संसाराचा भार संभाळण्याचें सोडून तो त्या परम मातेच्या संसारासच आपला संसार मानून, तिच्या दुःखासाठीं तो झुरूं लागला, तिच्या मोचनासाठीं झुजूं लागला. त्याच्या त्या दुःखी आईच्या घरीं तिची नुसती भेट घेण्यासहि त्यास सवड मिळेनाशी झाली. कारण, रात्र-दिवस तो त्या त्याचे मनास आकर्षण करून हरून नेणाऱ्या दिव्य मूर्तीच्या मंदिरात "हे भारतमाते! हे जननी! हे जन्मभूमि!" असा ध्यास धरीत पडलेला असे. आईला जननी म्हणण्याचें विसरून स्वजातीलाच 'हे जनक-जननि-जननि!' म्हणून आई म्हणूं लागला!

१९०५ ते १९११च्या क्रांतिकारकांच्या आगखाऊ चळवळीचे ते दिवस होते. त्यांच्या उग्रव्रताच्या उग्रतेसच तरुण अंतःकरणें मोहून जात होतीं. आईबाप, बायका-मुलें, घरदार यांचीं हृदये त्या दिव्य ध्येयाची आणि त्या उग्र साधनाची दैवी दारू जो एकदा पिई तो ते तरुण धुंद होऊन त्यांच्या दृष्टीस दिसेनाशीं होत. त्यांच्या दृष्टीस एकच

दृश्य दिसे. भारतमाता, ती ' जनक-जननि-जननि ' दास्याच्या शृंखलात जखडलेली आहे आणि तिच्या तीस कोटी संतानातील जात्या-येत्यास हटकावीत आहे. ' प्रथम पुढें होअून या माझ्या विमोचनार्थ पेटलेल्या महान् अग्निकुंडात अुडी घालून बलिदानाच्या नवसाची संख्या पुरी करण्यास कोणी प्रथम पुढे येतो आहे काय? '

या मनोवृत्तीने अुत्स्फूर्त झालेला तरुण, शहाणपणाच्या किंवा मूर्ख-पणाच्या सर्व अुपदेशाच्या टप्प्याबाहेर गेलेला असे. प्रकृति विकृतीसारखी आणि विकृति त्यास प्रकृतीसारखी वाटे. घरचा संसार बुडवून दारचा संसार तो थाटू पाही. जीवन मरण वाटून त्यास मरणात मजा वाटे. काशीयात्रेहून त्यास फाशीयात्रा अधिक पुण्यप्रद वाटे. सर्व जिवंत शहा-ण्याचा अुपदेश त्याला अैकू येअीनासा होअी आणि मेलेल्या आत्म्याचे वाचाहीन वक्तृत्वाचे त्यास अक्षर नि अक्षर अैकू येअी.

किशोर शचींद्रनाथ सन्याल त्याच वक्तृत्वास भाळला आणि त्याच आगगिळ्‌ पंथाचा अनुयायी झाला. काशीला त्यानें क्रांतीच्या ' जीवघेअू जीवदेअू ' शपथा घेतल्या. क्रान्तिकारकाच्या कटात मिळून तो बॉबची विद्‌या शिकला, शस्त्रे संचवू लागला, महायुद्‌धाचे धामधुमीत आपले शिर आपले हातात घेअून सर्व हिंदुस्थानभर बंड करून आयुष्याच्या क्रांतिकारकाच्या भयंकर योजनात तो भाग घेअू लागला, आणि तो सैनिकाच्या शिबिरात घुसून, नाना रूपे पालटून, पलटणींस फितवू लागला. त्याच्या घरावर पोलीसपहारे बसले दिल्लीच्या गव्हर्नर जनरलवर बॉब फेकून सत्तेचे सामर्थ्याच्या हत्तीच्या अंबारींत व्हाअीसरायास घायाळ करण्याचे अमानुष कृत्य करणाऱ्या क्रांतिकारकाच्या भीषण साहसानें आणि त्या प्रकरणीं अनेक लोक फासावर चढविले असताही त्या दृश्यानें ज्या सन्यालचे मन चंचल न होता अधिकच रणोन्मत्त होअून अुठलें त्याला

लाहोरला, फिरोजपूरला, कोमागाटामारूच्या झुर्जीत, बालासोडच्या लढा-ईत, झालेल्या क्रातिकारकाच्या आणि अिंग्रजाच्या भयकर चकमकींत क्रातिकाराचे शेकडो तरुण रणात लढून मेले असता, फाशीवर लटकाविले जात असता, अदमानात शेकड्यानी मोजून कोंबले जात असता, भीतीचा लेशहि शिवला नाही किंवा त्याचा तो जिवत शहाण्यानी निंदिलेला मार्ग त्यास टाकाअू वाटला नाही, हे त्याच्या स्वभावास साजेसेच झाले. ज्या वेळेस राजनिष्ठेच्या शपथा घेअून गाधीसारखे शहाणे लोक अिंग्रजास महायुद्धात सहाय्य देववून जर्मनाची कत्तल अुडविण्यासाठी अिंग्रजी सैन्यात हिंदी शिपायाची भरती करीत “ स्वराज्याच्या सरळ मार्गावर ” भरधाव चाललेले होते, त्याच वेळेस शेकडो क्रातिकारक तरुणासह गुप्त रीतीने हा तरुण सन्याल, भरती झालेल्या पलटणीतून बडाचा अुपदेश देत स्वराज्याच्या वक्र आणि रक्ताळलेल्या मार्गाने भरधाव चाललेला होता

ते बड फसले, लाहोरला मोठे मोठे गुप्त कटाचे खटले होअून अिंग्रजाचे राज्य अुलथे पाडण्यासाठी आणि भारतीय स्वातत्र्य सपादन करण्यासाठी शस्त्र धारण करून रणागणात अुतरण्याच्या अपराधास्तव शेकडो फाशी गेले, जहाजे भरून जन्मठेपीवर धाडण्यात आले— त्याच धादलीत शचीद्रनाथ सन्याललाही काशीचे कटाच्या खटल्यात जन्मठेप शिक्षा झाली. त्याचे नादाने त्याचे बधूहि या कटात गवसले होते, त्यानाही बदीची शिक्षा झाली, सन्यालचे घरदार जप्त करण्यात आले. त्याच्या नातलगाचे मागे ससेमिरा लागला. त्या अुद्ध्वस्त कुटुबात त्याची ती वृद्ध माता श्रीमती क्षीरोदवासिनी देवी तेवढी अुरली.

शोकानें विव्हल झाली असेल नाही ती माता? होय, ती विव्हल झालेली होती. वडील मुलगा वयात आल्यावर घरचा ससार तो सभाळील आणि वृद्धपणी माझ्यावर पडलेल्या वैधव्याच्या घाल्याखाली चुरडून

गेलेली. हींच माझीं बाळें संततिसंपत्तीने युक्त होऊन माझी सेवा करून माझे पांग फेडतील, ही तिची आशा जळून गेली होती. तिच्या वडील मुलानें वयात येताच त्या आईचे पांग न फेडता, तिची विचारपूस देखील न करता तिकडे काळेपाण्यावर जाऊन तेलाचा घाणा फिरविला आणि इकडे घरादारावर नांगर फिरविला त्यानें त्याच्या इतर भावानाहि त्याला लागलेलें देशस्वातंत्र्याचें दिव्य वेड लावून दिले, त्याचाहि नाश केला, इतकेंच नव्हे, तर त्याच्या संगतीनें त्या त्याच्या आईला देखील त्या सांसर्गिक वेडाने पछाडलें!

—आणि तिचे उजाड घरहि तिला भरलेलें दिसू लागले. अंदमानात तिचा वडील मुलगा जन्मठेपीच्या शिक्षेवर असताना तिचीं त्याला जीं पत्रें जात त्यामध्यें आपल्या चारहि मुलानीं स्वदेशस्वातंत्र्यार्थ घेतलेल्या व्रतापायी आपला संसार उद्ध्वस्त केल्याविषयीं तिने एका शब्दानेहि त्रास व्यक्त केलेला नसे!

पण लवकरच तो पुन्हा तिला भेटणार नाहीं अशा कठिण जन्मठेपीच्या शिक्षेवर गेलेला तिचा पुत्र योगायोगानें तिला लवकरच भेटला. जन्मठेपेची वीस वर्षांच्या शिक्षेची पांच वर्षांतच सूट मिळून राजक्षमेच्या उलाढालींत सन्याल सुटले, आणि अंदमानातून घरीं परत आले. त्याचे तिघे भाऊहि कारागारातून आणि राजकोपातून मुक्त झाले. त्या वृद्ध आणि निराश क्षीरोदवासिनी देवीच्या 'हेची देहीं हेची डोळा' पुन्हा सर्व मुलें भेटलीं. जें संकट जन्मात पार पडणारें नव्हतें तें पांच वर्षांचे आंत पार पडलें. तिच्या भ्रताराचे आकस्मिक निधनानंतर प्राणाहून पलिकडच्या प्रेमानें वाढविलेलीं आणि क्रांतीच्या वादळात मध्यंतरी नाहींशीं झालेलीं तिचीं कच्चींबच्चीं तिच्या घरट्यात आणि तिच्या पंखाखालीं पुन्हा एकसहा गोळा झालीं. आनंद झाला. घर भरलें.

——पण कोणाचे घर भरलें? क्षीरोदवासिनीचें घर भरले. तथापि तिच्या मुलाला आणि त्याच्या संगतीने आता तिलाहि त्या घराला स्वतःचें घर म्हणावेसे वाटतच नव्हते. जिवावर आली होती पण शेपटावर गेली असें समजून आपल्या दैवानें अदमानहून परत आलेल्या मुलास " नौकरी कर कशी! आता मात्र जपून राहा बर! मरू दे तो देश! संकटात तुम्ही तुरुगात पडलात तेव्हा अेकजण देखील मला भीक घालीत नव्हता! अशा या लोकासाठी कशाला मरतोस! ते सगळे तू गेलास तेव्हा म्हणत 'मला काय त्याचें?' मग तू तरी कशाला मरतोस अशा कृतघ्नाकरिता?"——अित्यादि शहाणपणाचा अुपदेश क्षीरोदवासिनीने आपल्या मुलास दिला असता तर तें अगदीं स्तुत्य नसलें तरी क्षम्य होते, पण तिने तसा चकार शब्दहि काढला नाही!

गरुडास जसे मातींत विसावा घेववतच नाही तसे सन्यालला घरीं करमेचना वादळाशी झुजणें हीच जशी गरुडाची करमणूक तशीच वीरात्म्याची. देशवीर सन्याल आणि त्याचे तिघे भाअू पुन्हा क्रांतीच्या भयंकर निशेंत चूर झाले. त्या जनक–जननि–जननि भारतमातेची हाक त्याच्या हृदयात सारखी प्रतिध्वनित होअू लागली. ते त्याच्यासारख्याच जाज्वल्य आणि अघोरी क्रांतिकारकांसह शस्त्रास्त्रें जमवीत, राजकीय स्वातंत्र्यार्थ अिंग्रजांशीं जीव–घेअू–देअू चकमकी लढत, सरकारी निधि बळकावीत, आगगाड्या लुटीत संयुक्त प्रांतभर पुनः धिंगाणा घालू लागले. त्याचे तेंच प्रकरण पुढे काकोरीचा खटला म्हणून प्रसिद्ध झालें!

त्या खटल्यात सन्यालला पुन्हा जन्मठेप झाली. त्याच्या भावानाही पुनः शिक्षा झाल्या! वर्षं दीडवर्ष पोलिसानीं तिच्या मुलास तिच्या घरून पुन्हां धरून नेल्यापासून तों मुलाना काकोरीच्या खटल्यात जन्मठेपीच्या

दुसऱ्या शिक्षा लागेतों त्या क्षीरोदवासिनी देवीनें खाणें, पिणें, न्हाणें, निजणें अित्यादि शारीरिक आवश्यकतेच्या गोष्टींतही अत्यंत त्रास सोसला, छळ सोसले, दुःख सोसलें!—पण अेका शब्दानेंही 'मरो तो देश! जळो तें स्वराज्य!' असें म्हटलें नाहीं. ती माता होती. तिची चारी मुले दहा बारा वर्षें सारखीं पोलीस अटकेंत जाअून सुटत आणि पुनः पडत होतीं. अर्थात् मुलाच्या ताटातुटीने ती विव्हल होअी, पण अेका शब्दानेंही त्याना स्वातंत्र्य-युद्धापासून परावृत्त करीना! अुलट त्याना विजय मिळो म्हणून ती त्याना आशीर्वाद देअी! कारण ती नुसती माताच नसून वीरमाता होती. स्वदेशस्वातंत्र्यार्थ आपली मुलें तिने देवाला आणि देशाला मनोभावानें अर्पणच केलीं होतीं. शचींद्रनाथ सन्यालला दुसरी जन्मठेप होअून ते पुनः कारागारात पडल्यानंतर आणि तिची अितर मुलेंहि दुरावल्यानंतर क्षीरोदवासिनी झुरणीस लागली, आणि मुलावाचून तळमळत आअीची जी अवस्था होते, ती तिची झाली. झुरत झुरत देवी क्षीरोदवासिनी अेप्रिल १९२८ मध्यें वारली! तिचा तो वडिल मुलगा तिला मरताना माडी देण्यास देखील येअू शकला नाहीं!!

मुलासाठीं झुरत आअी मेली—पण मरताना देखील, आपल्या या देवप्रिय मातृभूमीचे स्वातंत्र्यार्थ झुजणारे वीरपुत्र आपल्या कुशींत अुत्पन्न झाले म्हणून ती वीरमाता स्वतःस धन्य मानीत मेली!

प्रिय मातृभूमीच्या स्वातंत्र्ययज्ञात आपण स्वतःच नव्हे तर आपला वंशाचा वंश पुनः पुनः स्वातंत्र्यलक्ष्मीच्या स्थंडिलावर बळी देणारे जे काहीं धन्य देशवीर या हिंदुस्थानात आणि या हिंदूत निघाले, त्यात शचींद्रनाथ सन्याल यांचें कुटुंबहि गणिलें गेलें पाहिजे.

त्या वीर कुटुंबातली ती वीरप्रसू क्षीरोदवासिनी—तिचें नाव, कुमारिकानो

आणि गृहिणींनो !—गर्भवतींनो आणि मातानो !—तुम्ही प्रत्यही प्रातः-काळी स्मरण करा. त्या तशा पंचकन्यांच्या स्मरणाअितकेंच ह्या अशा वीरकन्यकांचें स्मरणहि तुम्हास आणि तुमच्या देशास कल्याणकारक झाल्या-विना राहाणार नाहीं !

---

६. पाहिजे तर शस्त्राचारी म्हणा; पण अत्याचारी नव्हे ! !

[याच लेखामुळे अिंग्रजसरकारने "श्रद्धानंद" पत्र शेवटीं बंद पाडले.]

(श्रद्धानन्द, दिनाङ्क १० मे १९३०)

निंदाव्यंजक विशेषणानें अेकाद्या पदार्थाला नसतें निंद्य-स्वरूपहि प्राप्त होते 'आला आहे अेक थेरडा' असे जर कोणी आपल्या वृद्ध वडिलांना पाहून म्हणाला, तर तो अक्षरशः खोटेच बोलतो असे जरी म्हणता आले नाहीं, तरी अितकें खचितच म्हणता येईल कीं, त्या वृद्ध गृहस्थाचे पोटीं हा असें म्हणणारा मुलगा म्हणजे अेक जंतच निजपला आहे ! 'हे आले आहेत माझे वृद्ध वडील' आणि 'हा आला आहे माझा थेरडा बाप', दोन्ही वाक्यांचा अर्थ जरी जवळ जवळ अेकच असला आणि क्वचित् बोलण्याचा हेतुहि सारखाच असला, तरी त्या दुसऱ्या वाक्यातील हलकट शब्दासरशीच त्या व्यक्तीविषयींहि सकृत्दर्शनी तरी नसता हलकट भाव अुत्पन्न होतो.

आज क्रांतिकारकांना सरसकट अत्याचारी म्हणण्याचा जो प्रघातच पडल्यासारखा झाला आहे, तो अशाच हलकटपणाचा द्योतक आहे. क्रांतिकारक पक्षाला आजकालचे लेखक किंवा वक्ते जेव्हां सहजच अत्याचारी

म्हणून जातात तेव्हा त्याच्यातील अनेकाच्या मनात क्वचित् त्या पक्षाविषयीं नसती निंदाच करण्याचा हेतु असतो असे नाही. पण शब्दाची योजना यथार्थपणें पारखून करण्याची सवयच नसल्यानें ते स्वत.च्या बापाला 'वृद्ध' म्हणून न म्हणता सहजच 'थेरडा' म्हणून जातात.

मागे अवघ्या हिंदी लोकाना 'नेटिव्ह' (Native) म्हणून स्वत. हिंदी लोकच म्हणत असत. वास्तविक हा नेटिव्ह शब्द प्रथमतः अिंग्रजानीं भारतीयास असभ्य, न सुधारलेले, बर्बर या अर्थी अुपयोगिला. पण हा त्यातील गर्भितार्थ न समजून किंवा अुपेक्षून अिंग्रजाचे देखोदेखी आमचे स्वतःचे लोकहि स्वतःस नेटिव्हच म्हणवून घेत. प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेच्या जुन्या लिखाणात हा शब्द भारतीय या अर्थी सरसहा वापरलेला आढळेल ! पण पुढे वगभगाच्या चळवळीत, आत्म-सन्मानाच्या पहिल्या जागृतीत, या शब्दातील निद्यभाव झोंबू लागला आणि भारतीयानीं स्वतःस नेटिव्ह म्हणून घेण्याचें साफ नाकारले. अर्थ पाहून शब्द योजिण्याअितका शहाण-पणा लोक शिकू लागले.

पुढें लोकमान्याच्या राष्ट्रीय पक्षाचा अुदय होताच त्याचे शत्रू त्यास Extremists 'अतिरेकी' म्हणून संबोधू लागले. त्या शब्दातील निंदागर्भ खोच ज्याच्या ध्यानात येअीना ते स्वतःलाहि I am an extremist म्हणून अैटीने म्हणताना आढळत असत! नतर तोहि शब्द झोंबू लागला आणि लोकमान्यादिकाचा पक्ष स्वतःला तरी 'अतिरेकी' न म्हणता राष्ट्रीय पक्ष म्हणवू लागला!

अजूनपर्यंत पूर्वास्पृश्याच्या शाळेस Low Caste School म्हणजे हीन जातीची शाळा म्हणतात! अितकेच नव्हे, तर तो शब्द स्वतः अस्पृश्य पुढारीहि निःसकोचपणें वापरून स्वतःलाच Low-Caste हीन जाति म्हणवूं लागतात. ह्या शब्दाचा निषेध आम्ही करू लागलों तेव्हा

त्यातील निद्य अर्थ आता कुठें त्याच्या ध्यानीं येत आहे. अर्थ पारखून शब्द न योजण्याच्या अनाडी सवयीमुळे मनुष्य आपल्या शत्रूनी दिलेल्या शिवीस देखील असा पदवीसारखा मानू लागतो !

तीच स्थिति क्रातिकारक पक्षाविषयी झाली. राष्ट्रीय पक्षास 'अतिरेकी' हें नाव भारतीय शत्रूनी दिले तर क्रातिकारकास "अराजक" असे सबोधन ते वापरू लागले. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, ते 'अतिरेकी' नाव स्वतःला दिले म्हणून जो चिडे तो राष्ट्रीय पक्ष देखील त्या क्राति-कारकास मात्र अनार्किस्ट—अराजक—म्हणूनच सबोधू लागला ! जे स्वराज्यासाठीच क्रातिकारक होते—ज्याना केवळ पर-राज्य काय तें नको होते, पण स्वराज्य हवे होते, अितकेंच नव्हे तर, दास्य-लाछनाने लेश-मात्रहि अकलाकित असे सपूर्ण आणि स्वतत्र राज्य हवे होते—त्याना 'अराजक' म्हणण्यात येअी !

पण त्याहूनहि आश्चर्याची गोष्ट ही की, भारतीय राजकारणात ज्या अेकाच पक्षानें काय ते आपलें डोकें ठिकाणावर ठेविलें होते, जो शत्रूच्या मानभावीपणानें कधींहि लेशमात्रहि चळला नाहीं, फसला नाहीं, भुलला नाही, भ्रमला नाहीं त्या क्रातिकारक पक्षाला भिक्षा, अर्ज, विनत्यापासून तों जर्मनास मारण्याठीं त्या अिंग्रजाच्या वतीनें लढू निघण्यापर्यंतच्या सर्व वेडानीं भारलेलें आणि कालपर्यंत 'स्वातत्र्य शब्दाचा अर्थहि मला कळत नाहीं' म्हणून स्वतःच सागणाऱ्या गाधींच्या गोतावळींतील बिनघोरणी आणि बिनमाथी लोकच 'माथेफिरू' म्हणत असत ! अगदीं कालपर्यंत म्हणत असत !

पण आता क्रातिकारकास अराजक 'अनार्किस्ट' म्हणणारे स्वतःच त्या क्रातिकारकाचे शिष्य होअून सपूर्ण स्वातत्र्यवादी झालेले आहेत ! आता अराजक असतील तर सारेच अराजक आहेत, कारण, परराज्य नको असें

सारेच म्हणत असून तसा प्रयत्नहि करण्यात येत आहे. तीच स्थिति 'माथेफिरू' पणाची. पूर्वी क्रांतिकारकांना माथेफिरू म्हणत जे 'अुदार अिंग्रजाचे' पाय चाटीत बसत, त्या सगळ्या किंकर्तव्यता–विमूढ झाले-ल्यांची माथीहि, अिंग्रजांच्या पुढे लाळ घोटीत थकून जाअून आणि अिंग्रजांच्या लाथा ओ येअीतों खाअून, शेवटीं फिरावयाचीं तीं फिरून गेलीं आहेत. क्रांतिकारकांत आणि त्यांच्यात आतां माथेफिरूपणाचा फरक अुरला नाहीं. केवळ सहनशीलतेच्या, म्हणजेच स्पष्ट प्राकृतांत कोडगेपणाच्या, परिमाणांत काय फरक पडला असेल तेवढाच अुरला. तेजस्वी सिंह अपमानाच्या नुसत्या खुणेसरशी चवताळून अुठला. अितर श्वापदे—ससे, सरडे—शतक शतक ब्रिटिशांच्या टेबलाभोंवतीं तुकड्या-तुकड्यांसाठीं गोंडा घोळून तोंडे वेंगाडून थकल्यानंतर मग बिथरलीं, मग खिंचाळू लागलीं, किंचाळू लागली, भुंकू लागलीं. क्रांतिकारकांच्या ज्या ज्या वाक्यासाठी ते त्यांस माथेफिरू म्हणत, त्या त्या सर्व वाक्यांची क्रांतिकारकांच्या पायापुढे सथा घेअून आतां ते सर्वच तीच भाषा बोलत आहेत. जवळजवळ तसेंच आचरण करीत आहेत

अशा प्रकारे आतां तो प्रसंग स्वतःवरच बेतल्यामुळे क्रांतिकारक पक्षाला अतिरेकी, अराजक किंवा माथेफिरू असे म्हणण्याचा हीनपणा—भ्याडपणा—भारतीय पक्षांत तरी कोणी फारसा करीत नाहीं. त्या शब्दाचा अुपयोग अर्थ पारखून करण्याअितका शहाणपणा वा प्रामाणिकपणा बहु-तेकजण दाखवू लागले आहेत. पण तरीहि काहीजण मत्सराने तर कांहीं-जण अंध सवयीमुळें क्रांतिकारकांना अत्याचारी म्हणण्याचा हीनपणा किंवा भ्याडपणा अद्यापहि करीत आहेत.

आज क्रांतिकारक पक्षांत आणि अितर प्रमुख राजकीय पक्षांत राजकीय मागणींत, भाषेत किंवा तीव्र अुद्वेगांत काही फरक अुरला नाहीं. त्या

स्पेपन

दोघाचें ध्येयहि पूर्ण स्वातंत्र्य हेंच झालेले आहे. क्रातिकारकानीं जे ध्येय तीस वर्षापूर्वी घोषित केलें त्याच ध्येयाच्या ध्वजाखालीं, जे पूर्वी ब्रिटिशानी त्याच्या गळ्यात घातलेल्या पाळीव पट्ट्यानाच भूषण म्हणून मिरवीत, ते भूतदयेच्या भ्रमाचे भोपळ्याचे भोपे होऊन भटकत फिरणारे सारे पक्ष, आज अेकत्र झालेले आहेत आणि क्रातिकारकासह क्रातिकारकानींच आविर्भूत केलेल्या त्या दिव्य मत्राच्या, त्या 'स्वातत्र्यलक्ष्मी की जय'-च्या गर्जना करीत आहेत. आपल्या राष्ट्रमातेच्या हितार्थ आपली मागें झालेली 'गलती' भूल, भ्रम तत्काळ सुधारण्याची जी तत्परता आणि सरळता त्या आमच्या देशबधूनी दाखविली, त्याविषयी कोणाहि देशभक्तास आनदच होअील, पण ज्या अर्थी क्रातिकारकाचे आणि त्याचे ध्येय अेकच असताहि केवळ क्रातिकारक त्या न्याय्य व दिव्य स्वातंत्र्य-ध्येयाच्या प्राप्तीस्तव अपरिहार्य असा सशस्त्र प्रतिकार करू अिच्छितात आणि अितर पक्ष निःशस्त्र प्रतिकाराने ते स्वातत्र्य मिळवू पाहतात अेवढ्या फरकासाठीं त्या क्रातिकारकास 'अत्याचारी' म्हणण्याचा शिव-राळपणा अजूनहि ते लोक करीत आहेत, त्या अर्थी त्याच्या ह्या हलकट मनोवृत्तीचा शक्य तितका तीव्र आणि वारवार निषेध करीत राहिल्या-वाचून गत्यतरच नाहीं. त्याच्या मागच्या अनेक चुक्या जशा त्याना क्रातिकारकाच्या प्रतिकारामुळें सुधाराव्या लागल्या, तशी हीहि चुकी सुधारणे त्याना भाग पाडलेंच पाहिजे.

सशस्त्र प्रतिकार करणाऱ्या क्रातिकारकाचें या 'अत्याचारा'च्या आक्षेपास काय अुत्तर असतें त्याचा आम्हीं निःपक्षपाती दृष्टीनें प्रथमतः विचार केला पाहिजे. त्याचीं साधने जशीं आम्हास आवडत नाहींत तशीं आमचीं साधने त्यासहि सर्वस्वी आवडत नाहींत. विशेषत. आमच्या साधनाच्या समर्थनार्थ जो नीतिनियमाचा पोकळ पाल्हाळ आम्ही लावतो त्याचीच

त्याना अतिशय घृणा वाटते. आम्ही म्हणतों, आत्मशुद्धि—आत्मशुद्धी करता अुपास करू या! पण ते क्रांतिकारक म्हणतात, आत्मशुद्धि कोणाची? ज्याने हा भारतवर्ष तरवारीच्या टोकाने पददलित करून ठेविले आहे त्याची! हे महापाप त्याने केलें—त्याला अुपास घडले पाहिजेत स्वतःचा देश स्वतंत्र करू पाहाणाऱ्या आम्हास पापच शिवत नाहीं तर शुद्धि कसली! आम्ही म्हणतो, आम्हीं अनत्याचाराची शपथ घेतली आहे आम्ही अनत्याचारानें स्वातंत्र्य मिळाविणार! पण ते क्रांतिकारक म्हणतात तुम्हाला अत्याचाराची व्याख्याच कळली नाहीं. आम्ही देखील अनत्याचारीच आहोत, आम्ही सशस्त्र प्रतिकार करीत असलो तरी तो न्यायाचे रक्षणीं, आततायाचे दण्डनार्थ असल्यामुळें तो सदाचार आहे! अत्याचार नव्हे. आम्ही कोणाच्या देशावर शस्त्र-बळाने दरवडा घातला नाही. जे आमच्या देशावर बळजोरी करीत आहेत ते अत्याचारी—आम्ही नव्हे! आम्हास पाहिजे तर शस्त्राचारी म्हणा, पण अत्याचारी नव्हे! कारण, अत्याचारी तो कीं जो दुसऱ्या निरपराध मनुष्याची हिंसा करतो. दुसऱ्याचे घर दुष्टपणानें फोडतो, न कीं तो जो त्या घरफोडू दरवडेखोरास किंवा हत्यारीस सशस्त्र बळाने शासन देतो दुसऱ्याच्या देशावर बळानें राज्य करतो तो अत्याचारी, न कीं तो जो स्वदेशास, वेळ पडली तर, सशस्त्र प्रतिकारानेंहि मुक्त करण्यासाठीं झुजतो!

क्रांतिकारक मार्ग कोणास मान्य नसले, सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब आम्हीं करावा असे कोणास वाटत नसलें, तरीहि हिंदुस्थान देशास जे शस्त्रबळानेंच पारतंत्र्यात ठेवीत आहेत त्याच्याशीं शस्त्रबलानेच जे झुजू पाहतात त्या हिंदी क्रांतिकारकास अत्याचारी म्हणण्याचा मूर्ख शिवराळपणा त्यानीं का करावा? कारण, त्यास केवळ शस्त्रधारणार्थ अत्याचारी म्हणताच देशस्वातंत्र्यार्थ झुजणाऱ्या वॉशिंग्टन, मॅझिनी, लेनिन,

अितकेंच काय पण श्रीराम, श्रीकृष्ण, शिवाजी——फार काय अितिहासातील पूजनीय झालेल्या जवळ जवळ साऱ्या व्यक्तींना अत्याचारी म्हणणे न्यायतः भाग पडेल. कारण ते सर्व आततायी शस्त्रबळाचा सरक्षक शस्त्रबळानेंच प्रतिकार करीत आले आहेत! तात्त्विक दृष्ट्या पाहिलें तर क्रातिकारकाना हिंसक म्हणून निंदिणाऱ्या लेखणीनें वा जिभेने क्रातिकारकाना हिंसक म्हणणाऱ्या तथाकथित अहिंसावादृयानाहि हिंसकच म्हटलें पाहिजे, कारण पिसाळलेल्या कुत्र्यास गोळी घालून ठार मारण्यास प्रोत्साहन देणें, गाअीलाहि गोळी घालूनच ठार मारणें योग्य ठरवणें, माकडानाहि मारण्याचे कार्याला समति देणें हे त्या गाधीश्रुति अहिंसाचार्यांना न्याय्य वाटते. जर्मनाना तर लढाअीतील क्रूरातील क्रूर शस्त्रानीहि ठार मारण्यासाठीं ते बिनपगारी रिक्रूटिंग ऑफिसर बनण्यापर्यंत पाळी आली होती. तेव्हा ज्याना क्रातिकारक शस्त्रधारक किंवा बलवादी आहेत म्हणून त्याना । ॰ - ॰ आणि हिंसक म्हणावयाचे असेल, त्यानीं तोच मान अहिंसावादृयानाहि दिला पाहिजे. अत्याचारी भगतसिंह, हिंसक जतीद्रनाथ असें ते म्हणताच क्रातिकारकहि ‘ हिंसक अत्याचारी गाधी ’ असे म्हणण्यास सोडीत नाहींत हे लाहोर कॉंग्रेसच्या मडपात प्रत्ययास आलेंच आहे. अनेक वेळा क्रातिकारकास हिंसक, अत्याचारी म्हणून सबोधण्याचा परिणाम हा झाला होता कीं, लाहोरच्या मार्गातून आणि स्टेशनवरून क्रातिकारक तरुणानीं गाधीजींचें माहात्म्य अुपेक्षून सतापजनक आरोळ्यानी धिःकार केला होता हें सर्वांस ठाअुक असेलच.

देशात अेक खादीचा अत्यत अभिमानी पक्ष अस्तित्वात आहे. त्यास अितरानीं खादाळ म्हणून म्हणणें त्याना शिवराळपणा वाटेल. केवळ सुतानें स्वराज्य घेअू असें म्हणणारा अेक पक्ष काहीं दिवसापूर्वीं या देशात होता आणि आजहि त्या पक्षाचा निर्वंश झाला आहे असें नाही. पण केवळ

छप्पन

पाहिजे तर शस्त्राचारी म्हणा; पण अत्याचारी नव्हे!!

सुतानें किंवा मिठानें स्वराज्य मिळविण्यावर ज्याचा विश्वास नाहीं त्यानी जर त्यास 'सुताळ' किंवा 'मिठाळ' म्हणून म्हटलें, तर तो त्याना शिवराळपणा वाटेल. पण जेव्हा हेच लोक त्या क्रातिकारास स्वदेश—स्वातंत्र्याच्या न्याय्य कार्यी ते सशस्त्र प्रतिकारहि करण्यास कचरत नाहीत अेवढ्याचसाठीं अत्याचारी हिंसक म्हणतात, तेव्हा त्याना तो मात्र शिवराळपणा वाटत नाहीं!! वास्तविक पाहता क्रातिकारकाना सरसकट 'अत्याचारी' हे नाव देणे हा शिवराळपणाच नव्हे तर सत्याचे स्तोम माजविणाऱ्याना लाज वाटावी असा मत्सरी ढोंगीपणा आहे. कारण, ते लोक रामास हिंसक म्हणत नाहींत तर रावणासच म्हणतात, कृष्णास हिंसक म्हणत नाहींत तर कसासच म्हणतात. अर्थात् त्यास हें कळण्याअितकी बुद्धि असते की, आततायी बळ हा अत्याचार होय, परतु आततायाचा प्रतिकार करणारें बळ सदाचारीच समजले जातें. भारतीय दड-विधानातहि, म्हणजे प्रत्यक्ष अिंग्रजाच्या पिनल कोडामध्येंहि, स्वसरक्षणार्थ अत्याचारीला मारण्याचें तत्त्व आणि हा भेद राजकीय विभाग सोडून अितरत्र मान्य केलेला आहे. तेव्हा केवळ सशस्त्र प्रतिकारास ते सिद्ध होतात आणि शस्त्रबळाचा अगिकार करतात म्हणून भारतीय क्रातिकारकास अत्याचारी म्हणणें हा निर्भेळ मिथ्याचार होय.

क्रातिकारकाचे मार्गास त्याज्य म्हणा, त्यास पाहिजे तर क्रूर म्हणा, चुकलेले म्हणा, त्याचे मार्ग कोणीं अवलंबू नयेत असें म्हणा; परतु स्वदेश-स्वातंत्र्यार्थ अत्यत पवित्र हेतूनें स्वार्थत्यागाची, प्राणत्यागाची, शौर्याची आणि पराक्रमाची पराकाष्ठा करणाऱ्या त्या क्रातिकारक वीरास 'अत्याचारी' 'हिंसक' म्हणून हेटाळणाऱ्या 'अहिंसा(!) वाद्या'नीं येता जाता आपली जिव्हा विटाळून घ्यावी हें सत्याग्रही अत्याचाराचे अेक मसालेवाअीक अुदाहरण आहे.

क्रांतिकारकाचा देह आणि वाचा अिंग्लिश बेयॉनेटाच्या टोकानीं अवरुद्ध केलेली असताना त्याच्या त्या अिंग्लिश अत्याचाराने भाग पडलेल्या मौनाचा लाभ घेअून, पिंजऱ्यातल्या सिंहावर मूर्ख मुले थुंकतात तसें, वाटेल त्याने थुंकत सुटावे यात शौर्य तर नाहीच नाही, पण साधा प्रामाणिकपणा देखील अुरत नाहीं. क्रांतिकारकास जो अधिक शिव्या देअील, त्यास तितके दिवस बहुधा अिंग्रज सरकार बेडूया हातकड्या ठोकीत नाहीं, त्याची वाचा त्याच प्रमाणात मोकाट सुटते, हा लाभ पदरात पाडून घेण्यासाठीच जर कोणी सशस्त्र क्रांतिकारकास हिंसक म्हणून म्हणण्याचा क्रम चालू ठेवाल तर त्याच्या ह्या व्यवसायाचे आड आम्ही येअू अिच्छीत नाहीं परंतु केवळ अज्ञानाने किंवा सवयीने किंवा अविचाराने जे क्रांतिकारकास अत्याचारी म्हणत असतील त्यानीं यापुढे तरी असा शिवराळपणा करू नये. क्रांतिकारकाचे मार्ग तुम्हास मान्य नसतील तर नसोत. तुम्ही तुमच्या मार्गाने जा, पण तुमच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं अधिकात अधिक पराक्रम आणि भव्यातील भव्य स्वार्थत्याग करणाऱ्या त्या देशवीराना पाहिजे तर शस्त्रधारी म्हणा, बळवादी म्हणा, शस्त्रवादी म्हणा पण अत्याचारी म्हणू नका! आणि जर केवळ ते शस्त्रधारण करून त्यास अपरिहार्य वाटणाऱ्या रक्तपातास प्रवृत्त होतात म्हणून त्यास अत्याचारी म्हणावयाचे असेल तर मग अत्याचारी शिवाजी, अत्याचारी गांधी, अत्याचारी वॉशिंग्टन आणि हिंसक तुकाराम असें म्हणण्यास तरी सिद्ध व्हा! कारण तुकाराम देखील म्हणतात कीं,

विंचु देव्हाऱ्यासी आला । देवपूजा नावडे त्याला ॥
तेथें पैजाराचे काम । अधमासी तो अधम ॥

---

७. वीर युवक शशिमोहन दे

(श्रद्धानंद : १४-७-१९२७)

अेकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयम् ।

असा आठवडा जात नाहीं, असा दिवस जात नाही कीं, बंगालमध्यें कुठें ना कुठें तरी हिंदु कुमारिकास आणि हिंदु कुमारास कोणा ना कोणा तरी मुसलमान गुंडानीं राक्षसी अत्याचार करून पळवून नेलें नाहीं ! परंतु त्या हिंदु कुमारिका ज्या समाजातून पळवून नेल्या जातात, तो हिंदु समाज स्वस्थपणें म्हणत आहे, "मला काय त्याचें ! बंगाल्यातील हिंदु कुमारिकांवर अत्याचार होत आहे—महाराष्ट्रांत तर नाहीं ना ? मग मला काय त्याचें ?"

बंगाल्यातील ज्या गावीं प्रथम कोणा हिंदु अबलेस रात्रीं बेरात्रीं छापा मारून अशा कोणा अधमानीं भ्रष्ट केली, त्या गावचे शेजारच्या गावीं ती बातमी जाताच तेथील प्रत्येकजण म्हणत असे, "त्या गावीं ना ? आग लागेना त्या गावांत, मला काय त्याचें !" जेव्हा ती आग त्या दुसऱ्या गावींहि लागली आणि त्यात हिंदु राष्ट्राची होळी पेटली तेव्हा तिसरा गाव म्हणाला, "त्या दोन गावाची होळी झाली ना ! असेल, मला काय त्याचें ! माझ्या घरातील मुलेंबाळें सुखरूप आहेत !"

अितक्यात त्या तिसऱ्या गावींहि क्रूर आणि राक्षसी धर्मवेड त्याच्याच

घरच्या मुलाबाळाच्या तोंडात बोळे कोंबून त्याचे समक्ष त्यास भ्रष्टविते झाले. तरी त्याच्या शेजारच्या हिंदु घरानें म्हटले, "आपलें दार लावून घ्या! तें शेजारचें हिंदु घर जाणे आणि त्याचा हिंदुधर्म जाणे! मला काय त्याचें!"

अशा रीतीनें या षंढ तत्वातील सूत्रापायीं, या 'मला काय त्याचें' पायीं, बंगालमध्यें हजारो हिंदूंच्या वस्तींत अेकेक दोन दोन मुसलमानी गुंड घुसून वाटेल तो अनन्वित अत्याचार करीत आले. आग, जाळपोळ, अत्याचार—धर हिंदु कीं कर मुसलमान, असा धडाका चालला, असे हजार वर्षे चालले! अेका गेल्या साठ वर्षांपूर्वी हिंदु शेंकडा ५५ होते ते आता शेंकडा ३० अितके असून मुसलमान शेंकडा ७० पर्यंत वाढले! याचें अेक मुख्य कारण म्हणजे हेंच होते कीं, खालच्या जातींच्या शेंकडों हिंदु स्त्रिया मुसलमान सरसहा भ्रष्टवीत गेले, तरी वरच्या जातींचे हिंदु असल्या गुंडगिरीच्या प्रकरणात लक्ष घालणे म्हणजे आपल्या सभ्यपणास लांछन होय, असें समजून म्हणत बसले की, "मला काय त्याचें!" पण आपल्या स्वधर्मांच्या त्या खालच्या जातीतील स्त्रियांचा—आपल्या भगिनींचा—अपमान अुघड्या डोळ्यांनीं पाहण्याच्या या घोर पापाचें शासन निर्घृण काळाने अती त्या निर्लज्ज सभ्यपणासहि देण्यास सोडलें नाहीं! आपल्या हिंदु शेजाऱ्याच्या पत्नीस परधर्मीय असुर छळीत असता दारे लावून बसणाऱ्या "मला काय त्याचें" वाल्या सभ्य गृहस्थाच्या पत्नीवरच आज प्रसंग कोसळत आहे. त्या पळवून नेअू दिलेल्या असभ्य स्त्रियांच्या पोटीं झालेल्या संततीनें सारखी वाढत गेलेली मुसलमानांची संख्या शेवटीं सभ्यांच्याहि शिरावर नाचू लागली!

अितक्यांत

अेक वीर युवक बंगल्यात जन्मास आला. त्याचें नाव शशिमोहन दे. तो सिल्हटचा निवासी. तो वयानें अजून पुरता अठरा वर्षांचा देखील नाहीं!

पण अठराशे वर्षांत हिंदु जाति जे शिकू शकली नाहीं, तें तो या अठ
वर्षांत शिकला ! जो तो हिंदु

मला काय त्याचें

म्हणत होता. गेल्या तीन वर्षांत प्रत्येक दिवशीं कोणा ना कोणा तर हिंदु कुमारिकेवर, हिंदु अबलेवर, कोणी तरी अधम मुसलमान बलत्का करीत आला आहे. पण मेल्या आओीचें दूध प्यालेलें निर्लज्ज सभ्यप अजूनहि म्हणत होते कीं, " मला काय त्याचे ! " ते " अहिंसावादी ' होते, त्याना स्वराज्य मिळवायचे होते ! त्याच्या आया–बहिणी मुसलमा नेत तेव्हा ते म्हणत, " आम्ही स्वराज्य मिळवीत आहोंत ! आम्हाल काय त्याचें ! " अशा स्थितींत हिंदु कन्यकावर हात टाकावयास सवक लेला सिल्हट जिल्ह्यातील अेक मुसलमान जमिनदार फैयाजअल्ली ह आजूबाजूच्या कित्येक गावात अेकाद्या पिसाळलेल्या कुत्र्यासारखा जे हिंदु दिसेल त्याला चावत चालला. हिंदु कन्यकाना त्या गुंडाचे भीतीं अेकटे दुकटे मार्गांतून फिरण्याची चोरी झाली ! जों जों तो या पापकर्मा पटाअीत होअू लागला तों तों मुसलमानातील पाजी लोकात तो "गाजी' म्हणून मान्यता पावूं लागला ! कारण, हिंदु कन्यकास बलात्कारानें भ्रष्ट विणें म्हणजे अेक शतकृत्य करणें होय, मुसलमान जाती वाढविणें होय मक्केची अेक यात्रा करण्याचें पुण्य जोडणें होय, अशी काहीं मुसलमानाचं राक्षसी वृत्ति झालेली आहे. हें केवळ गेल्या दोन तीन वर्षांतील न्याया लयातून चाललेल्या अनेक खटल्यावरूनहि सिद्ध होण्यासारखें आहे असा तो पाजी गाजी फैयाजअल्ली चदेरचदूर, राधाचकर अित्यादि गावीं अनेक हिंदु कन्यकास भ्रष्टवीत आणि पळवून नेत असता त्यास नेहमीं रमाणें बहुतेक हिंदु " मला काय त्याचें ! " म्हणून म्हणणारेच मिळाले, पण अेक दिवस मात्र त्याला अेक हिंदु वीर युवक असा भेटला कीं, ज्यानें

या मुसलमान गुंडास हटकलें ! त्या वीर युवकानें त्या गुंडाच्या दुष्कृत्यास अैकून मनात म्हटलें,

" थांब दुष्टा !

जी जी हिंदु स्त्री या बंगाल्यात आहे, या हिंदुस्थानात आहे, ती ती माझी धर्माची बहीण आहे ! तिचा अपमान तो माझ्या बहिणीचाच अपमान ! " त्या वीर युवकानें ' मला काय त्याचें ' म्हणून पाठ फिरविली नाहीं, तर तोंडास तोंड देअून म्हटलें, " मला काय त्याचें ? नाहीं ! तर

मला त्याचें सर्व कांहीं-आहेच आहे !

हिंदूच्या कोणत्याहि स्त्रीचा अपमान तो माझ्या बहिणीचाच अपमान असून त्याचें शुभाशुभ मला आहेच आहे ! हिंदूचें कोणीहि अपत्य कुठेंहि जन्मलें तरी मला सुवेर आहेच आहे, कारण त्यानें माझें कुटुंब वृद्धि पावतें ! कोणीहि हिंदु स्त्री वा पुरुष हिंदुत्वास कुठेंहि मुकला–मेला कीं, मला त्याचें सुतक आहेच आहे, कारण त्या योगें माझ्या रक्ताचा माझा अेक भाअू मला अंतरतो ! जेथें कोठें कोणा हिंदूचा छळ होत असेल तेथें तेथें तो माझाच छळ होत आहे. मला त्याचें दुःख होणार ! मी त्याचा प्रतिशोध—' सूड ' घेणार ! "

अशा प्रवृत्तीचें काहूर ज्याच्या चित्तात माजलें आहे, असा तो वीर युवक, तो अठरा वर्षांचा तरुण, अेक दिवस मार्गानें चालला असता, अेका सामान्यशा हिंदूचे घरात त्यानें आरडाओरड अैकिली. तो किंचित् वळला, तों कोणा दीन अबलेचें करुणक्रंदन कोणा नरपिशाच्चाच्या मेसूर मेवडावण्यात मिसळलेलें त्याला अैकू आलें. तो घरात डोकावला, तों त्या आजुबाजूच्या गावात कुलीन हिंदूवधूना भ्रष्टवीत माजलेला तो राक्षस, जमीनदार फैयाजअल्ली, एका विवाहित हिंदू कुलवधूस फरफर

ओढीत हाणीत तिच्यावर बलात्कार करू पाहात असताना त्याला दिसला! ते घर शशिमोहनच्या ओळखींचें नव्हते, ती मुलगी शशिमोहनची बहिण, वा भावजय वा पुतणी—कोणीहि लागत नव्हती. पण ती हिंदूची मुलगी होती. आणि शशिमोहनहि हिंदूच होता. म्हणूनच तें घर त्याचें होतें, ती हिंदू मुलगी त्याला त्याच्या सख्ख्या बहिणीप्रमाणे—भावजयीप्रमाणेच जवळ होती. ती दीन अबला हिंदू होती आणि तो तिचे सतीत्व आणि हिंदुत्व बलात्काराने भ्रष्टवू पाहाणारा नरपशु अेक अहिंदु होता—अेक मुसलमान होता! वीज तळपावी तसा शशिमोहन अकस्मात् आत घुसला. त्याला पाहाताच गाय हंबरावी तशी ती हिंदु कन्यका साह्यार्थ दीन रवाने हंबरली. फैयाजअल्ली गुरकावून त्या तरुणाचे अंगावर आला. "मला काय त्याचे!" म्हणणाऱ्या हिंदूतीलच हा अेक हिंदु म्हणून फैयाज गुरकावला आणि म्हणाला, "तुला काय त्याचें!" शशिमोहन कृतीने म्हणाला, "जें बहिणीचें भावाला, हिंदूचें हिंदूला—तें तिचें मला! नराधमा, सोड तिला!" फैयाज सोडीना. वीज कडकडून पडावी तसा कडकडून तो वीर युवक त्या अुन्मत्त फैयाजअल्लीचे अंगावर कोसळला आणि क्षणार्धात त्यानें शस्त्र अुपसून त्या फैयाजास छाटून काढलें! शशिमोहननें त्या मुसलमानी गुंडास ठिकच्या ठिकाणीं ठार केलें!

शशिमोहननें असा विचार केला नाहीं की, या कोण्या यःकश्चित् हिंदु स्त्रीसाठी मी माझा अठरा वर्षांचा कोंवळा लुसलुशित प्राण का देअून टाकू? मला फाशी होअील. माझी आअी रडेल. संसाराच्या सुखाचें षड्रसयुक्त पान माझ्यापुढें तारुण्यानें आत्ताच वाढून ठेवलें आहे. मी त्या पानावरून असाच कसा अुठू! असा काहींहि शहाणा षंढपणा मनास शिवूं न देता अेका हिंदू कन्यकेस अेक मुसलमान बलात्कारानें भ्रष्टवीत आहे हें पाहाताच पूर्वी देवानीं राहूस छाटलें तसें शशिमोहनने फैयाजला छाटून टाकलें!

ती कन्यका ग्रहणातून सुटलेल्या चंद्रकलेसारखी म्लान स्मितानें त्या वीर युवकाचे आभार मानती झाली.

"मला काय त्याचे" ह्या षंढ-तत्रातील मूलमंत्र अेका हिंदूनें पाया-खालीं तुडविला. हें पहिलें महान् आश्चर्य पाहून आजूबाजूच्या मुसलमानास भयंकर वचक बसला. मुसलमानी गुंडगिरी शेंपूट घालून घरादारात लपू लागली, परंतु ह्या घटनेंतील दुसरें महान् आश्चर्य तें पुढेंच होतें. कारण शशिमोहनला पोलिसानीं धरलें तेव्हा तो फाशी जाणार हें बहुतेक गृहीतच होतें. नागरिकाच्या जीवितांचें आणि धर्मांचें जें संरक्षण आपण करू शकत नाहीं तें अितरानें केलेलें पोलिसास आणि सरकारास सहसा खपत नसतें. त्यायोगें त्याची अकर्मण्यता अधिकच अुघडी पडते. त्यातही अेका हिंदूने शस्त्र अुपसून दुसऱ्या हिंदूचे रक्षणार्थ धावून यावें ही वृत्ती तर त्यास बहुधा अगदींच वावडी असते. कारण अेकदा का ही वीर वृत्ती हिंदूच्या अंगीं बाणली तर मग ह्या हिंदुस्थानात जे जेथें आहेत ते तेथेंच कसे राहू शक-तील ? म्हणून आजपर्यंतच्या परकीय सत्तेच्या धोरणाप्रमाणें त्या हिंदुयुवकास भयंकर शिक्षा होणार हें अुघड होतें. त्याप्रमाणें पहिल्या न्यायालयात ती झालीहि. मृत्यूसारख्या कठोर शिक्षेलाहि न भिता शशिमोहननें सांगितलें कीं, "माझ्या हिंदु धर्माच्या बहिणीला राक्षसी बलात्काराचे हातून सोडविणें हें माझें, अेका हिंदूचें, कर्तव्यच होते. जेव्हा अितर कोणतेंही साधन वा साहाय्य हातात अुरलें नाहीं तेव्हा शस्त्र अुपसून त्या दुष्टास ठार कर-ण्याचा धार्मिक अधिकार तर मला होताच होता. पण नैर्बंधिक (कायदे-शीर) अधिकारहि मला होता!" शशिमोहनच्या ह्याच विधानाचे आधारावर हायकोर्टांत अपील झालें आणि केवढें आश्चर्य कीं, हिंदूस पाण्यांत पाहणाऱ्या आणि मुसलमानास चिथावणाऱ्या या दिवसातहि शशि-मोहनला हायकोर्टानें निर्दोषी म्हणून सोडून दिलें!

वसिष्ठ

अितकेंच नव्हे तर अेका अबलेवर अेक दुष्ट राक्षस क्रूर बलात्कार करीत असता, अितर पुरुष तिच्या साह्यार्थ धावून जाण्यास भीत असता आणि पोलिसाचें साह्य घेण्याची संधि उरली नसता शशिमोहनने ज्या साहसाने आणि चपळाअीने त्या अधम फैयाजअल्लीला ठार मारून त्या अबलेची सुटका केली, त्या साहसाचे आणि शौर्याचें नैर्बंधिक दृष्ट्याही हायकोर्टाने अुलट अभिनंदनच केले ! ! कारण भारतीय दंडविधानाच्या (अिंडियन पीनल कोडच्या) ९६ ते १०० पर्यंतच्या कल्मात हे स्पष्ट-पणे सांगितलें आहे कीं, निर्बंधाच्या (कायद्याच्या) दृष्टीनेंहि प्रत्येक नागरिकास आपल्या स्वतःच्या किंवा दुसऱ्या नागरिकाच्या नैर्बंधिक अधि-काराचें आणि देहाचे संरक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यात दिलेले अपवाद मात्र प्रत्येक नागरिकानें विचारपूर्वक टाळावे. नीतिदृष्टीनें तर ते कर्तव्यच आहे. शशिमोहनला त्या अबलेच्या देहावर होणाऱ्या दुष्ट आणि अधम बलात्कारापासून तिची सुटका करण्याचाहि अधिकार होता आणि त्या नैर्बंधिक (कायदेशीर) आणि धार्मिक अधिकाराचा अुपयोग करू जाताच फैयाजअल्लीशीं जुंपलेल्या झुंजींत त्याचा स्वतःचा प्राणहि संकटात पडल्यानें स्वसंरक्षणाचा दुसरा अधिकारहि निर्बंध—दृष्ट्या प्राप्त झाला होता. निर्बंधाच्या कक्षेंत अुभें राहून त्यानें फैयाजशीं झुंज घेतली, आणि अपरिहार्य आवश्यकता म्हणून हायकोर्टानें त्यास सन्मानसहित सोडून दिलें.

वास्तविक पाहता शशिमोहननें निर्बंधाच्या घटपटादि खटपटीचा विचार तेथें मुळींच केला नव्हता. निर्बंधाची आज्ञा किंवा सवलत म्हणून नव्हे तर निसर्गप्रवृत्ति म्हणून त्यानें त्या दुष्टास छाटून टाकिलें. अेका अनाथ हिंदु कन्यकेस गाअीसारखी फरफरा ओढीत आणि हाणीत तिच्यावर अेक अहिंदु बलात्कार करीत आहे हें पाहाताच त्याचें हिंदु रक्त अुसळलें आणि प्रवृत्तीसरशीं तो वीर तिच्या साह्यार्थ धावून गेला. ही त्याची 'अतः-

करण-प्रवृत्ती 'च त्याला ' प्रमाण ' होती. तो फाशी गेला असता तरी त्याने केले ते चांगलेच केले असें तो म्हणाला असता. ते नैतिक कर्तव्यच होते. हायकोर्टानें अशा सत्प्रवृत्तीचें समर्थन करून नैतिक कर्तव्यास नैर्बंधिक अधिकाराचाहि दुजोरा दिला, याविषयीं कलकत्ता हायकोर्टाचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. अेका युवकाचे प्राण वाचवून हायकोर्टानें आमच्या हिंदुजातीवर खरोखर अुपकार केले आहेत. हे वीर युवक शशि-मोहन, प्रत्येक हिंदु तुला आशीर्वाद देत आहे की, देव तुला दीर्घायुषी करो ! तुझ्यासारखे वीर-युवक ह्या आमच्या हतभाग्य हिंदू जातीत एका मागून अेक अुपजोत ! तुझ्या आयुष्यातील प्रौढ कालाचा माध्याह्न आणि अस्त या तारुण्यातील उदयासारखाच तेज आणि पराक्रम यानी समन्वित असो ! नागरिकाची नैर्बंधिक (कायदेशीर) कर्तव्ये बजावण्याचें धैर्य आणि साहस आणि अुदारता प्रत्येक हिंदु तरुणाचे हृदयात अुसळू लागो ! ! असे त्रस्त हिंदूच्या हाकेसरशी धावून जाणारे वीर हिंदु आपल्या समाजात निपजू लागोत आणि त्या जुन्या " मला काय त्याचे "चें मढे जाळून राख केले जावो ! हिंदुसभा असेल तिथें तिथे शशिमोहनाचे सार्व-जनिक अभिनंदन केले जावे. विशेषतः स्त्रीसमाजानें शशिमोहनवर अभि-नंदनाच्या ताराचा आणि प्रेमळ आशीर्वादाचा नुसता पाअूस पाडला पाहिजे. कारण हिंदु अबलांच्या पावित्र्याच्या पदरास हात घालण्यास चटकलेल्या मुसलमानी गुंडपणाचे शिरावर ह्या शशिमोहनने पहिला मारक घाव घातला. आता पुन्हा तो गुंडपणा पूर्वीअितक्या पिसाळ पिशाच्चपणाने थैमान घालण्यास असा सहजसहज सहसा धजणार नाहीं.

---

८. आंध्रप्रांतीय भारतवीर श्रीराम राजू

(श्रद्धानन्द : २८-१२-१९२९)

दुर्दैवी कालात काहीं सद्गुण निंदिले जातात. स्वातंत्र्यकालातील गुणाना पारतंत्र्यकालात अपराधाचें स्वरूप येतें. तेव्हा परिस्थितीच्या शासनकक्षेत फिरत राहाणाऱ्या आम्हा कूपमंडूकाना या स्वातंत्र्य-वीरांचीं कृत्यें विपर्यस्त स्वरूपात दिसावीं हे स्वाभाविकच नव्हे तर अपरिहार्य आहे. असें असलें तरीहि कधीं कधीं परिस्थितीच्या नैर्बंधिक (कायद्याच्या) दडपणाखालीं चेपलें जाणारें मन त्या दाबाखालून निसटतें व निरपेक्ष वस्तुमूल्य दाखवणाऱ्या गुणज्ञतेच्या पवित्र वातावरणात काहीं काल का होईना, संचार करू लागतें. मनाला शिक्षा कोण करणार व कशी करणार? ज्याचें मन असतें त्याला सुद्धा तें आवरता येत नाही. त्याला झुकांडी देऊन वा बलात्काराने खाली दडपून टाकून मन स्वतः मोकळे होते आणि त्याला दडपू पाहाणाऱ्या दुर्बल प्रयत्नास जणू वाकुल्या दाखवीतच उंच उंच पवित्र वातावरणात उडून जातें.

आमचेंहि असेंच झालें. श्रीराम राजूचे चरित्र कोठेसें वाचावयास मिळालें आणि मनानें भरारी मारण्याला आपल्या कल्पनेचे पंख विस्फारले.

त्याला आम्ही म्हणालो, "अरे! श्रीरामराजू बडखोर साम्प्रतच्या राजसत्तेने बनवलेल्या निर्बंधाप्रमाणे तो अपराधी व या अहिंसायुगाच्या प्रवर्तनकाली त्याला अत्याचारी म्हणतात अर्वाचीन महात्मे त्याला वीर-वृत्त पण दिशाभूल झालेला वेडापीर समजतात आणि राजसत्तेचे न्याया-धीश कोणी त्याच्यासारख्याला धरून दिले वा धरून आणलें तर प्राण-दंडनीय ठरवतात. अशा या अपराधी, अत्याचारी, वेडापीर व दंडनीय श्रीरामराजूला तू डोक्यावर काय घेऊं पाहातोस?"

तो अपराधी नाहीं

पण! क्षणापुरतीच का होईना, त्या स्वतंत्र वातावरणातलि कसलीशी अुडवती व चढवती झुळूक लागून अुंच भराऱ्या मारण्यास अुद्युक्त झालेलें मन आम्हाला वेडावीत म्हणू लागले—"अरे वेड्या! श्रीराम-राजू जितका व जसा बडखोर तितकाच व तसाच अिंग्लंडच्या हातातून अमेरिका हिसकावून घेणारा जॉर्ज वाशिंग्टन—अथवा अिंग्लिशांच्या हातून आयर्लंड स्वतंत्र करूं पाहणारा डी व्हॅलेरा—प्रत्यक्ष अिंग्लंडच्या राजाच्या मानगुटीस बसून त्याला फासावर पाहू निघालेला क्रॉमवेल हेही बडखोरच! मग त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गातोस—त्याना स्वातंत्र्यवीर म्हणतोस आणि श्रीरामराजूमध्येच तुला बडखोरी दिसते? पारतंत्र्यसुलभ दासवृत्तीच्या नैर्बंधिक भयासाठीं का तू त्याला बडखोर ठरवणार? तू वाटल्यास त्याच्या श्रेष्ठतेकडे डोळे अुघडून पाहू नकोस. असाच भ्याड राहा. पण तुझ्या भ्याडपणाला झाकून त्याला बडखोर का म्हणतोस? तो बडखोरहि नाहीं व जागतिक गुणग्रहाकत्वाच्या निकषाने तो अपराधीहि ठरू शकत नाहीं.

आता तू त्याला अत्याचारी म्हणतोस? पण यात तूं स्वतः अत्याचारी ठरतोस. रावण, कंस, कौरव, मोगल—मुसलमान आदिक दुसऱ्याला लुबाडणारे—लुटणारे हे जेव्हा दुसऱ्याचा जीव घेतात वा जीव द्यावयास

अुद्युक्त होतात तेव्हा त्यास अत्याचारी म्हणतात, ते अत्याचारी असतात. पण त्या अत्याचाऱ्यांना—त्या हिंसक व परस्वापहारी अपराध्यांना लोककल्याणासाठी अपरिहार्य व आवश्यक म्हणून प्राणदंड देणाऱ्या श्रीराम—श्रीकृष्ण—श्रीशिवरायादि लोककल्याणेच्छाप्रेरित लहानमोठ्या लोककल्याणकर्त्यांना अत्याचारी ठरवणे म्हणजे शब्दाचा अर्थ न कळणारा मूर्ख मी आहें असे म्हणवून घेणें आहे हे तुझे अहिंसापुराण व अत्याचार-शास्त्र तुझ्या त्या सडक्या मौर्ख्यांतच कोंडून ठेव आणि सत्ताबली न्यायाधीश, साधले तर अशांना प्राणदंड देतात, म्हणून ते अन्यायी व अपराधी म्हणावयाचे तर मग यशस्वी जॉर्ज वॉशिंग्टन वा डी व्हॅलेराहि अपयशी झाले असते तर अपराधी ठरवले गेले असते, म्हणून त्यांना तू आता मानायला नको होते. पण तू त्यांना तसे म्हणू शकत नाहींस. तेव्हा श्रीरामराजूंनाहि जास्त यश मिळाले नाहीं वा यश मिळत नाही म्हणूनच केवळ अपराधी ठरविणारा तू न्यायप्रिय सत्यभक्त नव्हेस—केवळ अेक नेभळा, भित्रा, पौरुषहीन पण धूर्त व भोंदू आहेस!"

असे म्हणत ते माझे मन मला लाथाडीत व हिणवीत अुच अुडून गेले. त्याच्या निरीक्षणकृत्यातील विचारपरंपरेने वर्णित श्रीरामराजूंचें वर्णनात्मक चरित्र आम्ही वाचकांपुढे मांडीत आहोंत अर्थात् त्यांनीं केलेली कृति अितरांनीं करावी कीं करू नये हा मुद्दा अगदी निराळा आहे. येथे केवळ त्यांचे चरित्रच कथन केलें आहे. तेव्हा त्याच्या अनुकरणाचा प्रश्नच अुद्भवत नाहीं.

परंपरा तीच

भारतमातेचा कुसवा धन्य करणारे वीरात्मे या भारतवर्षात सर्व प्रांतामधून जन्म घेअून या अनंत संकटमग्न दुर्दैवी हिंदु जातीची सेवा करीत असतात ही अेवढी अेकच गोष्ट भावी कल्याणाच्या निश्चित आशेचा स्फूर्तिदायी

रण निराशेनें निस्तेज झालेल्या आशानेत्रात आह्लादाचें तेज चमकवू
गतें. आज आम्ही अशाच अेका वीर पुरुषाचें--जो अद्याप आपणा-
धून स्मृतिसृष्टीच्या पडद्याआड मृत्यूच्या द्वारानें निघून जाअू शकला
हीं--अशा धन्य वीराचें चरित्र देणार आहोंत. श्रीरामानें जगातील
वणी अत्याचार रक्ताच्या महानदात बुडवून टाकला, पांडवानीं कौरवी
त्याचाराला मृत्यूच्या जबड्यात भिरकावून दिलें, महाराणा प्रतापानें
मस्लामी सत्तेला, निराशेच्या भयंकर वणव्यात स्वतः होरपळत जात अस-
ाहि, अेक नाही दोन नाहीं सतत एकवीस वर्षे सिंहपराक्रमानें धडका दिल्या
मरणातहि नत मस्तक न होता हिंदु जातीच्या गौरवाचा यशोध्वज
ातंत्र्याकाक्षेच्या अुंच आकाशात फडकत ठेवला, श्रीशिवरायानें त्या
ोगली रावणसत्तेला धूळ चारीत हिंदुपदपादशाहीचा विजयप्रासाद बांधला,
ीसंभाजीरायानें त्या हिंदुवंशाचे स्वातंत्र्यप्रासादाला आपल्या तेजस्वी व
ौरुषसंपन्न अुष्ण रक्तानें अुदित सूर्याचें लाल भडक चमकतें तेज चढविलें,
त्रपति राजारामानें अेकवीस वर्षांचा प्राण देताघेता युद्धयज्ञ करून तो स्वराज्य-
ासाद अभंग ठरविला, बाजीराव, नानासाहेब, भाअूसाहेब, माधवराव,
ाना फडणीस, शिंदे वीर--थोडक्यात अखिल महाराष्ट्रवीरांनीं त्या स्वरा-
याला साम्राज्यपदाचें वैभव मिळवून दिलें. दुर्दैवाचे फेऱ्यात सापडून
ा कोसळत्या मंदिराला पुन्हा अुभवू पाहाणाऱ्या या भारतभूमीला पुन्हा
तापगिरीच्या भाग्यासनावर प्रस्थापित करण्याकरिता झगडत-लढत-मरत
हणाऱ्या नानासाहेब, लक्ष्मीबाई, तात्या टोपे, वासुदेव बळवंत आदिक
ीरपुंगवानीं या जाळत्या मारत्या कार्यक्षेत्रात आत्माहुती दिल्या. आध्र-
ातीय भारत वीर श्रीराम राजू हा पुरुषहि त्याच अखंड भारतीय वीर-
रंपरेंतील अेक निःसीम भक्तमणि आहे.

बाळपण व शिक्षण

या भारतभक्ताचा जन्म आंध्र प्रांतात अेका सन्मान्य क्षत्रिय घराण्यात मगल्लू गावीं झाला हे गाव पश्चिम गोदावरी जिल्ह्यात आहे. ज्या वीर पुरुषानीं जगातील मोठमोठ्या क्रात्या घडवून आणल्या, मोठमोठालीं साम्राज्यें स्थापिलीं, आपापले देशाना पारतंत्र्याच्या घोर नरकातून अुद्धरून स्वातंत्र्याच्या स्वर्गाचे धनी बनविले अशा पुष्कळ महापराक्रमी थोर पुरुषाप्रमाणेच हा आपला श्रीराम आधुनिक दृष्टीच्या विद्येने अलंकृत (?) झालेला नाही निरनिराळ्या स्थलीं शिक्षण घेत घेत हा पुरुष कसा तरी पाचवीपर्यंत 'विद्या' शिकला. याला गायनकला चांगलीच अवगत असून तो होतकरू कवीत गणला जात होता. त्या सुमारासच याच्या अंगातील भावी महनीय गुणाचे बीज स्पष्ट दृग्गोचर होअू लागले. या गुणचिह्नावरून तो अेक वेडाच्या थराला पोचला जाणारा मूर्ख आहे, अशी 'परीक्षा, महात्मा गांधीजींनी केली होती स्वतः गांधीच म्हणतात (I mistook them (the signs of greatness) for signs of stupidity bordering on madness)— माझी त्या वेळी केलेली परीक्षा चुकली थोर व असामान्य कर्तृत्वशाली पुरुषाच्या लहानपणीच त्याच्या महत्तेचें प्रतिबिंब त्याच्या प्रत्येक कृतींत व हालचालींत दृग्गोचर होतें. गांधीजींनीं त्याला त्याच्या हातून होणाऱ्या शिक्षणाच्या हयगयीकरिता पुष्कळ टोमणे मारले —निंदिले. श्रीरामनीं खरी विद्या काय आहे व हें शिक्षण कसें निरुपयुक्त आहे, यावर गांधीपुढें बरेंच विवरण केले पण ही शिक्षण-गीता गांधीजींना कळली नाही. "मी सन्यास घेअीन व मी माझ्या देशबांधवाचा अुद्धार करीन." ही त्याची तपवाणी गांधींच्या कानी त्यांनीं पुष्कळ वेळा घातली. गांधीजी म्हणतात, "हाय हाय! त्या शब्दाची महत्ता त्यावेळीं मला किंचितहि कळली नाहीं!"

पुढें आपला श्रीराम हा नरसापूरला शिकण्यास गेला. तेथे गेल्यावर त्याला ज्योतिष-शास्त्र, हस्तसामुद्रिक व अश्वारोहण कला (घोड्यावर बसणें) या गोष्टींची गोडी लागली. त्याचें लहानपणाविषयीं याहून विशेष कांहीं माहिती नाहीं

संन्यासी श्रीराम

१९१७ चे आरंभी त्यानीं सन्यास घेतला व १९१८ मध्यें आंध्र-प्रांतातील 'अेजन्सी' भागात साबारी डोंगरात तपस्या करू लागले. तपस्येनंतर डोंगरात त्यानीं आपलें निवासस्थान केले. तेथील लोकात त्याचेविषयीं फार पूज्यबुद्धि वाटली आणि स्वाभाविकतः व स्वयंस्फूर्तीनें ते लोक श्रीरामच्या भजनीं लागले दूध व फळे हा व अितकाच त्याचा आहार होता. १९२० चे सुमारास ते नाशिकच्या यात्रेला पायीं गेले.

राजूंचें लोकांवरील वजन

अनत्याचारी असहयोगाचे चळवळीविषयीं त्याना आदर नव्हता, अितकेंच नव्हे तर, त्याच्या अुक्तीवरून व कृतीवरून ते सन्यासी झाले होते, तरी क्षात्रवृत्तीचाच अवलंब त्यानीं केला. गांधीच्या अेकंदर कार्यक्रमात ब्रिटिश न्यायालयें व दारूचे गुत्ते याचेवरील बहिष्कार मात्र त्याना आवडले. गोदावरी व विजगापट्टण जिल्ह्यात त्यानीं दारूबंदीची चळवळ हातीं घेतली. त्या पुरुषाचें निर्मल व अुदात्त चारित्र्य व त्याची आकर्षक भक्तिशीलता याच्या योगें तत्रस्थ जनतेचीं मनें त्याचेकडे पूर्णपणें आकर्षित झालीं होतीं. त्याचा शब्द तेथील लोकाना वेदवाक्य होऊन बसला. श्रीरामच्या, हृदयाना हालविणाऱ्या वक्तृत्वानें त्या लोकांचीं सरळ मनें आज्ञापालनाला आतुर करून सोडलीं. "अिंग्लिश न्यायालयात पाय ठेवू नका व दारूला शिवूंहि नका" हा त्याचा आदेश होता. त्यांची ही हाक सर्व प्रदेशात वणव्यासारखी पसरली. त्या अेजन्सी प्रदेशात अेकहि

मनुष्य असा राहिला नाहीं कीं, ज्यानें श्रीरामचा शब्द झेलला नाहीं. त्या प्रदेशातील जनतेंत अेक्या नवीन विचारक्रांतीच्या युगाचा प्रादुर्भाव झाला. लोकानीं दारू टाकली——न्यायालये ओस पडली. गावोगाव पंचायती स्थापन झाल्या व त्यात सर्वांचे न्यायानिवाडे होअू लागले. त्याला स्वदेशी फार आवडे व त्याकरिता आपल्या सैनिकाना खादीचे स्वदेशी गणवेश त्यानें दिले होते. श्रीरामच्या सैनिकाना गणवेशाकारिता खाकी खादी पुरविण्याबद्दल श्री रल्लापल्ली कसन्ना नावाच्या अेका गृहस्थावर दावा दाखल करण्यात आला होता. स्वतःच्या देवालयातच निवासस्थान बनवून श्रीराम आपलें तपानुष्ठान करी. त्स्यहीं त्याच्या दर्शनासाठी खूप गर्दी होअी. श्रीरामच्या स्फूर्तिदायी व अुद्दीपक अुपदेशानीं त्यांचीं मनें मंत्रमुग्ध होत. श्रीरामच्या अध्यात्मिक अुपदेशाला देशभक्तीचें अनुपान योजलेलें असे. त्याच्या अुपदेशामृताचें पान लोक मोठ्या आतुरतेने करीत. पंचवीस वर्षें वयाचा हा ज्वलत् देशभक्त सन्यासी आपल्या ओजस्वी वाणीने तेथील अशिक्षित समजल्या जाणाऱ्या कोया जातीच्या लोकावर काय परिणाम घडवून आणीत असावा बरे? आमचे ‘ सुशिक्षिता ’ चें ‘ सुशिक्षण ’ त्याना भावनाहीन, निःसत्त्व व म्हणून कर्मशून्य बनवीत असते. परंतु हे अशिक्षित परंतु पौरुषसंपन्न लोक भावनाबलाने युक्त असतात. केवळ त्यांच्या अंतःकरणाला जागविणाराच पाहिजे. ही मंडळी चेतणें कठिण असतें, पण अेकदा ते तापले, कर्मशक्तीच्या तेजाने यांच्यात अेकदा खळबळ अुडाली कीं मग याना हात लावणाराचा हात भाजून निघाल्यावाचून राहणार नाहीं. हिंदुस्थानवर केवळ पाशवी बलाच्या जोरावर राज्य करू पाहाणाऱ्या सत्ताधारी पक्षाला या गोष्टीनें अस्वस्थ केलें. लागलीच “हा पाहा क्रांतिकारी——भयंकर राज्यद्रोही व साम्राज्याचा शत्रू श्रीराम येथें प्रकट झाला आहे. तो नष्ट झालाच पाहिजे.” अशी घोषणा झाली आणि लागलीच जाने-

वारी १९२२ मध्यें 'राजू' फितूर फैलावीत आहे अशी बोंब अुठली आणि त्याच्या 'असहयोगी'पणाचा पुकारा झाला. पूर्व गोदावरी जिल्ह्याचा पोलिस सुपरिंटेंडट तेथें धावत गेला. त्याने काय पाहिले ? 'श्रीराम' आपल्या तपानुष्ठानात मग्न आहे. विजगापट्टण जिल्ह्यातील नृसिंहपट्टण येथें सहा आठवडे श्रीरामला दृष्टिबद्ध कारावासात (interned) ठेवले व नतर सोडून दिलें. तरीहि त्याचे मागचा पोलिसी ससेमिरा सुटला नाहीं. श्रीरामनें तेथील डेप्युटी कलेक्टर फझलुल्ला याला हा पोलिसी त्रास चुकविण्याचा अर्ज केला. पुढे दोघाची गाठ झाली असें म्हणतात. त्या डेप्युटी कलेक्टरनें मद्रास सरकारला श्रीरामला अेकतीस बिघे भूमीचा तुकडा देअून शेती करण्याकरिता पुष्कळ सुलभता करून देण्याकरिता लिहून पाठविलें व मद्रास सरकारने खरोखरी ती देणगी सम्मतहि केली आणि त्या देशभक्ताला अेक शेतकरी बनवण्याचा प्रयत्न झाला.

रीजन्सींतील असंतोष

पण ! सर्व हिंदुस्थान ब्रिटिश सत्तापक्षाचे हातून सोडवून स्वतत्र करण्याच्या महत्त्वाकाक्षेच्या प्रखर अग्निज्वालेनें भडकणारें होमकुड श्रीरामच्या देशभक्त अत.करणात पेटलेलें होतें. अर्थात् श्वानवृत्ति हीन मनुष्यप्राण्याना लागूलचालन करण्यास लावणारा ३० बिघे भूमीचा तुकडा या महदाकाक्षी वीरवृत्त पुरुषाला कसा वश करू शकणार ? त्यानें गीता वाचली होती. त्याला स्वधर्म कळला होता. त्या प्रदेशातील वस्तुस्थिति त्याला अनुकूल होती व तिचें त्याला फार साह्य झालें. त्यानें ती वस्तुस्थिति आपल्या भारतमातेच्या हितकार्यीं लावून घेण्यात कमी केलें नाहीं त्यानें गुडेम तालुका आपल्या कार्याचे क्षेत्र बनविलें त्या रीजन्सी-मध्यें अितर स्थलाप्रमाणे सरकारी कारभार नाहीं, तेथें 'जबरदस्ता' कारभार असतो. तेथें सताल परगण्यात तेंच नाव आहे. त्या परगण्यात डायरच

सत्ता चालवीत होते. त्या अरण्यातील सताळादि लोकाचे सर्व हक्क सरकारनें छिनावले होते. त्याना स्वयपाक करण्यास लाकडे सुद्धा वापरता येअीनात. पूर्वीप्रमाणें त्याच्या गाअींना चारा चारता येअीना. या व अितर अशाच अत्यत अन्याय्य गोष्टींमुळें त्या रीजन्सींत भयकर असतोष माजला होता.

लोकसंग्रह

श्रीरामाला क्रातीचे बीज पेरण्याला ही अुत्कृष्ट भूमी मिळाली. त्यानीं अुत्कृष्ट अनुयायी व समर्थ कार्यकर्ते मिळविले. लोकात स्वराज्याची तीव्रतर अिच्छेची जळती ज्योत पेटली. श्रीरामराजूनी त्याच्या सामान्य आकाक्षाना अेकदा महदाकाक्षेचे पेटतें स्वरूप दिले. श्रीरामराजूवर तेथील लोकाची अत्यत निष्ठा होती. आणि ते प्राणपणाने त्याच्या नेतृत्वाखाली स्वराज्यार्थ जीव देतघेते प्रयत्न करण्यास अेका पायावर सिद्ध होते.

स्वराज्यसंपादनाचा मार्ग

तो जेथें जेथे जाअी तेथे ब्रिटिश साम्राज्यसत्तेचे पोलीस आपल्या जीवाच्या भयानें शस्त्रास्त्रे, बदुका व दारूगोळा—तेथेंच सोडून पळून जात. अेका अनत्याचारी असहयोगीनें "तू स्वराज्य जे मिळवणार तें काय मार्गानी ?" असें विचारताच तो म्हणाला, "या साम्राज्यशाहीशीं युद्ध केल्यावाचून स्वराज्य कधीहि मिळणें शक्य नाहीं." त्याला त्या अनत्याचारी स्वराज्य-सपादकाने विचारलें, "हें शक्य आहे काय ?" "अर्थात् शक्य आहे! मजजवळ माणसाची वाण नाहीं. केवळ दारूगोळाच काय तो मिळणें कठीण भासतें."

चिमुकला कैसर

साम्राज्यशाहीनें 'गुडाममधला चिमुकला कैसर' अशा नामाभिधानानें त्याचा अुल्लेख करण्याचा अुपक्रम केला होता. वीस वर्षांचा

तरुण अफाट साम्राज्याच्या सत्तापक्षाला आव्हान देतो !! त्या तरुणाने 'अमुक स्थलीं अमुक वेळीं मी घाला घालणार !' म्हणून प्रसिद्ध करावे व तो घाला आला असता तेथील ब्रिटिश सिंहाच्या आयाळाचे केस होरपळले जावेत. कोया लोक हें त्याचें सैन्य, धनुष्यबाण हीं त्याचीं शस्त्रे, पर्वताच्या गुहा-दऱ्या हे त्याचे रणक्षेत्र, खेड्यापाड्यातील अेकनिष्ठ, स्वदेशप्रेमी व श्रद्धाळू लोकाची प्रेमाने दिलेली शिदोरी हाच त्याचा धान्यसग्रह, अशा प्रकारच्या सिद्धतेनें, आधुनिक शस्त्रास्त्रानीं सुसज्ज असलेल्या साम्राज्यसत्तेच्या विपक्षाशी श्रीराम झगडत होता. हा विषम झगडा होता. आणि तरीहि हा धाडसी वीर आपल्या दैवी साहसाच्या व निस्सीम प्रेमनिष्ठ असणाऱ्या अनुयायाच्या बळावर युद्धाचे डाव खेळत होता.

ब्रिटिश सिंहाशीं धडका

अत्यत कुशल सेनापति शत्रूला हानिकर व स्वपक्षाला अनुकूल असे युद्धक्षेत्र निवडील त्याचप्रमाणें या स्वराज्यसपादनोत्सुक श्रीरामाने केले. त्याने ब्रिटिश सिंहाला सहा धडका दिल्या व प्रत्येक धडकेंत ब्रिटिश सेना तुकडीला किंचाळावयास लावलें. तिला धूळ चारली. त्या प्रांतातील सेनाबल पुरेसे होअीना म्हणून मलबारहून सैनिक तुकड्या आणाव्या लागल्या. आणि आसामहूनहि निवडक सैन्य आणावे लागले. पेडवल्स गावाच्या चकमकींत अिंग्लिश सैनिकाचे दोन युरोपियन अधिकारी ठार झाले व अितर बरेच घायाळ झाले. शेवटच्या सातव्या व आठव्या चकमकीत श्रीरामावर अचानक घाले घालून त्याला मोठ्या शर्थीनें या आक्रमकाचे हातून लढत झगडत निसटून जावें लागलें आणि त्या अेका शूर, धाडसी, सैन्यचालनाकुशल राष्ट्रप्रेमी तरुण सन्यासी वीराला या विषम झगड्यातून निराशेच्या अधःकारात विलुप्त व्हावें लागले तरीहि त्याच्या या स्वदेशप्रेमी स्वार्थ-

त्यागाच्या दिव्य अुदाहरणानें कोणाचे मनात सादर कौतुकानें प्रेमाश्रु अुभे राहाणार नाहींत ! !

श्रीराम ! ! तुझ्या अंतःकरणाच्या कळकळीनें आपल्या मायभूमिच्या अुद्धारार्थ तू आपल्या सर्वस्वाची आहुति देत प्रयत्नाची पराकाष्ठा केलीस ! तुझी तू शर्थ केलीस ! अितकेच नव्हे, तर तू आपल्या दिव्य स्वार्थत्यागाच्या दीप्तिमान् अुदाहरणानें आम्हा दुबळ्याना हिणविलेंस ! श्रीराम ! तू देवाच्या मांडीवर कृतज्ञतेच्या कुरवाळण्यानें सुखी होण्यापूर्वी आम्हा हिंदु जनाचे हातानें ही मायभूमी स्वतंत्र झालेली पाहाण्याचें समाधान तुला लाभो ! ! स्वतंत्र हिंदुस्थानातील भावी अितिहासकारानीं तुला विसरू नये. म्हणून, हे देशवीर श्रीराम, तुझ्या पवित्र व स्फूर्तिदायक स्मृतीचा हा धागा, या लेखनानें घट्ट वळून ठेवीत आहोत ! तुझें नाव चिरस्मरणीय होवो !

---

१. देशवीर विष्णु गणेश पिंगळे

(शरद्धानंद : २८-१२-१९२९)

तळेगावच्या शाळेस शंभर वर्षे झालीं. मनुष्यास शंभर वर्षे झाली तर आपण १०० वर्षे भरलीं असें म्हणतों. कारण, मनुष्याचें सामान्य आयुष्य तरी आजवर शंभराच्यावर गेलेले नाही. परंतु संस्थाचें आयुष्य अनेक शतकाचें असू शकते म्हणूनच संस्थेला शंभर वर्षे झालीं म्हणजे ती गोष्ट आगामी निकट अंताची दु:खसूचक घटना होत नसून तिच्या भावी भर-भराटीची आनंददायी हर्मींहि होऊ शकते. आणि म्हणूनच आपण तो शतवार्षिक वाढदिवस अशा पूर्ण आनंदाने साजरा करतों. तळेगावच्या अेका लहान शाळेच्या शतवार्षिक वाढदिवसाच्या लहानशा घटनेंत आम्हा सर्वांनाच कौतुक वाटण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे ती शाळा १८२९ सनात अुघडली गेली. अिंग्रज—सत्तेंतील अगदी पहिल्या अशा ज्या फार थोड्या नवीन परधर्माच्या संस्था अजून तग धरुन आहेत, त्यात ही शाळाहि गणली पाहिजे. परंतु नुसतें दीर्घ काळ जगणें ही जरी कौतुकाची गोष्ट असली, तरी ती तेवढ्यामुळें आदरणीय महत्त्वाची होअू शकत नाहीं. काकोऽपि जीवति चिराय बलि च भुङ्क्ते ! पण तळेगावच्या शाळेविषयीं अशा आदरणीय महत्त्वाचीहि एक घटना संलग्न झालेली आहे आणि म्हणून तिची स्मृति आपण सर्वांनीं बाळगली पाहिजे. ती घटना म्हणजे ही होय कीं,

देशवीर विष्णु गणेश पिंगळे

ह्या शाळेंतील विद्यार्थी होते. पुढे ते विशीचे आतच महाराष्ट्रातील १९०९-

अद्याहत्तर

देशवीर विष्णु गणेश पिंगळे

१०च्या 'अभिनव भारतीय' क्रांतिकारक वातावरणात वाढले, नंतर अमेरिकेंत गेले. तेथे अभिनव भारताच्या अिंग्लंडमधील शाखेच्या श्री. हरदयाळप्रभृति कार्यकर्त्यांनी काढलेल्या "गदर" (बंड) संस्थेंत शिरले ती वेळ सन १९१४ च्या जर्मन महायुद्धाची होती या संधीचा लाभ घेअून आपल्या स्वदेशास स्वतंत्र करण्यासाठीं, यशस्वी नसला तरी, अेक निकराचा प्रयत्न म्हणून तरी, अेक अुदाहरणीय प्रयोग म्हणून तरी, अमेरिकेतील क्रांतिकारकांच्या झुंडी जेव्हा 'चलो भाअी! मातृभूमीको मुक्त करनेको चलो!' अशा अक्षरशः गर्जना करीत आगबोटींत चढल्या, तेव्हा त्या क्रांतिकारकांत देशवीर पिंगळे हेहि स्वदेशास परत फिरले जर्मन रणतरीतून शस्त्रास्त्रें हिंदुस्थानास पाठवून मागोमाग हे शेकडो क्रांतिकारक चीन, सिंगापूर, ब्रह्मदेश अित्यादि भागांतील ब्रिटिश सैन्यातील भारतीय सैनिकास भडकावीत आणि बंडास चेतवीत हिंदुस्थानात घुसले. 'कोमागाटा मारु' प्रकरणाप्रमाणे अिंग्रज सैन्याशीं बंदरावर अुतरताच अुघड लढाअी देअून मारत मरत आपली वाट काढून देशभर पसरले काहीं गुप्तपणे बिनधोक प्रवेशू शकले. त्यात देशवीर पिंगळे होते. पंजाबमध्यें सैन्य बिथरवून अनेक अिंग्रज अधिकाऱ्यांना मारून, शस्त्रास्त्रार्थ लागणाऱ्या निधीसाठीं दरवडे घालून, या लोकांनी मोठा धुमाकूळ मांडला. देशवीर पिंगळेही, त्यांचे बहुतेक साथीदार पंजाबातील शूर शिखांतच असल्यानें, तिकडेच त्या धुमाकुळींत गुंगून गेले शेवटी लाहोरचा खटला झाला त्यात जे क्रांतिकारक सांपडले, त्या सर्वांत वयानें अगदीं तरुण आणि साहसानें अगदीं अग्रगण्य असे दोन क्रांतिकारक होते. अेक करतारसिंग व दुसरे पिंगळे! त्यांनीं आपण क्रांतिकारक असल्याचें स्वतःच सांगितलें. ब्रिटिशांची सत्ता आणि न्यायालयें यांचा अधिकारच त्यांनीं नाकारला आणि अक्षरशः हसत हसत ते फांसावर चढले. त्यांस पाहिलेले सरकारी अधिकारीही त्यांचें नांव निघताच माना

डोलावतात. असा हा देशवीर—"A real hero" पचविशीच्या आत स्वदेशस्वातंत्र्यार्थ फासावर चढला ! केवढी दुर्दैवाची गोष्ट कीं, त्याचें नावहि सुशिक्षित महाराष्ट्रात हजारात अेकास माहीत नाहीं !

*　　*　　*

अितिहाससंशोधक राजवाडे यांचें तर काय, पण अगदीं अलीकडील प्रो. गोतबार-आगट्-ार्येनच्या मडळींचीं नावें ज्याच्या त्याच्या तोंडीं आहेत—त्याच्या कार्याचा गौरव होत आहे, तो ठीकच आहे, पण अितिहासाचें केवळ संशोधन करणाऱ्याचा होतो तितका तरी गौरव अितिहास घडवून आणणाऱ्या या देशवीराचा व्हावयास नको काय ? शिवाजीच्या काळचा अितिहास अशाच अनेक धाडसी तरुणानीं आणि देशवीरानी उत्पन्न केला नाहीं काय ? आणि आजच्या अितिहासाची घडण करण्यात, या देशासाठीं होणाऱ्या प्राणदानाच्या, मारीत मारीत मरणाऱ्या देशवीरत्वाच्या भट्टींतील अग्नीहि अेक जाज्वल्य घटक होत आहे हे कोणास नाकारता येणार आहे काय ? तसें असतें तर रौलट रिपोर्ट प्रसिद्ध करण्याची आवश्यकता स्वतः अिंग्रजानाहि भासती ना !

*　　*　　*

आमच्या शिवकालीन किंवा परकीय आयर्लंड, अिटली प्रभृति देशाच्या अितिहासात ज्या ज्या वीरानीं या पिंगळे, कान्हेरे, करतारसिंग, कन्हय्या अित्यादिकासारखीच किंवा काहीं उदाहरणात त्याच्याहून कमी स्वार्थ-निरपेक्ष देशभक्ती दाखविली आणि स्वातंत्र्यार्थ झुंज घेतली, त्याचे वर्णनानें आणि स्तुतीनें महाराष्ट्रवाङ्मय नुसतें फुरफुरून जातें. पण तशींच साहसी कृत्यें करणाऱ्या प्रस्तुतच्या कोण्या देशवीराचें किंवा सशस्त्र क्रातिकार-कार्चे नाव काढताच तें भीतीनें थरथरू लागतें. त्याना अहो जाहो सुद्धा कोणी करीत नाहीं—अरे जारे म्हणतात !

पण आमच्या शिवकालीन आणि राजारामीय पिढींत जे काही देश-भक्त जहागिरी-अिनामावरच झुजत, त्याच्याहि देशभक्तीचा यथार्थ गौरव आणि योग्य कौतुक करणारे हे आजकालचे शिष्ट लेखक नि वाचिवीर याच्या पिढींत जे देशस्वातत्र्यार्थ झुजताना फाशीवाचून दुसऱ्या अितर कोणत्याहि जहागिरीचें आमिष डोळ्यापुढे धरीत नाहींत, अशा जाज्वल्य देशवीरानाहि देशवीर म्हणावयास सिद्ध नसतात त्याच्यावर अेक अक्षरहि लिहिणें म्हणजे असभ्यपणा होय असें समजतात. हा प्रभाव त्या 'अिंडियन पिनल कोडा'चा आहे. जर कदाचित त्या कोडात शिवाजी, बाजी, तानाजी याचीही स्मृति करणें दड्य अपराध गणला जाता तर या शिव कालीन कालालाही याच्या भीतीच्या काळोखातच तोंड खुपसून राहावे लागतें आणि मराठी वाङ्मयात तशीच अेकेरी उल्लेखिलेली सभावना होती कीं, जशी त्या 'वासुदेव बळवताची' होते ! त्या जाज्वल्य देश-वीराचे अेक चरित्र अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे तेंच पाहा ! त्यात न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे याना कित्येक ठिकाणीं सन्मानार्थ बहुवचनी अुल्लेखिलें आहे. सार्वजनिक काकानाहि अहो जाहो म्हटलें आहे, ते ठीकच आहे. तेहि देशभक्त आणि त्यागी देशसेवकच होते, पण वासुदेव बळवंत फडक्याना त्या प्रत्यक्ष त्याच्या चरित्रातच येथून तेथून एकेरी अरे–तुरेनें सबोधले आहे. देशभक्तीत आणि देशसेवेसाठीं केलेल्या त्यागात फडके त्याच्या पिढींत अितके कमी प्रतीचे ठरले ! कारण त्यानीं देशहितार्थ आयु-ष्याच्या सध्याकाळची शिळोप्याची वेळ किंवा पगाराचा एक लक्षाश तेव-ढाच त्याग करण्याचा सभ्यपणा न करता आयुष्यचें आयुष्य आणि सर्वस्वचें सर्वस्व त्या देशासाठीं त्यागाचे वेदीवर बळी देण्याचा हलकटपणा केला, म्हणून त्याना दीडदमडीच्या खर्डेघाशानीं देखील अरे तुरे करावी !! वासुदेव बळवताचें साहस अयशस्वी ठरलें, पण यश हेंच जर अहो-जाहोचे

एकमात्र गमक असेल, तर मात्र माझें, काहींच म्हणणें नाहीं. शिवाजी महाराजाचें तरी काय ? अफझुलखानाच्या कैचींत ते सापडले तिथे म्हणजे केवळ योगायोग होता जर का त्या पकडींत महाराजच मरते तर ह्याच जात्यावरच्या ओव्या गाणाऱ्या बाया त्या सगळ्या डावाला मूर्खपणाची पराकाष्ठा म्हणत्या—म्हणत्या, आपण होऊन गाढवासारखा अफझुल्ल्याच्या तबूत गेला ! तीच गोष्ट शाहिस्त्याच्या बगल्यातील, दिल्लीच्या पेटाऱ्यातील ! जर घडलें त्याच्या उलट घडतें तर हेच "शिवकालीन" आजचे भाट, केवळ यशाचे भोपे, शिवाजीतानाजींनाही 'माथेफिरू' अत्याचारी, पोरकट अदूरदृष्टि,' म्हणून भुकत सुटते ! कारण याना पराक्रमाची पारख नाही. ते केवळ यशाचे मिंधे आहेत त्याना हेतूची आणि त्यागाची आणि उत्कटतेची ओळख नाही. हे केवळ घुगऱ्या तिकडे उदो उदो करणारे आहेत, नाहीं तर शिवकालीन किंवा परदेशातील प्रस्तुत काळच्या वैयक्तिक पराक्रमाच्या तोडीस तोड देणारे पराक्रम आणि तेहि क्वचित् अेक रती अधिकच निर्मळ अशा जाज्वल्य देशभक्तीनें अुत्स्फूर्त झालेले—याच्या ह्या स्वतःच्या पिढींत याच्या डोळ्यासमोर घडत असताना याना असलें देशवीरत्व, तें अजून अयशस्वी होत आहे, म्हणूनच काय तें हायकोर्ट–जज्जपणापेक्षा किंवा वकीलपणापेक्षा सापेक्षतः असभ्य आणि हलकटपणाचें वाटतें ना ! दुर्लक्षाहे भासते ना ! आणि तेच गुण केवळ यशस्वी झाले म्हणून "शिवकालीन पिढींत" वर्णनीय ठरले ना ! यश ! ह्याना अेक सैनिक पडला न पडला कीं लढाअी जिंकली गेली पाहिजे, बीज टाकले न टाकले कीं त्याचा आंबा होअून, पाडास लागून—अगदी आढीत पिकून याच्या ओंठाशीं आला पाहिजे. नाहींतर तें बीज व्यर्थ गेलें, तो सैनिक माथेफिरूसारखा व्यर्थ मेला !

स्वकालीन देशवीरांविषयींच्या ह्या मिथ्या अनास्थेचे ढोंगी समर्थन

कुणी असेंहि करतील कीं, आजच्या क्रांतिकारकाचीं चरितें लिहिलीं, त्याच्या हेतूची का होईना, पण स्तुति केली तर अितर तरुण मंडळींहि त्याचा क्रांतिकारक मार्ग चोखाळू लागतील आणि त्यायोगें स्वदेशावर मोठें अरिष्ट कोसळेल. हिंदुस्थानच्या सध्याच्या विमल कीर्तीला मोठा कलंक लागेल! पण मग हीच गोष्ट "शिवकालीन" क्रांतिकारकाच्या नावावर रचलेल्या ज्या पैशापासरी कादंबऱ्या, नाटकें, पोवाडे, आणि खडगाणीं, 'सूड! सूड!! सूड!!!' म्हणून अुसन्या नाटकी अवसानाने भरमसाट बरळत सुटत आहेत त्याना नाहीं का लागू पडत? अफजूलखानाचा पोवाडा अैकताच जसे कोणी लगेच लोहाराचे दुकानात वाघनखें घडवून घेण्यासाठीं घुसतोच असे नाहीं, किंवा दिसेल त्या मुसलमानास शाहिस्तेखान म्हणून त्याचीं बोटे कापण्यास धावतोच असे नाहीं, तसेंच पिंगळे, चाफेकर, अमरसिंह, कान्हेरे अित्यादींचीं चरितें वाचताना प्रत्येक जण बॉंब करू धावलाच पाहिजे असेंहि नाहीं. निदान हिंदुस्थानातील या 'नैष्कर्म्य सिद्धिं परमां', प्राप्त झालेल्या जीवन्मृत पिढींत तशा अघोर संभव काल्पिणें म्हणजे त्या पिढीचा घोर अपमान करणें होय. न्यायमूर्ति रानडे किंवा नामदार गोखले यांचे मार्ग ज्यास पसंत नाहींत, तेहि त्यास महान् देशभक्त समजून 'अहो जाहो' लिहितातच कीं नाहीं? मग त्या बिचाऱ्या वासुदेव बळवंत, कान्हेरे, चाफेकरानाच, त्याच्या मार्गाविषयीं मतभेद असला तरीहि, अगदीं अरे तुरे म्हणून धिक्कारलेंच पाहिजे असे का? निदान "शिवकालीन" लेखकाच्या विणीस तरी तें शोभत नाहीं. नाहींतर दिल्ली-विजापूर सरकारच्या दरबारातील अेखाद्या धर्मनिष्ठ न्यायाधिशाची किंवा त्याच्या दरबारातील अेखाद्या जयसिंगासारख्या नामदाराची स्तुति तरी त्यानीं बाजी, येसाजी, तानाजीसारख्या बडखोर पोराहून अधिक करीत जावें. म्हणजे त्याचें वर्तन निदान विसंगत तरी दिसणार नाहीं.

विसगतपणाचा दड देशवीर पिंगळ्याच्या स्मृतीला जरी आजवर भोगावा लागला, तरी तळेगावच्या शाळेच्या शतवार्षिक समारंभाच्या निमित्तानें त्याची आठवण महाराष्ट्रास किंचित् का होअीना पण झाली हेच त्या अुत्सवाचें आम्ही अेक मोठे महत्त्व समजतो. अुदाहरणार्थ या अुत्सवाप्रीत्यर्थ 'केसरी'त काही दिवसापूर्वी अेक सुरेख लेख आला होता. त्यात त्या शाळेतील सस्मरणीय विद्यार्थ्यांत पिंगळ्याचा अुल्लेख आला होता, इतकेंच नव्हे तर 'माथेफिरू, अत्याचारी, आततायी, वेडगळ' अित्यादि शेलक्या पदव्यांनी आजवर अशा क्रांतिकारकास संबोधण्याचा केसरीप्रभृति वृत्तपत्रांचा आजवरचा जो ग्खात होता, तो न अनुसरता त्या देशवीराच्या योग्यतेस निदान कमीपणा तरी येणार नाही अशा गौरवपर भाषेंत त्याचा आणि त्याच्या कार्याचा संदर्भ सूचित केलेला होता, ही गोष्ट महाराष्ट्राच्या त्या मुखपत्राला अुजाळा देणारी झाली यात शका नाही.

देशवीर पिंगळे याजविषयी केसरीकार म्हणतात कीं, "त्यांनीं परदेशातून परत येअून राज्यक्रांति करण्याच्या हेतूनें यथाशक्ति अुद्योग करून त्यात आपल्या प्राणाची आहुति देअून देशाभिमानाप्रीत्यर्थ स्वार्थत्यागाची कड पोचविली!" असा विद्यार्थि ज्या तळेगावच्या शाळेंत अुत्पन्न झाला, तिच्यासारख्या शाळा काढण्यात अिंग्रजांचा अेक प्रमुख पण अप्रकट असा हा हेतु होता की, त्यातील शिक्षणामुळे हिंदु लोकांची हिंदु धर्मावरील निष्ठा नष्ट होअून ते आपोआपच खिश्चन धर्माकडे झुकतील. त्या हेतूविषयीं अेल्फिन्स्टनसाहेबाचे जे अुद्गार केसरीकारांनीं प्रसिद्ध केले आहेत ते आजहि महत्त्वाचे वाटतातच, पण वीस वर्षांपूर्वी अत्यंत महत्त्वाचे वाटले असते. कारण, त्यावेळीं अगदीं जहालातील जहाल देशभक्तहि अिंग्रजांनीं शिक्षण दिलें ते मात्र आपल्यावर परम अुपकार केले, म्हणून मानीत असत. रेल्वे, तारा, शांतता आणि शिक्षण हे अिंग्लिश राज्याचे

बुद्धिपुरस्सर केलेले अुपकार आहेत आणि त्याविषयीं आपण त्याचे कृतज्ञ राहिलें पाहिजे अशी सर्वांची ठाम समजूत होती. पुढें हळूहळू त्यातील अितर गोष्टी अुपकाराच्या टिपणींतून गळल्या, पण अिंग्रजी शिक्षण काहीं गळेना. महाराष्ट्रात हे नवीन शिक्षण चालू करणाऱ्या कारखान्यातील प्रमुख माअुंट स्टुअर्ट अेल्फिन्स्टन याचे अुद्गार केसरीनें जे दिले आहेत ते या प्रश्नाचा निकाल लावतातच. साहेब म्हणतात, "I am Convinced that the conversion of the Native must infallibly result from the diffusion of knowledge among them!" परतु याविषयीं अिंग्रजी पद्धतीच्या शिक्षणाचा जो मुख्य पुरस्कर्ता मेकॉले तो काय म्हणतो हेहि लोकांच्या ध्यानात असणे फार महत्त्वाचें आहे. कारण, मेकॉलेच्याच यत्नानीं महाराष्ट्रातच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानभर ही शिक्षणपद्धति चालू झाली. पार्लमेंटातील भाषणातून मेकॉलेनीं ह्या गुप्त हेतूचा पत्ता दिला नाही. तेथे त्यानीं केलेली ती प्रसिद्ध घोषणा कीं, 'ह्या शिक्षणापायी जागृत होअून ज्या दिवशीं भारत आपलें जू फेंकून देअील, तो दिवस अिंग्लडच्या अितिहासात सुवर्णाक्षरानीं मुद्रित होअील." हिलाच आपले बहुतेक पुढारी शिक्षणात अिंग्रजाचा, निदान मेकॉले महाशयांचा तरी, अेकमेव आणि म्हणूनच अुदात्ततर हेतु समजत. म्हणूनच अिंग्रजी शिक्षणाच्या प्रभावानें झालेली राष्ट्रीय जागृति अनुभवणारे बहुतेक देशभक्त मनःपूर्वक अिंग्रजास अुद्धारकर्ते मानीत.

अितराची गोष्ट राहोच, पण जहालातील जहाल जे पडित शामजी कृष्णवर्मा ते देखील हा अिंग्रजाचा हेतुपूर्वक अुपकारच मानीत आणि मेकॉले याचीं पार्लमेंटीय भाषणें पुरावे म्हणून पुढें माडीत. दे. भ. सावरकर जेव्हा प्रथम अिंग्लडमध्यें गेले, तेव्हा त्यास पडितजींच्या या अुपकाराच्या आभासास हटविण्यासाठीं सरासरी दोन महिने वादविवाद करावा लागला.

दे. भ. सावरकरानीं कॉलेजमध्यें असताना मेकॉलेची पत्रें वाचिली त्यात त्यास मेकॉलेचें त्याच्या जावयास धाडलेलें अतःस्थ पत्र अुपलब्ध झालें. त्यांत मेकॉले स्पष्टपणें म्हणतात कीं, माझी निश्चिति आहे कीं, मी चालू केलेल्या शिक्षणपद्धतीप्रमाणे शिक्षित झालेले Hindoos, ' हे हिंदु बाबू लोक, ' हिंदूच्या वेडगळ धर्मापासून च्युत होअून ख्रिश्च्यानिटीचा अवलंब आपण होअून करू लागतील ! हा अिष्ट परिणाम तुम्हा आम्हा-समोर घडूहि लागला आहे. ह्या पत्रावरून मेकॉलेच्या पोटातील हेतु अेल्फिन्स्टनच्या हेतूप्रमाणेंच होता हे स्पष्ट होतें. " ब्रिटिशाचे उपक्रम " ह्या अुपरोधिक नावाचीं अनेक व्याख्याने दे. भ. सावरकरानीं सार्वजानिक सभातून त्यावेळी दिलीं होतीं, त्यात त्यानीं हें पत्र महाराष्ट्रात प्रथमत. अुघडकीस आणलें आणि नतर अिंग्लडमध्ये त्याच अर्थाच्या Are we obliged to the British rule ? या व्याख्यानातून ते तेथील हिंदी लोकास परिचित केलें. नतर ते सत्तावन सालचें " स्वातत्र्ययुद्ध " या पुस्तकात प्रथमतःच प्रकाशित होअून सर्वत्र प्रसिद्धि पावले.

ह्या मेकॉलेच्या पत्राविषयी अेक स्मरणीय गोष्ट विषयानुरोधानेच साग्ण्या-सारखी आहे कीं, प्रसिद्ध अभिनव भारतीय क्रातिकारक पुढारी अय्यर हे सावरकराच्या Are we obliged to the British rule ? या नवीन व्याख्यानास अैकूनच क्रातिकारक बनले आणि अभिनव भारतात शिरले, असें ते स्वतः सागत असत. " निदान हिंदी लोकाना पाश्चात्य शिक्षण दिलें हा तरी ब्रिटिशाचा मोठा अुपकार असल्यानें त्याच्याशीं आपण कृतज्ञ म्हणजेच साम्राज्यनिष्ठ असलें पाहिजे. " अशी त्याची त्या काळा-प्रमाणें प्रामाणिक समजूत होती. सावरकरानीं व्याख्यानात रेल्वे अित्यादि प्रकरणीं जो अिंग्रजाचा आपलपोटेपणा होता तोच शिक्षणाचे बुडाशीं होता हें सिद्ध करताना अनेक पुरावे दिले, त्यात मेकॉलेचें हें पत्रहि

त्याअैवजी

होते. ते सारे पुरावे वाचून सावरकर म्हणत, "नव्या पाश्चात्य शिक्षणापासून आमचा पुष्कळ लाभहि झाला हे खरे, पण तो तें देणाराचा अुपकार म्हणून नव्हे तर अपकार म्हणून. शत्रू तलवार घेअून मला मारावयास आला, योगायोगाने त्याचे हातून ती तलवार निसटली आणि माझ्याच अुपयोगी पडली! आता तिचाच वार मी त्यावर करू लागताच तो म्हणतो, ही तलवार मी तुला दिली, माझे अुपकार मान नि मला सोड! त्याला जे अुत्तर तेच अिंग्रजी शिक्षणानें आम्हास झालेल्या लाभास अुपकार माना म्हणणाऱ्या अिंग्रजासहि दिले पाहिजे की, "अुपकार देवाचे– योगायोगाचे! तू अपकार म्हणूनच हे कार्य हाती घेतलेस!" ही विचारपरंपरा अैकून श्री अय्यर यांच्या मनावरील आंग्लनिष्ठेचें भ्रमपटल निरस्त झाले आणि क्रांतिकारक विचारांची बीजे त्यात झपाट्याने रुजू लागली.

तळेगावच्या शाळेच्या चालकाना आमची अशी सूचना आहे कीं, त्यानी त्या शाळेत देशवीर पिंगळे ह्यांच्या नावाचा अेक पितळी स्मृतिफलक लावावा. किंवा त्यांचे तैलचित्र तींत ठेवावे. पिंगळे ह्यांचेंच नव्हे तर महाराष्ट्रात सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर झालेल्या देशवीरांच्या—जे जे देशासाठीं प्राणत्याग करते झाले त्यांच्या—सर्वांच्या जन्मग्रामीं किंवा शाळेंत किंवा वसतिगृहात कुठे तरी असा अेक छानदार आणि ठळक असा स्मृतिफलक लाविला जावा. वासुदेव बळवंत आणि कामास आलेले त्यांचे अितर साथीदार—चाफेकर बंधु, रानडे, कान्हेरे, कर्वे, देशपांडे, पिंगळे अित्यादींचीं तैलचित्रे, सन्मानपूर्वक, त्यांच्याशीं संलग्न झालेल्या निश्चित स्थानाचा पत्ता काढून, प्रगटपणे लावण्यात यावीं आणि या सर्वांची चरित्रे परिश्रमपूर्वक माहिती मिळवून अैतिहासिक प्रमाणाच्या कसोटीनें लिहिली जावीं. बंगालमधील क्रांतिकारक देशवीरांचीं चरित्रेंच प्रसिद्ध होतात असें नसून जतीन्द्रनाथ मुकर्जीसारख्या सशस्त्र क्रांति-

कारक, देशवीराचे स्मृतिदिन बंगालभर पाळण्यात येतात. मुकर्जी अंक, मुकर्जी दिन, मुकर्जी सप्ताह असा प्रांतभर अुत्सव मानण्यात येतो. कारण, त्यांचे मार्ग अितराहून भिन्न असले तरीहि ते देशास्तव झुंजत पडले. पंजाबात मोठ्या समारभानें हुतात्मा डिंगराचें तैलचित्र गेल्या महिन्यातच अुद्घाटन करण्यात आले, मग महाराष्ट्रासच भयाची आणि संकटाची अेवढी हुडहुडी का भरावी ? अिंग्रज सरकारच्या दृष्टीनेहि यात काहीं वावगें नाही. कारण, पूर्वी फाशी गेलेल्या राजद्रोह्यांची शिरे वेशीवर लटकाविणें हाहि सत्ताधीश दंडच समजत. कारण, त्यायोगे अितर तरुणास अशा चळवळीच्या भयंकर परिणामाची कल्पना येअून त्यास अुलटा धाक बसावा. आता शिरें नाहींत तर निदान त्यांची चित्रें आणि नावे जरी वेशीवर लटकलीं, तरी लोकांवर तोच परिणाम होणार आणि अिंग्रजाविरुद्ध सशस्त्र बंड केलें, तर असा भयंकर प्राणदंड द्यावा लागतो अशी अितरास धडकी भरेल. त्यायोगें अुगीच गंमत म्हणून राज्यक्रांतींतील "स्वातंत्र्य", " मरा ", " मारा ", "सूड" अित्यादि शब्दांनीं भरलेली वायफळ बडबडीची करमणूक करण्याचें व्यसन लागलेल्या अनेक निःशस्त्र-संप्रदायी वाचिवीरास त्या व्यसनाचा चटकाहि कसा असतो याची कल्पना येअून ते त्या आगीशीं खेळेनासे होतील आणि ज्यांना तो चटकाच चटका लावून सोडील असा कोणी निपजणें, शिवाजी न जन्मलेल्या प्रांतात शक्य असो वा नसो, पण या शिवाजीच्या महाराष्ट्रात शक्यच नाहीं. कारण अेका शिवाजीनें त्यांचे पोट भरून फुगून गेलें आहे.

———

अद्‌दूयाअेशी

१०. प्रशंसनीय! वंदनीय! आदरणीय!—पण अनुकरणीय नव्हे!

(श्रद्धानन्द : ५-१०-१९२९)

जितेन्द्रनाथाचे बलिदान!!

"कीं समर्थी न वदावी तरि मग केव्हा हितोक्ति बोलावी!"

—मोरोपंत

जितेंद्रनाथ दासानीं, राजबंदींना तुरुंगातून अितर अनैतिक अपराध्या-प्रमाणें न वागविता त्यांच्या पवित्र हेतूला आणि अुच्च भावनाना शोभेल अशा सभ्य रीतीनें वागविण्यात यावें, अशी मागणी करून ती पुरविली जाअीतों अन्नत्याग करण्याची प्रतिज्ञा केली, आणि शेवटीं त्या प्रतिज्ञेपायीं अुपासमारीच्या अत्यंत हालअपेष्टा सहन करीत आपला प्राण सोडला, ही माहिती अैकताच अुभें राष्ट्र विव्हल व्हावें हे साहजिकच होतें. या भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्यार्थ ज्यानीं ज्यानीं गेल्या वीस पंच-वीस वर्षांत आपल्या सर्वस्वाची आहुति दिली, त्या त्या हुतात्म्यांत जितें-द्राचें नाव अक्षय झळकत राहील यात शंका नाहीं. स्वदेशास्तव कोणी मारीत मारीत मरतात, ते देशवीर होतात. जितेंद्रावरील अिंग्रजी आरो-पाची छाननी होअून त्यानीं काय काय केलें हें आपणा सर्वांस अद्याप

कळले नाहीं, तरीहि आजच्या परिस्थितींत स्वदेशासाठीं जितेंद्र अन्न-त्यागाची अमोघ प्रतिज्ञा करून स्वतःच स्वदेश-स्वातंत्र्याच्या यज्ञात बळी पडला — मरणीं मेला, हे तरी स्पष्टच आहे म्हणून जितेंद्र हुतात्म्याच्या गौरवास तरी पात्र आहेच आहे, यात शंका नाहीं याला शेवटच्या आठवड्यापर्यंत तरी आपले मरण कोणत्याहि क्षणीं टाळता आलें असते त्यानें अन्नस्वीकार करावा म्हणून अनेक देशभक्त त्यास विनवीत होते. त्यानें प्राणावर बेतण्याचे सधीस अुपास सोडला असता, तर कोणीहि समजस भारतीय त्यास माघार घेतली म्हणता ना! पण तरीहि त्या मानी आणि अेकवचनी वीरानें अन्न स्वीकारलें नाही, तो मरणास तिळमात्र भ्याला नाही. जिवाचे तिळ तिळ तुकडे करून ते अेकक मोजून त्यानें राष्ट्रीय यज्ञात स्वाहा केले, हे त्याचें अलौकिक प्राणदान, हें त्याचे धैर्य, ही त्याची सत्य-संधता प्रशसनीय आहे शूर संभाजी, वीर वदा, गुरु तेगबहादूर या पूर्वकालीन महान् हुतात्म्याच्या बलिदानाची गोष्ट जरी सोडली, तरी गेल्या वीस वर्षांत भारतीय हुतात्म्याच्या राष्ट्रीय यज्ञात दिलेल्या कोणत्याहि आत्महविर्दानाअितकें ते जितेंद्राचे प्राणदान प्रशसनीय आहेच आहे, वदनीय आहेच आहे—पण ?

भगतसिंग-दत्त, सतीन-सेन अित्यादि—

भारताच्या या अवनत काळीं असा अेक जरी देशभक्त तरुण अुत्पन्न झाला असता, स्वातंत्र्ययज्ञात केवळ स्वतःच मरणीं मरून का होअीना, पण अेकानें जरी अशा भीषण हालअपेष्टा सोशीत आपला प्राण आपणच "स्वदेशाय स्वाहा ! स्वदेशाय अिद न मम !" म्हणून हवन केला असता, तरीहि तें प्राणदान आपल्या भारताच्या पुनरुत्थानाची अेक सुनिश्चित हमी होअू शकतें, परतु जितेंद्राप्रमाणेच, अगदीं या क्षणीहि

त्याच्याच सहकाऱ्यापैकीं अनेक जण तेंच दिव्य आणि दुर्धर साहस करीत आहेत. भगतसिंग आणि दत्त तर काय—ते अन्नत्याग करून स्वतःचे देहास अनेक दुःसह यातनात ढकलणारे केवळ तपस्वीच नाहीत, आपल्या देहाचा आपणच बळी देणारे 'मरणीं मरते' हुतात्मेच नाहींत, पण 'मारता मारता मरणारे' देशवीरहि आहेत, अशी या भारतातच नव्हे तर जगातहि शेकडों लोकाची धारणा आहे. त्याच्या मार्गावर विश्वास ठेवावा, त्या मार्गाचा पाठपुरावा करावा कीं नाहीं, ही चर्चा येथे अुद्दिष्ट नाही, म्हणून तो अप्रस्तुत विषय सोडला, तरी त्यास शेकडो लोक देशवीर मानीत आहेत ही गोष्ट लपविण्याचे काहीं कारण नाहीं—लपविणें शक्यहि नाही. त्या देशवीरानी अन्नत्याग केल्यापासून प्रत्यही वृत्तपत्र अुघडताना प्रत्येक राष्ट्रभक्ताचे मनात धस्स होते कीं, वीर भगतसिंग—दत्ताची काही अशुभ बातमी तर आज वाचावी लागणार नाही ना? तीच स्थिति बगाल्यातील हिंदुकुलभूषण सेनानी सत्येंद्रनाथ सेनाची! पत्वाखालील हिंदुराष्ट्राचे वतीनें सतत वर्षभर झुज घेअून विजयी झालेला हा अट्टल सेनानी—आज बरिसालच्या तुरुगात अशाच अेका सापेक्षतः क्षुल्लक अटीवरून निकरावर आला, त्यानें अन्न वर्ज्य केलें आणि आज शभरावर दिवस नाना देहदड भोगीत भोगीत जर्जर होअून शरपजरी पडला आहे. अन्नावाचून शक्ति क्षीण होत आहे, त्याचें अर्धांग लुलें झालें आहे! वाचा मद झाली आहे! आता ते सुटले तरी जन्माचें पगुपण घेअून सुटणार. मेले—तर मरणीं मरणार! भारतीय हुतात्म्याच्या नामावलींत अेक नाव अधिक वाढणार, पण—! या सर्वांचा निर्धार, ही तपस्या, हे धैर्य, ही देशभक्ति प्रसशनीय आहे, वदनीय आहे!—पण!

हुतात्मा देशवीर रामरखा आणि अंदमानातील अन्नत्यागी—

आज हे राजनैतिक बदिवान् लोकाच्या डोळ्यासमोर आहेत, ते

हिंदुस्थानच्या कारागृहात आहेत, त्यातहि कच्च्या बंदीत अजून अभियुक्त अवस्थेत आहेत, accused आहेत, दंडित झालेले नाहीत--म्हणून त्यांच्या भावना, त्यांचे निश्चय, त्यांचे अपमान, त्यांचा मृत्यु-राष्ट्रीय दृष्टीच्या निःस्पंद दृष्टीसमोर अेखाद्या चित्रपटामारखा धरलेला आहे. म्हणून त्यांची यातना अुभ्या राष्ट्रभर हृदयाहृदयास पीळ पाडीत आहे. तथापि या वेळेस, माहीत नसणारास नसले तरी माहीत असणारास, राजकीय बंदिवानांना सन्माननीय वागणूक लाभावी याच प्रश्नासाठीं अशाच अन्नत्यागाच्या भीषण प्रतिज्ञा करून अशाच दुर्धर यातना, अशा महिनोगणतीच्या अुपासमारीने झिजत झिजत, त्या दृष्टीच्या पलीकडील कठोर काळोखात--त्या अंदमनात--ज्यांनीं गेली दहा वर्षे सहन केल्या, त्या नानी-गोपाळाची, त्या भाअी परमानंदाची, त्या शूर पृथ्वीसिंहाची—भाअी सोहनसिंगादि त्या अनेकानेक राजकीय जन्म ठेप्याची आठवण आज झाल्यावाचून राहणार नाहीं अशाच अुपासमारी, हेच हाल त्यांनीं चार चार महिने सोसले ! स्वदेशाच्या ह्या ' भलेवीर ' म्हणून सारखी पाठ थोपटणाऱ्या प्रेमळ सहानुभूतीची संजीवनी जवळ नसताना सोसले !— आणि ह्या जितेंद्रासारखाच तो वीर रामरखा अन्न सोडून, कपडे टाकून, अुपाशी, हातकडींनी जखडलेला महिनोगणतीच्या यातनांनी क्षय होअून शेवटीं मरणीं मेला ! अंदमानच्या अंधारात संतापून संतापून मरणी मेला—त्याच्या देशाच्या अेकाहि डोळ्यातील अेकाहि अश्रूने त्याच्या त्या संतापास लवलेश शीतलता न मिळता मरणी मेला ! त्याचे शव कुठें फाडले, कुठे पुरले, कुठें पडलें, याचा पत्तादेखील नाहीं ! अनशन करून, आमची अमुक मागणी तुम्ही मानीत नसाल तर हे अिंग्लंड देशा, तुझ्या दाराशी मी त्रागा करीत, अुपाशी प्राण सोडीत, तें पाप तुझ्या माथीं म्हणून भीति घालीत, ते अंदमानात जे मेले, जे पगू

झाले, हे जे अिथे मरत आहेत, पगु होत आहेत— ते सर्व हुतात्मे निःसशय प्रशसनीय आहेत ! पण——!

जे अेकाच्या उदाहरणात प्रसशनीय असते ते अेकदरीत सर्वांना अनुकरणीय असतेच असे नव्हे ! ——

पण जें जे वर्तन किंवा जो जो सद्गुण सर्वसामान्यत. प्रशसनीय किवा वदनीय असू शकतो, तो तो सर्व परिस्थितीत सारखाच अनुकरणीय असतोच असतो असे नसल्याने, किंबहुना काही विशिष्ट परिस्थितीत तो सामान्यत· सद्गुण किवा ते सामान्यतः प्रशसनीय वर्तन अनिष्टच होत असल्याने, राष्ट्रीय लढ्यात, राजकीय पेचापेचीत, सदोदित विपक्षाची हालचाल आणि स्वपक्षाचे बल ही तोलून, विवेचून, मग काय ते आपल्या सैनिकाचें सचलन करणे अगत्याचे होअून बसते राष्ट्रातील प्रत्येक चळवळ, राष्ट्रीय झुजाराचा प्रत्येक सामना, नुसता प्रशसनीयच असून अुपयोगी नाही, तर तो कुशल, अिष्ट आणि कार्यक्षमहि असला पाहिजे. अत्यत तीव्र देशभक्तीच्या वेदनानीं विव्हल होअून अेका तरुणाने, लोकमान्य टिळक मेल्याची बातमी अैकताच, माडीवरून अुडी टाकून जीव दिला म्हणून अैकिवात होते. आता ही त्याची अुत्कट देशभक्ति वदनीय होतीच होती ते प्राणार्पण करताना त्याची दैहिक जीवनाची तुच्छता कोणत्याहि हुतात्म्याअितकीच प्रशसनीय होती-—पण त्यामुळे ते कृत्य अनुकरणीय ठरत नाही कारण, ज्या ध्येयासाठी, स्वदेशहितासाठी, प्रेरित झाल्यामुळे त्याच्या हृदयात लोकमान्याचे मरणवृत्त अैकताच अशी बलिदानाची भावना अुसळून आली, तें देशहित ते त्याचे प्राण असे न देता—नुसते मरणीं न मरता—जर जरा निराळ्या रीतीने त्यानें दिले असते, तर अधिकच साधले असतें. त्याचें कृत्य प्रशसनीय असताहि अिष्ट नव्हते ज्या नीच स्वार्थपरायण प्राण्याला लोकमान्याचे मरणाचे दिवशीहि क्षणभर देखील स्वदेशासाठीं दुःख सोसण्याची

अूर्मि आली नसेल, क्षणभर देखील ज्याचें स्वार्थलंपट मन विचलित झाले नाही, त्याचे मनाहून हा स्वदेशप्रेमाने तळमळून तत्त्वाला आत्मार्पण करणारा तरुण कोटिपटीने वंदनीय आहे पण तरीहि त्याचे त्या कृत्यामुळें झालें त्याहून त्याच प्राणाच्या मूल्यानें, शतपट अधिक स्वदेशहित त्यास सहज साधता आलें असतें म्हणून तें कृत्य, प्राण देण्याची ती रीत, नुसतें मरणी मरून जाण्याचे ते बलिदान, अितर राष्ट्र-योद्ध्यापुढें अनुकरणीय म्हणून धरता येणार नाहीं कारण, बलिदान आणि कत्तल, हवि आणि हत्या यात अेक चामलें आणि दुसरे वाअीट हें जें आपण ठरवितों, तें का ह्याचे विवेचन केलें असता त्यातील भिन्नतेची हीच कसोटी आढळून येते कीं, त्यापैकी पहिलें परोपकारास्तव आणि आत्मोन्नतिस्तव अत्यंत अवश्य असा त्याग असतो, महत्तर अर्थ साधण्यासाठीं अपरिहार्य अशा अर्थाचा त्याग असतो, आणि दुसरा म्हणजे स्वतःचा किंवा दुसऱ्याचा तामसी नाश असतो, लोककल्याणाला पोषक न होता क्वचित् अुलट विघातकच होणारा परिहार्य प्राणनाश असतो मुक्तीला अवश्य तितकेच हवी घेतो तो खरा यज्ञ- हवी देतो तो खरा यजमान न्याय्य समर जिंकावयास अवश्य तितकेच सैनिक, अन्याय्य बलाचे शासनार्थ जो मरणावर चाल करावयास धाडतो, तो खरा सेनापति नुसते आत्मार्पण करणें म्हणजे मुक्ति मिळविणें नव्हे, नुसतें मरत राहाणे म्हणजे समर जिंकणे नव्हे, तसेच नुसतें मरणीं मरणें, हुतात्मा होत राहाणे म्हणजे राष्ट्रीय वा धार्मिक स्वातंत्र्य संपादन करणें नव्हे. तें जेव्हा केव्हा त्या स्वातंत्र्ययुद्धातील अपरिहार्य घटक असेल, तेव्हा तेंहि केलेंच पाहिजे, जसें तेगबहादुराने केलें, जसे जे लढाअीच्या पहिल्याच पायीं शत्रूच्या गोळीस बळी पडतात ते करतात, जसें शत्रूच्या कारागारात जन्मोजन्म जे स्वदेशार्थ सडतात ते करतात.

परंतु राष्ट्रीय सैन्याचें मुख्य ध्येय विजय हे आहे. आपल्या न्याय्य

पक्षाची अेकदरीत कमींत कमी हानी होअून अन्याय्य विपक्षाची अेकदरीत जास्तीत जास्ती हानी करण्यास जी युद्धकला म्हटते ती खरी युद्धकला होय!

त्या युद्धकलेचा हुतात्मता हाही केव्हा केव्हा अेक अत्यंत अवश्य आणि अत्यंत वद्य असा घटक होअू शकतो पण तो अपवाद म्हणून. केवळ हौतात्म्य ही काहीं विजयाची निश्चित हमी नव्हे! रामाची सीता रावणाने चोरली, जो सीतेला चोरून नेण्याअितका नीच आणि दुष्ट होता, तो रावण रामानें लाख अुपोषणे करीत त्याच्या दाराशी 'सीतेला दे, नाहीं तर मी त्राग्याने स्वत:चा प्राण देतो' असे म्हटले असता ज्याच्या अंत:करणास लेशहि दुःख फुटणार नाही अितका निर्लज्ज, निष्ठुर होताच होता! म्हणून रामाने अन्न सोडले नाहीं, तर अुलट रावणाचे पुढील जीवनाच्या अन्नाचें ताट ठोकरून त्यालाच मरणाच्या अुपासमारीने कसा नामशेष करून टाकता येअील याच्या व्यवस्थेस श्रीराम तातडीने लागला सीतेनें देखील अशोक वनात असता, मला अमुकच भोजन आणि अमुकच मान देशील तर बरे, नाहीं तर अन्न सोडून मरेन, अशी नसती प्रतिज्ञा केली नाही. कारण, तिचें मुख्य ध्येय जें रामाकडून रावणाचा वध करविणे, त्यास तें अवश्यक नव्हते, अितकेच नव्हे तर क्वचित् अपायकारकहि झाले असते. हा, अेक मात्र प्रतिज्ञा तिनें केली—अेका गोष्टीसाठीं मात्र ती प्राणत्यागहि करती—ती म्हणजे स्वत:चें प्रीतिस्वातंत्र्य—ते पातिव्रत्य—तें ध्येयच जर संकटात सापडते, आणि प्राण वाचविणें म्हणजे मुख्य ध्येयच सोडणें असा प्रसंग येता, तर—तर मग मात्र प्राण सोडणेंच तिचे कर्तव्य होतें—आणि तिने ते केलेंहि असते. गुरु तेगबहाद्दूर, बंदा वीर किंवा राजे संभाजी यांचे मुख्य ध्येयच स्वधर्मरक्षण होतें, म्हणून जेव्हा त्या ध्येयासाठींच प्राण देणे प्राप्त झाले, तेव्हा त्यांनीं प्राण दिला हेंच युक्त

लें. तेंच खरें हौतात्म्य, नुसते प्रशसनीयच नव्हे--वदनीयच नव्हे—पण नुकरणीयहि असणारें हौतात्म्य तेंच ! तीच गोष्ट कोठल्याहि राजकीय ातिकारकाचें मुख्य ध्येय जें महनीय स्वदेशस्वातंत्र्य आहे, त्यासहि लागू हे. त्यासाठीं झुजताना ते धरले जाअून, वाताहत होअून, त्याच्या विप- चे हातीं पडले असता, जर अुदाहरणार्थ त्यास त्याच्या स्वातंत्र्यसेनेची त्याच्या दारूगोळयाची माहिती त्याचा विपक्ष विचारू लागला--जर करिता त्याचे प्राणान्तिक छळ होअू लागले, तर ते छळ सोसून त्याकरिता णहि गेला तर तो देणे हे त्यास त्याच्या दृष्टीनें कर्तव्य वाटलेंच पाहिजे. —कारण मुख्य ध्येयार्थच तें प्राणदान तशा स्थितीत अवश्य आहे, गूनच अुपयुक्त आहे. ज्या अेका प्राणाच्या तशा दानाने शेकडो निरप- ा प्राण, अेका राष्ट्राचा मान, अेका न्याय्य ध्येयाच्या ध्वजाचा गौरव हे चले जातात तो प्राण देणे हेच खरे हौतात्म्य—केवळ प्रशसनीयच नव्हे, नीयच नव्हे—पण अनुकरणीय हौतात्म्य. क्रातिकारकाच्या तत्त्वाशी वा मार्गाशीं ज्याची सहानुभूति नाही त्याची चर्चा या विवेचनात अप्र- त म्हणून तीविषयीं अनुकूल-प्रातिकूल असे काहीच मत या स्थलीं न ा तटस्थपणें आम्ही अितकेच सागतो कीं ध्येयार्थ अत्यवश्य असलेलें णदानच तेवढें सूक्त आहे, पण ध्येयार्थ अनवश्यक असलेले प्राणदान ' वीरात्म्याच्या देशभक्तीचे किंवा निग्रहाचें किंवा निःस्वार्थ निर्भयतेचे ोतक होणारें आणि म्हणूनच हेतुतः वदनीय असणारे परतु व्यवहारतः याच्या अंतिम विजयास अनवश्यक नव्हे तर अेका अर्थी अपायकारकहि ारें आणि म्हणूनच अनुकरणीय नसणारे आहे, हें सर्वसाधारणपणे ाण्यास काहींअेक हरकत नाहीं. केवळ प्राणहानीसाठीं प्राणहानी नेष्टकारकच होय आणि या दृष्टीनें सध्या जिकडे तिकडे अुठलेल्या या ा सोडून, आपण होअून अनेक यातना सोशीत, केवळ मरणीं मरून

जाण्याच्या पद्धतीची जी अन्न सोडून मरून जाण्याची साथ अुठू पाहात आहे तिचा, या अन्नत्यागाच्या साथीचा, युद्धातील अेक धोरण म्हणून, निषेध करणें हे आम्ही आमचें कर्तव्य समजतो.

जीं माणसें अशा अुच्च देशभक्तीने प्रेरित होअून, अशी कठोर तपस्या करून, मरणी मरतात, त्याचे वैयक्तिक मोल कमी न करता, त्याच्या त्या दैवी वैयाक्तिक बलिदानाचा यथोचित आदर करीत असताहि, हे स्पष्टपणे सांगणें अवश्य आहे, भावना दुखली तरी दुखवून, राष्ट्रीय हितासाठीं हा बुद्धिवाद प्रगटपणे बोलून दाखविणे कर्तव्य आहे कीं, ही अनशनाची लाट जर अशीच फैलावू पाहील, तर तिच्यामुळें राष्ट्राच्या मुख्य ध्येयाला—स्वातंत्र्याला— ज्या माणसाच्या सक्रिय जीवनाची किंवा लढत्या मरणाची अपेक्षा आहे, त्याना जवळ जवळ व्यर्थ गमावून, नुसते मरणीं मारवून, आपण दुर्धर हानि पोचवू. कारण हे जे देशभक्त आता अेकाचें पाहून दुसरा, दुसऱ्याचे पाहून तिसरा, असे अन्नत्याग करून लुले, पागळे, क्षयग्रस्त होत, दुःखद मरणीं मरणाचे भक्ष्य होअू पाहात आहेत हे कशाकरता? तर राजकीय बंदींना थोडें बरे वागविलें जावें, या सापेक्षतः अगदीं दुय्यम मागणीसाठीं! आणि अशा अगदीं दुय्यम मागणीसाठी अेवढाले वीर बळी द्यावयाचे! जितेंद्र, सेन, भगतसिंग, दत्त—असे अेकाहून अेक अभिमन्यू, जनकोजीसारखे वीर—अेकाद्या भारतीय युद्धास जिंकणारे—अेकेकाच्या प्राणाचे मूल्य दहा दहा प्राण— असे हे देशभक्त, मुख्य ध्येय जें स्वातंत्र्य त्याच्यासाठीं होणाऱ्या लढ्यामध्यें (struggle) अभिमुख आक्रम करीत, मोलास मोल घेत मरावयाचे, ते असे अवेळीं, अकाली, अेका सापेक्षतः यःकश्चित् चांगल्या भाकरीच्या किंवा वर्तमानपत्राच्या तुकड्यासाठीं किंवा अेक खुर्ची—टेबल राजबंदिवानास मिळावें म्हणून अन्न सोडून सडत मरावे—नुसते मरणीं मरून जावे! मातीच्या मोलानें

असला अमूल्य घाटकरी अिरेस घालून मातीस मिळवावा ! राजबंदीच्या मानाप्रमाणे त्यास वागवावें हा प्रश्न मानाचा आहे ही गोष्ट खरी आहे. त्या मागणीसहि मोल आहे, पण ते असल्या प्राणाचे नव्हे. अंदमानातहि दहा वर्षे सप करून, अितर कैद्यात सप पसरवून, अधिकाऱ्यास अुत्थापन देण्याचें नाकारून, बळाने पत्रें आत आणून, बळाने अेकमेकाशीं बोलून, हातकडी, बेडी——अितका त्रास अशा दुय्यम प्रश्नाकरिता, हक्काकरिता, सोसला, परंतु तिथे जेव्हा जेव्हा अन्नत्यागाचा त्रागा करण्याअितका कुणी संतापे आणि भलतीच प्रतिज्ञा करी, तेव्हा त्यास तत्काळ प्रेमानें आग्रह केला जाअून त्या आत्मघातक निश्चयापासून परावृत्त केलें जाअी. अेखादा अवसानबाज मनुष्य अेखाद्या लिलावात अेका दोन कवडीच्या वस्तूचे मोल हट्टास पेटून जसा दोन हजार रुपयापर्यंत चढवीत जातो, तसेंच राजबंदींना सुधारलेल्या पद्धतीने वागविण्याच्या दुय्यम मागणीसाठीं अशा वीराच्या अमोल प्राणाची अशी मातीमोलाने नासाडी करण्याची ही हट-वादी चूकहि आपायकारकच होणारी आहे. अेकादा जितेंद्रासारखा अुदात्त अपवाद झाला तर झाला, झाला तेवढा क्षम्य आहे. पण आता या यःकश्चित् मागणीसाठीं ही अनशनाची साथ अधिक फैलावू देता कामा नये.

राजकीय बंदिवानांना कितीहि बऱ्या रीतीने वागविले तरी काय ! स्वतःस बंदीवान् म्हणवूनच घेण्याचे दौर्बल्य तर राहाणारच ना ! अगदीं खुर्चीवर बसून ताजें पत्र वाचीत राहिलें, तरी अिंग्रजाचा बंदीवान् ! बरें, कारागृहाबाहेर आलें तरी काय ?

“ बंदी नसे त्यातिल कोण बोला ।
जो लोक दैवे परदास झाला ॥
तो बंदि तद्भूचि तुरुंगशाला ॥ ”

अहल्याण्णघ

या अितक्या दहा पधरा हिन्यास नागवून तो 'बरे वागविण्याचा' अधिकार मिळाला—तरी काय? तो अुद्या सामसूम होताच पुन्हा छिनला जाअील! जोवर हिंदुस्थान पारतंत्र्यात आहे तोंवर लहानसहान अधिकार, जागा, पागा हिसकवेल तितक्या हिसकीत राहायचेंच, त्यासाठीं परिमित आणि प्रमाणशीर तो स्वार्थत्याग आणि प्राणत्याग करीत राहायचेच— पण तरीहि हे कधीं विसरायचें नाहीं कीं, ते अधिकार जिने दिले ती परकी सत्ता जोवर जिवत आणि प्रबळ आहे, तोवर ते केव्हा छिनावले जातील याचा काहीं नियम नाहीं. ते धुळीवरचे सारवण! म्हणूनच भलत्याच दुय्यम प्रश्नास "हा मानाचा प्रश्न" आहे असें नसते महत्व देअून, लाखाचा प्राण मातीच्या मोलाने देण्याच्या प्रतिज्ञा यापुढे तरी कोणीं कधीं करूच नयेत. केल्या असल्या तरी मुख्य ध्येय जे स्वातंत्र्य त्यास असला सापेक्षतः निरर्थक आणि अतिशय सवग प्राणत्याग अपायकारक असल्यानें तशा भलत्याच प्रतिज्ञाची चूक त्या प्रतिज्ञा मोडून सुधारावी.

भलती प्रतिज्ञा करणें अेक भूल, तर ती प्रतिज्ञा राष्ट्रीय हितास अपायकारक असताहि तशीच चालविणे ही सवाअी भूल. अशा परिस्थितींत शक्यतो त्वरित पाय मागे घेणे हेच खरें शौर्य, खरा देशाभिमान, खरें धैर्य आहे, म्हणून आम्ही आमच्या सर्व देशबधूस— त्यातहि भगतसिंगादि अत्यत तेजस्वी आणि लाखाच्या मोलाच्या नररत्नास, वीरास, अशी आग्रहाची विनति करतो कीं, त्यानीं राजकीय बदिवानाच्या हक्कासारख्या दुय्यम आणि सापेक्षतः थोड्या मोलाच्या मागणीचे पायीं आपल्या राष्ट्रीय पक्षाचे केवळ धुरधर असे तरुण बळी देअू नयेत. मुख्य ध्येय जे स्वातंत्र्य, त्याचे प्राप्तीसाठीं हे प्राण व्यय करावे. युद्धाच्या मुख्य केंद्रावर, शत्रूच्या मुख्य मर्मावर ह्या निवडक वीराच्या फळीच्या फळीनें चालून जावयाचे, कीं विपक्षाच्या बाजार बुणग्याशीं मूठभर 'आद्या'साठीं त्रागा

करीत अनशनाच्या चिमट्याने अेखाद्या फकिराप्रमाणें आपलेच अंग भोसकून मरणी मरून जायचे ! त्यातहि राजकीय बंदिवानाच्या दुय्यम प्रश्नासाठींच काय तें अनशन हें अनुपयुक्त साधन आहे, अितकेंच नव्हे तर स्वातंत्र्ययुद्धाच्या अशा प्रकारच्या युद्ध्यमान परिस्थितींत अशा विपक्षाशीं लढण्याचें तें साधनच नव्हे, ते शस्त्रच नव्हे.

जे शस्त्र विपक्षाच्या अंगास न भोसकले जाता स्वतःसच भोसकले जातें ते शस्त्रच नव्हे ! आणि तेच वापरू पाहणारा कुशल लढवय्याहि नव्हे !

ही अनशनाची बंदूक विपक्षावर रोखली जाताच गोळी पुढे न जाता मागें निसटून धरणाऱ्याच्याच पोटात अचुक घुसते. ती अवसानघातकी बंदूक, ते अनशन, तो त्रागा, हा अुदात्त हेतूनें पण अपायकारक चुकीने आत्मनाशास कारण होतो. ह्या अनशनापायीं अेक- दोन- दहा- वीस जरी भगतसिंग मेले तरी त्याचे विपक्षाला काय दुःख होणार !

अुलट परसत्तेच्या पायवाटेंतील हे जाचक होणारे भयंकर विषारी काटे तुम्हीं आपण होअून दूर फेकून दिलेत, असेंच ती परसत्ता म्हणत राहील. मृगानीं सिंहाच्या दाराशीं नुसत्या अुपासाचा सत्याग्रह केला, तर सिंह बसल्याबसल्याच त्यास खाअून टाकता येते म्हणून अुलट हसत राहील ! मृगाच्या अनशनानें नव्हे तर मृगयेच्या भीतीनें सिंह गांगरला तर गांगरतो.

तुम्ही म्हणाल, परसत्तेचें अनैतिक स्वरूप जगाच्या दृष्टीस यायोगें आम्ही पाडतों !—पण देशबंधूनो, परसत्ता मूलतःच अन्यायाच्या पायावर अुभी आहे, हें जगाला न कळण्याअितकें ते जग--म्हणजे मुख्यत्वें युरोप आणि अमेरिका—वेडें आहे, असें का तुम्हास वाटतें? वॉरन हेस्टिंग्जच्या वेळचीं बर्कची भाषणें, बेगमांचा छळ, डलहौसीचे अपहार, सत्तावनच्या कत्तली, दुष्काळ, प्लेग, जालियनवाला बाग, अगदीं परवाचा लालाजींवरील लाठ्याचा मार--अहो, प्रत्यहीं आज दीडशें वर्षें नागवें हिंडणारें या

प्रशंसनीय! वंदनीय! आदरणीय!—पण अनुकरणीय नव्हे!

परसत्तेचे अनैतिक रूप ह्या जगास जर दिसलें नाहीं, तर त्या जगास तें आता आणखी तें काय दिसणार आहे! जगास सगळें माहीत आहे. ते सगळे अेकमेकाचे साथी आहेत, मिंधे आहेत. तें जग तुमच्यासाठी काहींहि करणार नाहीं. अुलट या तुमच्या आपल्याच माणसाचा बळी देणाऱ्या विक्षिप्त युद्धपद्धतीला पाहून तुमची अधिकच अुपेक्षा करतें. मॅक्स्विनी मेला—म्हणून जगाने किती हजार सैन्य आयर्लंडच्या सहाय्यास धाडलें? किती हजार विमानें? कोणीं कोणीं अिंग्रजाशी केवळ त्या प्रश्नापायीं लढाअी सुरू केली? तीच स्थिति जतींद्राची—भगतसिंगाची—दत्ताची! नव्हे, त्याहून वाअीट! कारण, मॅक्स्विनीच्या मृत्यूच्या पाठीमागें स्वतः आयर्लंडच्या माशिनगनाचें बळ होते! म्हणून त्याची आग अिंग्रजाना थोडी तरी पोळवू शकली पण तुमच्या हुतात्म्याच्या अन्न त्यागून मरणी मरून गेल्याने अुत्पन्न होणाऱ्या क्षोभाच्या मागे कसले पाठबळ आहे? पुन्हा, अेक मॅक्स्विनी अन्नत्याग करून मेला त्याचे आधीं त्यानें अेका प्राणदानाच्या विनिमयात शत्रुपक्षाची यथेच्छ हानी केलेली होती. वास्तविक तो मारीत मारीतच मेला. पण तरीहि त्यानें अन्नत्याग केला म्हणून साऱ्याच साऱ्या आयरिश बंदिवानानी अन्नत्याग करून नुसते मरणीं मरून जाण्याची परधार्जिणी चूक केली नाही. अुलट त्यानीं तुरुंगातील अधिकाऱ्यास सळो का पळो केलें, आणि खाणें सोडलें नाहीं, तर दंगे करून दुप्पट खाल्ले, आतून बंदीगृहे फोडलीं, बाहेरून सशस्त्र आक्रमणें करवून बंदीवान सोडवून नेले! आयर्लंड स्वतंत्र झाला, तो मॅक्स्विनीच्या नुसत्या अन्नत्यागानें नव्हे, केवळ हुतात्मतेनें नव्हे, तर त्या हौतात्म्याचा पुरा पुरा लाभ घेणारी सशस्त्र रणधुमाळी अुठवून देण्याचा त्यानें त्यापूर्वीच हरि ॐ केला होता. त्यामुळें आणि पुढे करातीचा सारखा भडिमार करीत राहिला त्यामुळे, म्हणून आयर्लंड यशस्वी झाला, नुसतें सगळ्यानीं मरणीं मरून

अेकर्सेअेक

नाहीं. तशी सिद्धता आज हिंदुस्थानात कोणाची आहे? क्रांतिकारकांचे मार्ग बरे कीं वाअीट, आयर्लंड तसे वाचू शकले म्हणून आम्हालाहि तसे समरतांडव केलेंच पाहिजे किंवा करता येअील कीं काय, याची चर्चा या लेखात प्रस्तुत नाहीं, तो प्रश्न स्वतंत्र आहे. पण तरीहि अितके स्पष्टच आहे कीं, क्रांतिवादी किंवा शांतिवादी अशा कोणत्याही हिंदी पक्षाची, अशा हुतात्म्यांच्या नुसत्या मरणीं मेल्यानें अुत्पन्न होणाऱ्या क्षणिक क्षोभाचा भीषण चटका विपक्षास बसेल अशी कोणतीहि कृति किंवा क्लृप्ति करण्याची किंवा योजण्याची छाती नाही, सिद्धताहि नाहीं. तोंवर अशा नुसत्या राष्ट्रक्षोभाच्या क्षणिक अुत्तेजनाची निशा अुपभोगण्यासाठीं हे अेकाहून अेक वीर नुसते मरणीं का मारावे? जो क्षोभ विपक्षास लवलेशहि चटका न देता आपल्या स्वत:सच जाळीत सुटतो तो काय कामाचा! जो क्षोभ अेकदा राष्ट्रीय रडारडीचे अश्रु गाळताच विझून जातो, त्यासाठीं हे अितके शूर वीर देशभक्त हालहाल करून मातीच्या मोलानें, अन्न अन्न करीत, बळेंच मारविणें हा अगदी आत्मघातकी वेडेपणा आहे. त्यापेक्षा परकी सत्ता या देशभक्तांचे असे छळ करती, त्यांना स्वीकारोक्ती (confessions) करिता मारहाण करून लुले-पांगळे करती, त्यांना अशी बळानें अुपाशी मारती, तर त्याचा दोष अधिक निरुत्तरपणें तिच्यावर पडून जगात आणि स्वजनात झाला, त्याहूनही अधिकच क्षोभ अुत्पन्न होअू शकता. हिंदुवीर सतीन बाबू असे अन्न सोडून आपण होअून मरणीं न मरता सतीन बाबू-सारखे आणखी दहाजण जरी पत्राखालीच्या सत्याग्रहात किंवा तशा कोणत्या शत्रूची प्रत्यक्ष हानी करणाऱ्या लढ्यात मरते तर त्याचें दुःख नव्हतें!

कारण विपक्षासहि त्याच मानानें किंवा बऱ्याच मानाने तशीच हानी पोंचत राहाती. पण अशा भलत्याच आग्रहापायीं, या अडाणी आत्मनाशक

त्यागयापायीं, विपक्षाची हानी मुळींच न होता आपलीच मात्र शतपट हानी होते; नव्हे, विपक्षाचे डाव आपणच असले अडाणी पेच मारूं गेल्यानें सुकर करून देतो!

अहो, कोर्टात खटले होअून दोन चार वर्षे शिक्षा होत्या, त्या शिक्षा भोगून ते देशसेवेस आणि परसत्तेच्या छातीवर पुन्हा नाचावयास मोकळे होते, पण ज्याना शत्रु फाशी देअू शकत नाहीं अशा दाहवीस आरोपिताना अन्नत्यागाची फाशी आपण होअूनच देतो हजारो रुपये व्यय करून नवे कडक निर्बंध करकरून, वशिले लावून लावून, ज्या देशभक्ताना फाशी व्हावी म्हणून ही परसत्ता धडपडते तरीही ते सुटन किंवा दहा वर्षेच बंदी होअून तिच्या छातीवर जिवत नाचत पुन्हा झुजण्यास परत येताना पाहून ती परसत्ता हिरमुसली होते—तीच परसत्ता त्या देशभक्ताना अेक दोन महिन्यात असे अेकामागून अेक पटापट अन्न सोडून मरताना पाहून, मनातल्या मनात टाळया पिटून निस्सशय असेंच म्हणत नसेल कशावरून की—
"ठिक! ठिक! औषधावाचून खोकला गेला. माझा अेक केंसहि वाकडा न करता अेक कट्टर शत्रु अनायासें मरणीं मेला!"

ज्या वेळीं अदमानात भाअी परमानद, ननी गोपाळ, भाअी पृथ्वीसिग, भाअी सोहनसिग अित्यादि अनेक देशभक्तानीं असाच प्राणपणाने अन्नत्याग केला, तेव्हा बॅ. सावरकरानीं त्या पद्धतीचा हानिकारक आत्मघातकी परिणाम राजबदींच्या मनावर वारवार ठसविण्याचा अत्यत निग्रही प्रयत्न केला. म्हणून त्यातील काहींतरी देशभक्त अन्नत्यागापासून परावृत्त होअून, सुटून, आज पुन्हा देशाची अुत्कट सेवा करीत आहेत. ते सर्व प्रकरण 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकात वाचकानीं अवश्य वाचावे. नाहींतर ते लोक मरणीं मरत विपक्षाचें बळ वाढविते, तर त्याचीं नावें देखील अिकडे कोणास कळतीं ना! पेलाभर दुधासाठीं, पौंडभर तेल गाळण्या-

साठीं, अेखाद्या वृत्तपत्रासाठीं, अेका खुर्ची-टेबलासाठीं, कामाचे सप करा, अधिकाऱ्याशीं भाडा, अधिकाऱ्याना सळो का पळो करा, वेळेवर अन्नत्यागहि मर्यादित अवधीपर्यंत करा ! पण प्राणत्याग ? आणि तोहि आपणच अुपाशीं मरत आणि अशा सापेक्षतः यःकश्चित् मागणीसाठीं ? आणि विपक्षाचा केसहि वाकडा न करता ? आणि भगतसिंग, दत्त, सतीन-बाबू अशा अशा पाच पन्नास धुरंधर देशवीरानीं ? छट् ! हा कसला अपाय-कारक त्याग ! अडाणी पेंच ! शत्रूची दाणावैरण बंद करावयाची कीं आपल्याच दलाची ? शत्रूस अुपासमार करावयास लावतें, त्यास दे माय धरणी ठाय करते, त्याची शक्ति लुळीपांगळी होअील असे पेच मारते, तेंच खरे युद्धाचें धोरण---मग त्यापायीं आपल्याही पक्षास जी अपरिहार्य हानी सोसावी लागेल ती सोसूच सोसू. पण विपक्षाचा केसहि वाकडा न होता आपला प्राण देअून अुलट विपक्षाचे कार्य सुकर करून देणारे हे कसलें भिकार फकीरी त्यागाचे धोरण ! वीरहो, ते सोडून द्या ! तत्काळ अन्नभक्षण करा ! दुप्पट खा, आणि विपक्षाची दुप्पट हानि करीत वैध-मार्गानें दुप्पट झुजा.

हुतात्मा जतींद्राचा अपवाद वंदनीय आहे, प्रशंसनीय आहे-पण तो अपवाद आहे. सर्वांना तो मुळींच अनुकरणीय नाहीं ! शिवाजी बंदींत पडला तेव्हा त्यानें अनशन करून आपले प्राण सोडले नाहींत, तर तो औरंगजेबाच्या छातीवर लाथ मारून निसटून गेला ! परिस्थिति पाहून योग्य तो फरक करा ! पण मूळ रणनीति मात्र तीच ठेवा !

—•—

अेकोंबार

स्वा. सावरकरलिखित

हिन्दुराष्ट्रदर्शन

मूल्य रु. ६

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिराचें
तेजस्वी मराठी वाङ्मय

स्वा. सावरकरलिखित

१८५७चे स्वातंत्र्यसमर	१०॥	[illegible]गड	
[illegible]	।	बाजीप्रभु	॥
[illegible]-दर्शन		चाफ[illegible]-गानहु	[illegible]
[illegible] पञ्चप्राण	[illegible]	[illegible]नफुल	[illegible]
हिन्दुपदपातशाही		तेजस्वी तार	२॥

[illegible] ल. करंदीकरलिखित

सावरकरांचे महत्कार्य	५॥

[illegible] गो. सरदेसाईलिखित

आमचा स्वभाव	[illegible]	मधुचंद्र	[illegible]॥

कादंबऱ्या

बाल बहिर्जी–[illegible] आनन्द [illegible]		[illegible]	[illegible]
सिंहाचे छावे [illegible]		[illegible] भट	१॥
बापलेक [illegible]नन्द	[illegible]	[illegible]मधला कल्पवृक्ष	१॥
[illegible]ची कथा	॥	[illegible]	॥

नाटकें

कोर्टसिंहासन [illegible]	१॥	बंडशाही [illegible] आनंद	[illegible]
भगवा झेंडा [illegible]	१॥	आग्र्याहून सुटका ,,	[illegible]
पूज्य गांधीजी ,,	१।	लक्षाधीश मधुकर राव	१।
छत्रपतींचा छावा	॥	सिंहगर्जना [illegible]	१
महावीर कर्ण ,	[illegible]॥	वीर अभिमन्यु [illegible]	[illegible]॥
दान लग्न–दमाआ	॥।	[illegible] ,,	[illegible]॥
जातिवंत जवान परचुरे	१।	पारध [illegible]	१।

एकमेव विक्रेते

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४